
साप्ताहिक
माणूस
२४ जुलै ८२, दीड रुपया





# एका पानाची कहाणी
आणि
# एका प्रकाशकाची दुखणी



# मंतरलेला दीड तास
- बालशिवाजी

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : सातवा

२४ जुलै १९८२

किंमत : दीड रुपया

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤


# ही निवड राजीव गांधींची असावी...

१२ जुलैला दुपारी, दिल्लीच्या संसद भवनात, पहिल्या मजल्यावरील ६३ क्रमाकाच्या खोलीत राष्ट्रपतिपद निवडणुकीची कवाईत चालू असता, ग्यानी झैलसिंग आपल्या निवासस्थानी, ५ रेसकोर्स येथे निवांतपणे वामकुक्षी घेत होते. एक पत्रकार श्री. राजदत्त त्यांना भेटण्यासाठी म्हणून तेथे गेले. राजदत्त लिहितात—

" ग्यानी झैलसिंग याच्या घरी पोहोचलो तोपर्यंत २.२० झाले होते. तेथे मला आश्चर्याचा धक्काच बसला. इतका महत्त्वाचा दिवस, पण ग्यानी-जींच्या घरात शुकशुकाट होता. स्वागत-कक्षाजवळ काही गाड्या रिकाम्या उभ्या होत्या. ड्रायव्हर कोठे दिसत नव्हते. मुख्य निवासस्थानाच्या व्हरांड्यात चिकाचा पडदा सोडला होता. मध्यम वयाचे, सामान्य प्रतीचे कपडे घातलेले एक सरदारसाहेब पहाऱ्यावर होते. सगळ्या घरावर एक विचित्र शातता व निवातपणा पसरलेला· घरासमोर जाळीपलीकडील ऐसपैस हिरवळीवर आयताकृती उच पांढरा शामियाना होता. तेवढीच त्या वातावरणातील अपूर्वाई.

" नेहमी अभ्यागतानी गजबजलेल्या स्वागत कार्यालयात मी एकटाच उभा होतो. ग्यानीजीचे स्वीय साहाय्यक जरा वेळाने आले. म्हणाले, 'ग्यानीजी नुकतेच झोपलेत. ते वामकुक्षी घेत आहेत. साडेचारला उठतील. तुम्ही पाच वाजता का येत नाही ?' "

पाच वाजता श्री. राजदत्त ग्यानी-जीच्या निवासस्थानी पुन्हा गेले, तेव्हा एक शिपी तेथे ग्यानीजीसाठी नव्या 'राष्ट्रपतीय' कपड्याचे माप घ्यायला आलेला त्यांना दिसला.

संसदभवनात तेव्हा झैलसिंग निवडून आल्याबद्दल लाडू वाटणे चालू झाले होते.

झैलसिंग मात्र, ५ रेसकोर्स येथे राजदत्त याच्याबरोबर लस्सी घेत राजकारण सोडून इतर विषयावरच थोडेफार बोलले निर्विकारपणे. त्यांच्यावर बंधने असल्याचे राजदत्त यांना जाणवले.

राजदत्त घरात डोकावले. कसलीही हालचाल नाही. उत्साह नाही.

सगळ्यांनी, सर्वत्र जणू गृहीतच धरलेले होते की, झैलसिंग निवडून येणार, राष्ट्रपती होणार.

मग वामकुक्षीच्या आवडत्या दैनंदिन कार्यक्रमात कशाला बदल करा ?

बहुतेकजण निवडून आल्यावर झोपा काढतात; पण झोपेतही निवडून येणारी, सर्वोच्चपदी विराजमान होणारी ही बहुधा पहिलीच व्यक्ती असावी !

¤

आपले पहिले राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद खेडवळ होते; पण उच्चविद्याविभूषित व विद्वान होते. त्यानंतरचे सर्व राष्ट्रपती शहरी व्यक्तिमत्त्वाचे होते. पाश्चात्य रीतिरिवाजांचा त्यांना सराव होता, किंबहुना त्यांच्यावर याच रीतिरिवाजांचा पगडाही होता. राजेन्द्रप्रसादांनतर असा पगडा नसलेली व्यक्ती आता पुन्हा राष्ट्रपतिपदावर येत आहे.

हरिजन किंवा मागासलेल्या समाजातील व्यक्ती राष्ट्रपती व्हावी अशी गांधीजीची एक इच्छा होती. किती विसंगत परिस्थितीत ही त्यांची इच्छा आज पूर्ण होत आहे ? ग्यानीजी हे पंजाबमधील एका मागासलेल्या समाजातून पुढे आलेले राजकारणी आहेत. त्यानी स्वातन्त्र्य–चळवळीतही भाग घेतलेला आहे.

राजेन्द्रप्रसाद सोडले तर नंतरचे

सगळेच राष्ट्रपती तसे रबरी शिक्के होते. राधाकृष्णन् यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते, परदेशात तत्त्वज्ञ म्हणून त्यांची बहुत कीर्तीही होती; पण शेवटी नेहरू करतील तीच पूर्वदिशा ठरत होती. राधाकृष्णन् याना त्याच दिशेने जावे लागत होते.

मग झैलसिंग रबरी शिक्का होणार म्हणून ओरडण्यात काय अर्थ आहे ?

दुसरा कुणीही आला असता तरी तो रबरी शिक्काच ठरला असता. कारण इंदिरा गांधींना अशीच माणसे जवळ लागतात. स्वतंत्र बुद्धीची माणसे अधिकारशाहीवाद्यांना चालत नसतात.

तरी पण हाच शिक्का पसंत करण्यात इंदिरा गांधींनी २१४ गोष्टी साधलेल्या दिसतात.

(१) अगदी घरगुती पातळीवरचे कारण म्हणजे सूनबाईंचे बंड. मनेकाला घरातून काढून टाकल्यामुळे नाही म्हटले तरी पंजाबी लोकमत जरा दुखावलेले होते, ते यामुळे थोडे सुखावण्याची शक्यता आहे.

(२) पाकिस्तानशी युद्धाचा प्रसंग केव्हाही उद्‌भवू शकतो. अशा वेळी सरहद्दीवरचे राज्य, पंजाबी लोकमत असंतुष्ट असता कामा नये. जरी आज नगण्य असल्या तरी खलिस्तानवादी चळवळी या राज्यात वाढणे धोकादायक आहे. झैलसिंगाच्या निवडीमुळे हा धोका आपोआप निवळू शकतो.

(३) पक्षातर्गत बंडाळ्या, देशातील असंतोष वाढतो आहे. सैन्याची मदत केव्हाही घ्यावी लागण्याचा सभव आहे. सैन्यदलात शीखांचे प्राबल्य आहे. हा प्रबळ गट हाताळणे सोपे जावे असाही एक विचार झैलसिंगाच्या निवडीमागे असण्याची शक्यता आहे.

(४) शेवटी युवराजांची कुवतही पाहिली गेली असावी. संजय हा तुफानी, आक्रमक, दांडगाई प्रवृत्तीचा पण कर्तबगार होता. राजीवमहाराज अगदीच मिळमिळीत, मवाळ आणि तसे नोकरीपेशा वृत्तीचे. जी काही राजीवची थोडीफार राजकीय ऊठबस आहे ती पंजाब–हरयानात. उर्वरित भारतात सोडाच, उत्तरप्रदेशातही त्याचे नेतृत्व अद्याप रुजलेले, मानले गेलेले दिसत नाही. इतपत कुवतीच्या माणसाला झैलसिग मानवतील, पेलवता येतील, त्यांचा एक कार्यकारी गट अस्तित्वात येऊ शकतो. राजीवजी जर आहेत त्यापेक्षा अधिक कर्तृत्ववान असते तर झैलसिगापेक्षा थोडी वरच्या दर्जाची व्यक्ती राष्ट्रपतिपदासाठी इंदिरा गांधींनी निवडली असती. जोवर त्या आहेत तोवर दर्जा वगैरेचा प्रश्न नव्हता. कुणालाही त्या आपल्या वर्चस्वाखाली ठेवू शकतात; पण समजा काही अचानक उलथापालथ झाली तर? ‘आपण सगळेच आता वृद्ध झालो आहोत,’ असे उद्‌गार इंदिरा गांधींनी नुकतेच एस्. एम्. जोशी याच्याशी बोलताना काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे. तेव्हा राजीवचे सत्तारोहण सुलभ व्हावे, राजीवजींना सत्ता राबवण्यात अडचणी येऊ नयेत, असाही झैलसिंग याच्या निवडीमागील एक हेतू असावा. किंबहुना झैलसिंग ही राजीवचीच निवड असण्याची शक्यता आहे. कारण झैलसिंग ५ रेसकोर्स येथे निवांत वामकुक्षी घेत होते तेव्हा राजीवजींची स्वारी संसदभवनात, डोळ्यात तेल घालून सगळ्या मतदानप्रक्रियेवर पहारा करीत होती. यापूर्वी कोणत्याही राष्ट्रपतिपद-निवडणुकीत घेतली गेली नाही, इतकी काळजी या वेळी बाळगली गेली, असे कळते. संपूर्ण निवडणूकव्यवस्थेलाच जणू राजीवजींचा खास व्यावसायिक ‘टच्’ होता! कॉम्प्युटरच कसा आणला गेला नाही हे आश्चर्य! परवाच्या चार राज्यांतील मध्यावधी निवडणुकीत राजीवजींनी कॉम्प्युटर आणला होता, घरीच बसवला होता. त्याने जो काही घोटाळा करायचा तो केला आणि भलत्याच उमेदवारांना तिकिटवाटप झाले. म्हणून मग हरियाना हिमाचलप्रदेशात इंदिरा गांधींना ऐनवेळी धावाधाव करावी लागली. काठावरचे यश तरी त्यामुळे पदरात पडले. तसा काही घोटाळा होऊ नये म्हणून राजीवजी या वेळी भलतेच सावध राहिले. प्रत्येक खासदाराकडून मतदानाची चक्क तालीमच करून घेतली गेली म्हणा ना! प्रत्येक इं. कॉं. खासदाराला आधीच मतपत्रिकेची डमी दिली गेली. मतपत्रिका कशी भरायची हे त्याला सविस्तर समजावून दिले गेले. खासदार-सदस्य संसदभवनात आल्यावर थेट मत टाकायला गेला नाही. आधी तळमजल्यावरील पक्षकचेरीत त्याला हजेरी नोंदवावी लागली. नंतर गटागटाने मतदार–खासदारांना मतदानासाठी वरच्या मजल्यावर पाठवण्यात आले. अर्ध्या-अर्ध्या तासाने संसदीय व्यवहारखात्याचे मत्री भीष्मनारायणसिंग याची पाहणी व अधूनमधून राजीव गांधी याची ‘इन्स्पेक्शन’ चालूच होती. इतका कडक बंदोबस्त ठेवल्यावर काय बिशाद आहे एकही मत फुटेल? झैलसिंग निवडून येणार असे सगळेच म्हणत होते; पण ते इतक्या बहुमताने आले याचे कारण राजीवचे हे व्यवसायनिपुणतेचे, Business efficiency चे नवे तंत्र! या तंत्राचा वापर यापुढे अधिकाधिक होत राहणार हे उघड आहे. इंडियन नॅशनल कॉंग्रेसची इंदिरा नॅशनल कॉंग्रेस झालीच आहे. राजीवच्या अमदानीत ती इंदिरा नॅशनल कंपनी किंवा कॉर्पोरेशन होईल आणि लोक म्हणू लागतील. ‘मुलुख खुदाका ... राज कपनी सरकारका!’ फक्त त्या वेळी, दीड-दोनशे वर्षांपूर्वी ‘ईस्ट इंडिया कंपनी’ होती. आता तिचे नाव बदलले आहे. असे नसते तर झैलसिंगाऐवजी एखाद्या स्वर्णसिंगांची निवड झाली असती – किंवा इतरही अनेक पर्याय होतेच; पण कशाला उगाच धोका पत्करा? राजीवजींचे सत्तारोहण विनासायास व्हायला हवे!

– श्री. ग. मा.

पुणेवार्ता

# बाल शिवाजी

## प्रसन्न, लखलखीत तरीही उत्कट !

मेधा देशपांडे

१३ जुलैला पुण्याच्या फिल्म-इन्स्टिटयूटमध्ये एक प्रसन्न आनंदसोहळा साजरा झाला. समारंभाचं प्रमुख आकर्षण होतं पुण्यातलाच एक बाल कलाकार-आनंद जोशी आणि बालचित्रसमितीचे अध्यक्ष मा. शांताराम-बापू. १९८१ च्या नोव्हेंबर महिन्यात मद्रास इथं आंतरराष्ट्रीय बालचित्रपटमहोत्सव साजरा झाला होता. २३ नोव्हेंबर हा महोत्सवाचा शेवटचा दिवस. पहिल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांची निवड आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ समितीनं जाहीर केली आणि २४ नोव्हेंबरला सकाळी रेडिओवर बातमी ऐकली की, बालचित्रपटमहोत्सवातलं उत्कृष्ट चित्रपटाचं दुसरं पारितोषिक भारताच्या ' बाल शिवाजी 'ला मिळालं आणि त्यापाठोपाठ दुसरी बातमी अशी की, महोत्सवात सर्वोत्कृष्ट बालचित्रपटअभिनेत्याचं पारितोषिकही शिवाजीची भूमिका करणाऱ्या फक्त १४ वर्षांच्या पुण्याच्याच आनंद जोशीला मिळालं ! कोणत्याही भारतीयानं अभिमानानं सांगावी अशी ही गौरवशाली घटना !

' बाल शिवाजी ' हा भारतीय बालचित्रपट समितीने तयार केलेला पहिला मराठी रंगीत चित्रपट. १३ जुलै रोजी बाल शिवाजी आणि चौदा मावळ्यांच्या साक्षीनं, शांतारामबापू, या चित्रपटाचे दिग्दर्शक प्रभाकर पेंढारकर आणि उत्साही रसिकांच्या उपस्थितीत दुसऱ्या क्रमांकाचा सन्मान मिळालेला हा चित्रपट पहायला मिळाला. चित्रपटप्रदर्शनापूर्वी बक्षीससमारंभाचा खास कार्यक्रम पार पडला.

बक्षीससमारंभापूर्वी प्रमुख पाहुणे शांतारामबापू बोलायला उभे राहिले. फोटोग्राफर्सच्या घोळक्यात शांतारामबापू बराच वेळ गुप्तच झाले होते. त्यानंतर दूरदर्शनचा कॅमेरा त्यासाठी सतत रिफ्लेक्टर्स. FTII चे डॉ. एम. व्ही के. मूर्ती, प्रभाकर पेंढारकर, प्रेक्षकात बसलेले आनंदचे आई-बाबा, मावळे कंपनी, जान्हवी खांडेकर ( सिनेमातली जिजाऊ ) आणि उत्साही रसिकांना टिपण्यात मुव्ही कॅमेरा गुंतला होता. प्रेस फोटोग्राफर्सचा ' क्लिक–क्लिककाट ' तर सतत चालू होता. कॅमेरामन बापूंचा ' क्लोजअप ' घ्यायला म्हणून जवळ आला तेव्हा बापू म्हणाले, ' कुठूनही घे रे ! माझे दोन्ही अँगल चांगले आहेत ! ' संपूर्ण कार्यक्रमात शांतारामबापूंनी एक छान घरगुती ' टच ' निर्माण केला आणि कायम ठेवला. बोलायला सुरुवात करतानाच बापूंनी एक आठवण सांगितली. म्हणाले, ' हाच सिनेमा प्रभातमध्ये मूकपट म्हणून काढला होता. मी स्वतः शिवाजीचं काम केलं होतं ब्रिटिश-काळात म्हणून त्याच्यावर अनेक बंधनं आली. ' कृष्णधवल ' सिनेमात भगवा झेंडा असल्यामुळे तो don झाला. ' बापू आठवणीतून पटकन भानावर आले. जगातल्या सर्व चित्रपटांतून आंतरराष्ट्रीय बाल चित्रपटमहोत्सवात भारताच्या चित्रपटाला मानाचं दुसरं पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांनी भरभरून कौतुक केलं. त्यांच्यासकट सगळ्यांच्या नजरा कौतुकानं फुलल्या होत्या. दिग्दर्शक प्रभाकर पेंढारकर स्टेजवर भारावल्यासारखे दिसत होते. पुढच्या खुर्चीत ' बाल शिवाजी ' आणि मावळे excite झाले होते. ती हुरहूर आमच्यापर्यंत येऊन पोचली होती. शांतारामबापू बोलत होते, ' भाषेच्या पलीकडे जाऊन ज्यांना मराठी भाषा माहीतसुद्धा नाही अशा असंख्य बाल प्रेक्षकांनी एकमुखानं ' बाल शिवाजी ' ची आणि आनंदची निवड केली. मुलांच्या निवडीशी मी १०१ टक्के सहमत आहे. मला वाटतं मोठ्या माणसांचे चित्रपटही असेच भाषेचा अडसर ओलांडणारे असावेत .' ते ऐकताना मला वाटलं हे अडसर ओलांडणं म्हणजेच आपण गंभीर चेहऱ्यानं ' व्यापक अनुभूती ' वगैरे म्हणतो तीच की काय ? '

नंतर शांतारामबापूंनी कौतुक करायला सुरुवात केली. सुरुवात अर्थातच ' Best child actor पासून ! आनंद स्टेजवर येत होता. टाळ्यांचा कडकडाट, कॅमेऱ्याचे आणि डोळ्यांचे ' फ्लॅश ' आणि मूव्ही कॅमेरा ! एक पाय आणि सोंड उचललेल्या हत्तीची चांदीची प्रतिकृती आनंदनं स्वीकारली. ( नंतर बोलताना आनंद म्हणाला, ' शूटिंग संपल्यानंतर जवळजवळ दीड वर्षानं रिफ्लेक्टर्स पाहिल्यावर इतकं वेगळं वाटलं ! मी बापूंना स्टेजवर विचारलं, शॉटचा रिटेक नाही ना ? ') त्यानंतर स्टेजवर आली जिजाऊ आणि चौदा मावळे. सगळ्यांना मानचिन्हं देण्यात आली. सर्वांत शेवटी शांतारामबापूंनी चित्रपटाचे खरे शिल्पकार प्रभाकर पेंढारकरांना मानचिन्ह दिले. शिवाजीचा ब्राँझचा पुतळा लखलखत होता. मानचिन्ह घ्यायला सौ. पेंढारकरांनाही शांतारामबापूंनी आग्रहानं बोलावलं. (आणि वर ' अग, आता लाजू नको ! ' असंही म्हणाले.) कार्यक्रम घरगुती झाला. तो असा. त्यानंतर सर्व ' बाल शिवाजी ' ग्रुपचा एक झकास फोटो घेतला. बक्षीससमारंभ संपला. ' बाल शिवाजी ' आता दिसणार होता. मधल्या वेळात सौ. पेंढारकर आणि 'प्रभात' कुटुंबीय सगळ्यांना आग्रहानं चहा-कॉफी देत होते.

चित्रपट सुरू झाला. शहाजीराजांच्या पुणे जहागिरीजवळचं एक लहानसं खेडं बनगाव समोर आलं. बनगावची मुलं मोठी हूड. विटीदांडूच्या खेळात येसाजीनं मारलेली विटी उचवळच्या सरदार सुलतानराव खोपड्यांना लागते. सरदार रागावतात. शिपायांना मुलांना पकडायला सांगून चोप द्यायला लावतात. एवढ्यात एक हुकमी आवाज येतो, " खबरदार ! सोडा त्या मुलांना. आमच्या जहागिरीत मुलांना फिरून त्रास दिलात तर तुम्हाला जेरबंद करून अटकेत ठेवू आम्ही! " शिवाजीच्या संवगड्यांचं आणि शिवाजीचं हे पहिलं दर्शन. त्यानंतरचा दुसरा

पृष्ठ ३० वर

## कामगार वृत्त

# १०० रु. हंगामी वाढ १५०० रु. उचल

गेले सहा महिने चाललेला अडीचलाख गिरणीकामगारांचा संप लवकरात लवकर मिटावा म्हणून गेल्या आठ-पंधरा दिवसांपासून मुंबई आणि दिल्ली येथे वेगाच्या हालचाली सुरू आहेत; पण अद्याप कोणताही सन्माननीय तोडगा दृष्टिपथात आलेला नाही !

या संपाबाबत सरकारने प्रथमपासून घेतलेली ताठर भूमिका सरकारला अखेर बदलावी लागली. संप चालू झाल्यापासून मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी संपाबाबत जी जी विधाने केली ती सर्व डॉ. सामंतांच्या पथ्यावर पडली. संपाने बारा दिवस पूर्ण केल्याचे जेव्हा पत्रकारांनी वार्ताहरपरिषदेत मुख्यमंत्र्यांना सांगितले तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले की,' आता त्यांचा तेरावा करा !' नंतर मुख्यमंत्र्यांनी एकच पालुपद चालू ठेवले की,'आधी कामावर-परता; मगच वाटाघाटी! 'मान्यताप्राप्त युनियनशिवाय बोलणीच नाहीत.'

मग कामगार कामावर मोठ्या संख्येने रुजू होत आहेत असे सरकारी प्रचारमाध्यमाद्वारे सांगण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी सेंच्युरी मिलला भेट देऊन मिल कशी ऐटीत सुरू आहे हे दूरदर्शनद्वारे सांगितले. मग मुख्यमंत्री सांगू लागले की, कामगार होळीनंतर कामावर परततील; पाडव्यानंतर परततील; १९मे च्या मिनीसार्वत्रिक निवडणुकीनंतर संपाचा निर्णय कळेल !

मग एका सभेमध्ये मुख्यमंत्री म्हणाले की, डॉ. दत्ता सामंत यांनी पुकारलेल्या गिरणी-कामगार संपाविरुद्ध आपण एक लोकप्रतिनिधी म्हणून मैदानात उतरत आहोत. कामगारांनी धमक्यांना न घाबरता आता कामावर जावे. शासन त्यांना सर्वतोपरी सहकार्य देईल. याच सभेमध्ये मुख्यमंत्री म्हणाले की, डॉ. सामंतांनी 'जेल भरो' आंदोलन सुरू करावेच. आम्ही आमचे जेल मोकळेच ठेवले आहेत.

मुख्यमंत्री एकीकडे असे बोलत होते तर तिकडे माजी अर्थमंत्री रामराव आदिक यांनी सुचविलेल्या तोडग्याला शुभाशीर्वाद देत होते. मुख्यमंत्र्यांचे आजचे बोलणे उद्या रहात नव्हते तर उद्याचे परवा ! म्हणूनच गिरणीकामगार ताठ राहिले. कोणाच्याही प्रचाराला बळी न पडता त्यांनी आपला लढा निर्धाराने पुढे चालविला आणि म्हणूनच सरकारला अखेर आपल्या भूमिकेपासून ढळावे लागले. डॉ दत्ता सामंतांनी या लढ्यातील पहिला विजय येथेच संपादन केला !

मुंबईतील अडीचलाख गिरणी कामगारांनी ज्या निर्धाराने हा लढा चालविला तो लक्षात घेऊन, केन्द्रीय मजूर—राज्यमंत्र्यांना संसदेत ३० रु. हंगामी पगारवाढीची आणि प्रत्येक कामगाराला ६५० रु उचल देण्याची घोषणा करावी लागली.सरकारची ही घोषणाम्हणजेच डॉ. सामंतांचा पहिला विजय ! केन्द्रीय मजूर-मंत्री श्री. आझाद यांनी लोकसभेत सांगितले की, कामगारांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी एक त्रिपक्षीय समिति नेमण्यात येणार असून या समितीचा अहवाल येईपर्यंत ही ३० रुपयांची हंगामी वाढ चालू राहील. देशातील कापडगिरणी उद्योग व त्यातील कामगार यांच्या प्रश्नांची छाननी करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर समिती स्थापन करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. मुंबईतील कापडगिरणी कामगारांचे विशिष्ट प्रश्न या समितीकडे सोपविण्यात येतील व समितीकडून दोन महिन्यात त्याबाबतचा अहवाल मागविण्यात येईल असेही आझाद म्हणाले.

गिरणीकामगारांच्या दृष्टीने ही ३० रु. वाढ अगदीच तुटपुंजी असल्याने डॉ. सामंतांनीच काय पण सर्वांनीच ती फेटाळून लावली. केन्द्रीय मजूरमंत्र्यांपाठोपाठ बाबासाहेबांनी आणखी एक घोषणा केली आहे जे गिरणी-कामगार १५ जुलैपर्यंत कामावर परततील त्यांच्या मुलांना मोफत पाठ्यपुस्तके महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविभागाकडून देण्यात येणार आहेत. बाबासाहेबांच्या या घोषणेवर मात्र अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आमिष दाखवून संप फोडण्याचे कारस्थान सरकार करत आहे अशी टीका कामगार करीत आहेत.

सरकारला आपली भूमिका बदलावी लागली याला कारणे अनेक आहेत. एक म्हणजे डॉ. सामंत आपल्या भूमिकेशी ठाम राहिले. या लढ्याला साऱ्या महाराष्ट्राची सहानुभूती लाभली. कॉंग्रेस आय आणि इंटक सोडून सर्व राजकीय पक्षांनी आणि कामगार संघटनांनी या लढ्याला सक्रिय पाठिंबा दिला. डॉ. सामंतांनी हा संप सुरू केलेला असला तरी आता तो कामगार संघटना संयुक्त कृतिसमितीमार्फत लढविला जात आहे. कृतिसमितीने 'महाराष्ट्र बन्द'सारख्या संघर्षात्मक कार्यक्रमाबरोबरच गिरणी-कामगारांना धान्य वाटण्याचे, त्यांच्या मुलांना वह्या-पुस्तके इतकेच नव्हे तर रोकड पैसे वाटण्याचेही काम केले आहे.

८ जुलै रोजी महाराष्ट्रातील सुती कापड-गिरण्यांतील सर्व कामगार एक दिवसाच्या लाक्षणिक संपावर गेले होते. मुंबईतील सर्व कामगार — कर्मचाऱ्यांनी त्या दिवशी आपापल्या ऑफिससमोर सरकारच्या कामगार-विरोधी धोरणाविरुद्ध निदर्शने केली. मुंबईचे महापौर डॉ. प्रभाकर पै यांनी ७२ नगर-सेवकांसमवेत त्या दिवशी सत्याग्रह करून स्वतःला अटक करवून घेतली. महापौरांची ही कृती महत्त्वपूर्ण अशीच गणली गेली. स्वतःला अटक करवून घेऊन महापौरांनी हा प्रश्न किती ज्वलंत आहे हे सर्वांना दाखवून दिले.

महापौरांच्या पाठोपाठ भारतीय जनता पार्टीनेही ११ जुलै रोजी महाराष्ट्रभर निदर्शने करून या प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट केले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष शामराव पाटील यांनी ४००० कार्यकर्त्यांसह त्या दिवशी मोर्चा काढून मुख्यमंत्र्यांनी या संपात सन्मानीय तडजोड घडवून आणावी अशी मागणी केली.

आता हा संप जर लवकर मिटला नाही तर याचे स्वरूप उग्र बनणार आहे. डॉ. सामंतांनी महाराष्ट्रातील इं. कॉं. च्या आमदारांना घेराव घालण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर 'जेल भरो' आंदोलनही ते सुरू करीत आहेत.

जनता पक्षाचे वयोवृद्ध ज्येष्ठ नेते श्री. एस एम. जोशी यांनी संपामध्ये तडजोड घडवून आणावी म्हणून दिल्लीमध्ये प्रयत्न केला. त्यांनी प्रत्येक कामगाराला २००० रु. उचल देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

याबाबतीत त्यांनी कामगारमंत्री शिवराज पाटील, पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी बातचीत केली आहे; पण या तडजोडीचे सारे श्रेय सरकार एस्. एम्. ना देईल असे समजणे मूर्खपणाचे ठरेल असा निरीक्षकांचा कयास आहे. जे सरकार रामराव आदिकांना श्रेय देऊ इच्छित नाही ते एस. एम्. ना काय देणार, असा सर्वांचा सवाल आहे.

पण एकंदरीत गिरणीसंप लवकरात लवकर मिटेल अशीच चिन्हे सर्वत्र दिसत आहेत. असे जर झाले तर ठीक; नाही तर हा संघर्ष अधिकच चिघळण्याची शक्यता आहे. सरकार याची दखल घेऊन २॥ लाख गिरणीकामगारांना न्याय देईल अशी आशा गिरणीकामगार बाळगून आहेत. ३० रुपये हंगामी वाढीवर कामगार समाधानी नाहीत. ही वाढ १०० रुपयांपर्यंत देण्यात आली आणि उचल म्हणून १५०० रुपये दिले तर कामगार परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कामावर परततील आणि आत राहून गनिमी काव्याने आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करतील असा अंदाज येथे वर्तविण्यात येत आहे. काय होते ते नजीकचा काळच सांगेल.

— मोहन दा. कुलकर्णी

परराष्ट्र

# काम्पूचिया

## यादवी युद्धात नवा टप्पा

वा. दा. रानडे

काम्पूचिया म्हणजे कंबोडियात व्हिएटनामविरोधी तीन गट एकत्र आले असून प्रिन्स सिहानुक यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी पश्चिम काम्पूचियातील जंगलात कोठे तरी संयुक्त सरकार स्थापन केले आहे, प्रिन्स सिहानुक यांची राष्ट्रीय संयुक्त आघाडी खिऊ संफान यांच्या ख्मेर रुज पक्ष आणि सोनसान यांची ख्मेर पीपल्स नॅशनल लिबरेशन फ्रंट हे तीन गट या सरकारमध्ये समाविष्ट आहेत. काम्पूचियातील सध्याचे व्हिएटनामच्या प्रभावाखालील हेंग समरिन सरकार पदच्युत करणे, व्हिएटनामच्या फौजा देशातून काढून घ्यायला लावणे आणि खुल्या निवडणुका घेऊन नवे प्रातिनिधिक सरकार स्थापन करणे हे या सरकारचे उद्देश आहेत. काम्पूचियामधील यादवी युद्धातला हा एक नवीन टप्पा आहे.

काम्पूचियाच्या प्रश्नाचा अलगपणे विचार करता येणार नाही. आशियातील प्रभावक्षेत्र वाढविण्यासाठी बड्या राष्ट्रांमध्ये चालू असलेल्या संघर्षाचा तो एक भाग आहे. व्हिएटनाम-युद्ध संपल्यानंतर पूर्वीच्या इंडोचायनाची उत्तर व्हिएटनाम, दक्षिण व्हिएटनाम, लाओस व काम्पूचिया अशी चार स्वतंत्र राज्ये स्थापन झाली. उत्तर व्हिएटनामच्या नेत्यांची महत्त्वाकांक्षा ही चारही राज्ये आपल्या प्रभावाखाली आणून आशियात आपण एक प्रबळ सत्ताकेंद्र बनावे अशी होती. त्यांनी प्रथम दोन्ही व्हिएटनामचे एकीकरण घडवून आणले. नंतर काम्पूचियात आपल्या बाजूचे सरकार स्थापण्याच्या हालचाली सुरू केल्या. त्यातून काम्पूचियातील यादवी युद्ध सुरू झाले.

काम्पूचियात अमेरिकन फौजांविरुद्ध लढ्याचे नेतृत्व ख्मेर रुज या कम्युनिस्ट संघटनेने केले. खिऊ संफान त्यांचे नेते. प्रिन्स सिहानुक यांनी चीनमध्ये आसरा घेऊन तेथे आपल्या नेतृत्वाखाली काम्पूचियाचे स्वतंत्र सरकार स्थापन केले होते आणि तेथून अमेरिकाविरोधी लढा चालू ठेवला होता. व्हिएटनाम–युद्ध संपल्यावर प्रिन्स सिहानुक काम्पूचियास परतले. ख्मेर रुजने स्थापन केलेल्या सरकारचे त्यांना अध्यक्ष नेमण्यात आले व खिऊ संफान उपाध्यक्ष झाले. अमेरिकेविरुद्ध लढलो आम्ही आणि आता सरकारचे प्रमुख म्हणून मात्र प्रिन्स सिहानुक मिरवणार हे ख्मेर रुजच्या नेत्यांना पसंत नव्हते; पण नव्या सरकारच्या स्थापनेच्या सुरुवातीलाच संघर्ष नकोत म्हणून त्यांनी ते मान्य केले; पण प्रिन्स सिहानुक नामधारी अध्यक्ष होते. खरी सत्ता उपाध्यक्ष खिऊ संफान यांनी आपल्याकडेच ठेवली होती. सिंहनुक यांच्याकडे परराष्ट्रसंबंधांची जबाबदारी टाकण्यात आली. पॉल पॉट यांना या सरकारचे पंतप्रधान नेमण्यात आले. चीनचा या सरकारला पाठिंबा होता आणि आशियात आपले प्रभावक्षेत्र वाढविण्यासाठी चीनला आपल्या बाजूचे सरकार तेथे हवे होते. याच काळात अमेरिका व चीन यांचे संबंध सुधारले होते. रशियाशी प्रभावक्षेत्राच्या स्पर्धेत काम्पूचियात आपल्या बाजूचे नसले तरी चीनच्या बाजूचे आणि रशियाविरोधी सरकार असणे अमेरिकेलाही आवश्यक वाटत होते, तर रशियाला आशियात व्हिएटनामच्या रूपाने अमेरिकाविरोधी, चीनविरोधी आणि रशियाला अनुकूल सत्ताकेंद्र निर्माण करावयाचे होते. काम्पूचियात चीनला अनुकूल सरकार ठेवण्याने हे उद्देश साध्य होणार नव्हते. म्हणून ते सरकार पाडण्यासाठी तेथे यादवी युद्ध सुरू करण्यात आले. रशियाने शस्त्रांची मदत केली, व्हिएटनामने लष्करी हस्तक्षेप केला आणि हेंग समरिन यांच्या नेतृत्वाखाली आपल्या बाजूचे सरकार तेथे स्थापन केले. पंचवीस डिसेंबर १९७८ ला हे सरकार स्थापन केले. चिनी फौजांनी या युद्धात पॉल पॉट सरकारच्या बाजूने हस्तक्षेप केला होता; पण व्हिएटनामच्या फौजांनी चिनी फौजांचा पराभव केला आणि त्यांना माघार घेण्यास भाग पाडले. चिनी फौजांना व्हिएटनामच्या फौजांनी पिटाळून लावणे ही चीनची मोठी नामुष्की होती.

समरिन सरकारविरुद्ध व्हिएटनामविरोधी गटांनी प्रतिकार चालूच ठेवला. आता तिन्ही गट एकत्र येऊन त्यांचे संयुक्त सरकार स्थापन झाल्याने त्याला अधिक जोर येण्याचा संभव आहे, असे पाश्चात्य निरीक्षकांना वाटले; पण त्यात वस्तुस्थितीपेक्षा आशावादाचाच भाग अधिक आहे. हा लढा कठीण आहे याची प्रिन्स सिहानुक यांनाही जाणीव आहे. मित्र-राष्ट्रांना त्यांनी मदतीचे आवाहन केले आहे. चीन लष्करी मदतही देईल; पण बाकीच्या देशांकडून लष्करी मदत मिळण्याची शक्यता दिसत नाही. अमेरिकेने आर्थिक मदतीचे आश्वासन दिले आहे. 'एशियन' या आग्नेय आशिया राष्ट्रांच्या संघटनेने या सरकारला पाठिंबा दिला आहे. थोडीफार आर्थिक मदत हे देश करतील. अशा परिस्थितीत समरिन सरकारला प्रभावी प्रतिकार हे सरकार कितपत करू शकेल याची शंका

वाटते. खमेर रुजचे वीस हजार सैनिक आहेत. ते गनिमी लढा चालू ठेवून सरकारला काही प्रमाणात जेरीस आणू शकतील; पण यादवी युद्धात विजय मिळवून समरिन सरकार पदच्युत करण्याइतके त्यांचे बळ आज नाही आणि नजीकच्या काळातही वाढण्याची शक्यता नाही. काम्पूचियात व्हिएटनामचे सध्या एक लाख ऐंशी हजार सैनिक असल्याच्या बातम्या आहेत. त्यांच्या पाठिंब्याने समरिन सरकार टिकून आहे.

यादवी युद्धाशिवाय वाटाघाटींच्या मार्गाने हा प्रश्न सुटण्याची कितपत शक्यता आहे ? व्हिएटनामी फौजा अंशतः काढून घेण्याची तयारी व्हिएटनामी नेत्यांनी दर्शविली आहे; पण अंशतः म्हणजे किती हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. परिस्थिती सुधारल्यावर आणखी फौजाही काढून घेतल्या जातील असे ते म्हणत आहेत; पण तीन गटांच्या प्रतिस्पर्धी सरकारची स्थापना हे त्यांच्या दृष्टीने परिस्थिती सुधारल्याचे लक्षण नव्हे. या सरकारला पाठिंबा देऊन अमेरिकेसारखी भांडवलदारी राष्ट्रे काम्पूचियात भांडवलदारी, प्रतिगामी सरकार प्रस्थापित करू पहात आहेत. त्यांचा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही असे व्हिएटनामचे नेते म्हणत आहेत; पण वाटाघाटींच्या मार्गाने प्रश्न सोडवायला त्यांचीही तयारी आहे असे दिसते.

फौजा अंशतः काढून घेण्याची तयारी हे त्या दिशेचेच एक पाऊल आहे. व्हिएटनाम प्रश्नाची शांततेच्या मार्गाने सोडवणूक करण्यासाठी प्रादेशिक परिषदेची सूचनाही त्यांनी केली आहे. या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय परिषद भरवावी अशी सूचना एशियन संघटनेनेही केलेली आहे. रशिया, अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, चीन या बड्या राष्ट्रांना या परिषदेत बोलवावे असे एशियनचे म्हणणे. व्हिएटनामी नेत्यांचा आधी त्यास विरोध होता; पण आता अशा परिषदेत त्यांना सहभागी करून घेण्यासही त्यांची तयारी आहे. दोन्ही बाजूंच्या भूमिका आता बऱ्याच जवळ आल्या आहेत. तेव्हा आणखी प्रयत्न करून आंतर्राष्ट्रीय परिषदेचा तोडगा जरूर करून पहायला हवा. काम्पूचियातून सर्व परकीय फौजा काढून घेऊन तेथे खुल्या निवडणुका घेणे आणि खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक सरकार तेथे स्थापन करणे हाच काम्पूचियाचा प्रश्न सोडविण्याचा लोकशाही मार्ग आहे. □

---

## अवती भवती

शरद कृष्णन

### □ केंद्रीय मंत्रिमंडळातील फेरबदल

अपेक्षेप्रमाणे ग्यानी झैलसिंग दणदणीत विजय मिळवून राष्ट्रपतिभवनाचे मानकरी ठरले. झैलसिंग निश्चित निवडून येणार हे माहीत असूनही इंदिराजींनी या निवडणुकीला अवाजवी महत्त्व दिले. अपेक्षेप्रमाणे प्रचंड बहुमत घेऊन झैलसिंग विजयी झाले. प. बंगाल आणि त्रिपुरा या दोन राज्यांचा अपवाद वगळता त्यांच्यावर मतांचा पाऊस पडला. अण्णा द्रमुक, अकाली, नॅशनल कॉन्फरन्स यांसारख्या विरोधी पक्षांनीसुद्धा इंदिराजींच्या निवडीवर शिक्कामोर्तब केला. झैलसिंग गृहमंत्री म्हणून आपला प्रभाव पाडू शकले नव्हते त्यामुळे मंत्रिमंडळामधील फेरबदलाच्या वार्ता ज्या वेळी प्रसृत झाल्या त्या प्रत्येक वेळी झैलसिंग यांचे गृहखाते जाणार असल्याचे बोलले गेले. तसे प्रत्यक्षात कधी झाले नाही; परंतु संजीव रेड्डी निवृत्त झाल्याने झैलसिंग यांची अधिक चांगल्या प्रकारे सोय झाली. आता झैलसिंग राष्ट्रपती झाल्यामुळे गृहखाते तसे मंत्र्याशिवाय आहे ! सध्या संरक्षणमंत्री वेंकटरामन या खात्याचे काम पहातात. तथापी संरक्षणखाते त्यांना कार्यमग्न ठेवण्यास पुरेसे आहे. एन. डी. तिवारी यांच्याकडे गृहखाते सोपवले जाण्याची दाट शक्यता आहे. श्री. तिवारी यांचे नाव उ प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदासाठीही घेतले जात आहे; परंतु त्यांना स्वतःला गृहखाते मिळाले तर हवे आहे. अर्थात गृहखाते त्यांच्याकडे सुपूर्त केले तर अन्य काही बदलही अपेक्षित आहेत. चंद्रजित चायना व ससोडिया हे दोन मंत्री राज्यसभेचे तिकिट पुन्हा न मिळाल्याने निवृत्त होत आहेत. त्यांचे मंत्रिपद कायम ठेवायचे तर राज्यसभेवर त्यांची नियुक्ती करावी लागेल. ती जर झाली नाही तर त्यांचे मंत्रिपदही आपोआपच जाईल. केंद्रीय मंत्रिमंडळाची कार्यक्षमता वाढावी अशा पद्धतीने काही मोठे बदल घडवून आणण्याचा पंतप्रधानांचा मानस आहे. विद्यमान मंत्र्यांपैकी एखाद–दुसरा अपवाद वगळता कोणाला वगळले जाणार नाही. म्हणजेच काही नवीन मंडळींना संधी उपलब्ध करून दिली जाईल. तसेच काही मंडळींना बदली देऊन कार्यक्षमता वाढवली जाईल. ज्येष्ठ मंत्र्यांपैकी स्टीफन, वसंत साठे यांची खाती बदलली जाण्याची शक्यता आहे. राज्यस्तरीय मंत्री कॅबिनेट–मंत्र्याला अपेक्षित सहकार्य देत नसतील तर त्यांची खाती बदलण्याची पूर्वप्रथा आहे. त्याप्रमाणे या कारणासाठी काही मंत्र्यांची खातीही बदलली जाण्याची शक्यता आहे. मोठे फेरबदल होणार असल्याने इंदिराजी या कामासाठी आणखी एखादा महिना घेतील. कॅबिनेटमंत्री म्हणून एक-दोन अनपेक्षित व्यक्तींचा अंतर्भाव होण्याचा दाट संभव आहे. इंदिराजींच्या तंत्रामध्ये अशा गोष्टी सहज बसत असतात. राष्ट्रपतिपदासाठी झालेल्या निवडणुकीच्या वेळी पक्षाने झैलसिंग यांना मते देण्याबाबत खास आदेश काढला नव्हता. पक्षाचे उमेदवार म्हणून झैलसिंग यांची निवड झाल्याने त्यांना मत देणे हे पक्षसदस्यांचे कर्तव्यच आहे असे मुपनार म्हणाले होते. सदस्यांनी आपले हे कर्तव्य चोख प्रकारे बजावले आहे. इंदिराजींच्या नेतृत्वावर त्यांनी आपला गाढा विश्वास व्यक्त केला आहे. पक्षांतर्गत बंडाळीच्या वार्ता चारही बाजूंनी येत असल्या तरी इंदिराजींची इच्छा हाच अखेरचा परवलीचा शब्द

आहे! राष्ट्रपतिपदासाठी झालेले मतदान लक्षात घेता ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.

## □ उ. प्र. चे मुख्यमंत्रिपद

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रिपद ही तशी सुळावरची पोळी असली तद्वीही या पोळीचे मानकरी होण्याची इच्छा बाळगणाऱ्या इच्छुकांची संख्याही तशी काही कमी नाही. इच्छुकांच्या या भाऊगर्दीतून इंदिराजी कोणाची निवड करतात ते पहायचे. संभाव्य नावांमध्ये अरुण नेहरू, एन. डी. तिवारी, उ. प्र. विधानसभेचे सभापती श्री. श्रीपत मिश्रा, कमलापती त्रिपाठी यांचे चिरंजीव व मावळत्या मंत्रिमंडळामधील आरोग्यमंत्री लोकपती त्रिपाठी, एके काळी कै. संजय गांधी यांच्या मागेमागे करणारे बिरबहादूर सिंग यांसारख्या नावाचा समावेश होतो. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत या सर्व नावांना मागे सारून एखादी अनपेक्षित व्यक्ती मुख्यमंत्रिपदी विराजमान झालेली दिसेल! स्वयंप्रकाशी नसलेले मुख्यमंत्री निवडण्याची प्रथा इंदिराजींनी चालू केलीच आहे. आंध्र प्रदेश व महाराष्ट्र येथील मुख्यमंत्री केवळ इंदिराजींच्या इच्छेमुळे मुख्यमंत्रिपदी विराजमान झालेले आहेत. आता उ. प्रदेशामध्ये अशा अनपेक्षित व्यक्तीमध्ये प्रवीणकुमार शर्मा यांचा समावेश होतो. हे शर्मा १९८० साली झालेल्या निवडणुकीमध्ये माजी मुख्यमंत्री बनारसी दास यांना पराभूत करून विधानसभेवर निवडून आले. बुलंदशहर येथील एका महाविद्यालयात ते प्राचार्य होते. तसेच मावळत्या मंत्रिमंडळामध्ये ते राज्यस्तरीय मंत्री आहेत. त्यांचे नाव पुढे येण्याचे मुख्य कारण श्री. राजीव गांधी यांच्याशी त्यांची विशेष जवळीक असून अलीकडेच राजीव गांधी उत्तर प्रदेशात विधानसभा–सदस्यांशी बातचीत करण्यासाठी गेले असता त्यांनी श्री. शर्मा यांच्या नावाबाबत चाचपणी केली. तडजोड म्हणून त्यांच्या नावाला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. उ. प्रदेशामध्ये नवीन मुख्यमंत्री विराजमान झाला म्हणजे इंदिराजींना इतर प्रश्नांकडे लक्ष देता येईल.

महाराष्ट्रामधील बंडखोरांच्या नेत्यांना इंदिराजींनी साधी भेटही नाकारली हे विसरून चालणार नाही. तसेच बंडखोरांचा गट हा अंतुलेजींचा गट म्हणून ओळखला जात होता; परंतु अंतुलेजींचे ओझे घेऊन वाटचाल अवघड आहे हे लक्षात येताच बंडखोरांनी अंतुलेजींशी आपला संबंध नसल्याचे घोषित केले आहे. बंडखोर कोणत्याही राज्यामधले असोत ते इंदिराजींशी एकनिष्ठच असतात आणि वारंवार आपल्या एकनिष्ठतेची ग्वाही देत असतात. आणि अशी ग्वाही देत असतानाही इंदिराजींच्याच निर्णयाला ते आव्हान देत असतात, असा हा सारा विचित्र विरोधाभास आहे. आता कडया-कोपऱ्यात बसलेल्या आणि साधे मंत्रिपद तरी राहते की नाही याची चिंता असलेल्या बाबासाहेब भोसले यांना मुख्यमंत्रिपदी बसवले कुणी? इंदिराजींनी. मग ज्यांना आपण नेते मानतो त्या इंदिराजींचा निर्णय मानण्याची भाषा सतत करतो त्या इंदिराजींनी निवडलेल्या मुख्यमंत्र्यांना प्रदेश कॉंग्रेसच्या उपाध्यक्षपदी विराजमान झालेले बाळासाहेब पवार आणि त्यांचे सहकारी विरोध कसा करतात? या विरोधाला तत्त्वाचे अधिष्ठान नसते. अन्य कोणाचा तरी लाभ व्हावा म्हणून प्रस्थापितांना विरोध आणि तोही इतक्या बोथट स्वरूपात की, दिल्लीने डोळे वटारले की, इंदिराजींची इच्छा प्रमाण मानून आम्ही भोसल्यांचे नेतृत्व मानतो, यासारखी विधाने करण्यास हे बंडखोर मोकळेच. महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत गेल्या अंकामध्ये लिहिताना मी असे म्हटले होते की, केंद्रीय नेते सध्या तरी विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील. बंडखोरांच्या शिष्टमंडळाला ज्या पद्धतीने अपमानित करण्यात आले त्यावरून ही गोष्ट पुरेशी स्पष्ट झालेली आहे. खेरीज विधानसभेने विधानपरिषदेवर जे प्रतिनिधी पाठवायचे असतात त्यासाठी इंदिरा कॉंग्रेसने जे उमेदवार घोषित केले आहेत त्यांची नावे नजरेखालून घातली तरी बंडखोरीचा झेंडा फडकवणाऱ्या मंडळींना पूर्ण अपयश आल्याचे लक्षात येते. तात्पर्य बंडखोरांच्या मनात काहीही असले तरी, सध्या तरी नरमाईचे धोरण स्वीकारण्याखेरीज अन्य पर्याय संभवत नाही. दरम्यान अंतुलेजींची झपाट्याने पीछेहाट चालू आहे. त्यांच्याभोवती राहण्यात आता आपला फायदा नाही हे लक्षात आल्याने मंडळी झपाट्याने त्यांच्यापासून दूर जात आहेत. ज्या प्रतिभा प्रतिष्ठानवरून वादळ उठले होते त्या प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदाचा अंतुलेजींनी राजिनामा दिल्याच्या वार्ता आहेत. सत्ता गेलीच आहे! सत्तेच्या बळावर जोडलेल्या या संपत्तीवरील नियंत्रण अंतुलेजींच्या हातून गेले की इंदिराजींच्या मेहरबानीने मिळू शकणाऱ्या एखाद्या सन्माननीय पदाची वाट पहात बसण्याखेरीज अंतुलेजींसमोर पर्याय नाही. ताठर विरोधी भूमिका घेतली आणि आपली ताकद न उमगता आततायी भूमिका स्वीकारली तर काय होते हे स्पष्ट करण्यासाठी कर्नाटकच्या कै. देवराज अरस यांचे आणि एके काळी महाराष्ट्राचे सर्वेसर्वा असलेल्या यशवंत बळवंतांचे उदाहरण पुरेसे आहे. त्यामुळे अंतुलेजी कोणताही आततायीपणा करणार नाहीत आणि योग्य वेळेची वाट बघत बसतील असे वाटते.

कर्नाटकमधील बंडखोरांनी देवराजजींचा वारसा पुढे चालवण्याचे नक्की केलेले दिसते. तेथील एक नेते बंगराप्पा यांनी इंदिरा कॉंग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्याबरोबर पक्ष सोडणारांमध्ये आणखी २–३ आमदार आहेत. देवराज अरस यांनी इंदिराजींची साथ सोडली त्या वेळी त्यांचे स्वतःचे सामर्थ्यही खूप मोठे असल्याचा दावा होता; परंतु निवडणुकीत त्यांना अक्षरशः माती चारून इंदिराजींनी हा भ्रमाचा भोपळा फोडला. त्यामुळे देवराजींना आपल्या आयुष्याची अखेरची ३–४ वर्षे अक्षरशः तरंगतच काढावी लागली. हात-पाय मारून दमछाक झाली; परंतु किनारा कधी हाती लागलाच नाही. वयाचा हिशेब करायचा झाला तर बंगराप्पा तरुण आहेत. तुलनाच करायची तर त्यांची उमर आपल्या शरद पवार यांच्या जवळपास आहे. चार डाव खेळण्याची उमेद ठेवूनच त्यांनी इंदिराजींना रामराम ठोकला आहे. कर्नाटक राज्य तसे निवडणुकीला टेकलेले आहे. तीन आमदार आणि काही कार्यकर्ते एवढ्या सामर्थ्यावर मुकाबला जमण्यासारखा नसल्याने बंगराप्पा आपल्या पाठिराख्यासह एक तर भाजपसारख्या पक्षात सामील होतील अथवा कन्नड भाषेच्या भलाईची सारी जबाबदारी आपल्या शिरावर आहे असे समजून राजकारणाच्या रिंगणात आलेल्या सुपरस्टार राज-

कुमारबरोबर हातमिळवणी करून प्रादेशिक पक्षाची मुळे रुजवण्याचा प्रयत्न करतील. नेमके काय करायचे या बाबतचा निर्णय त्यांना लवकरच घ्यावा लागेल!

## □ शेखसाहेबांचे जम्मू–काश्मिर

जम्मू–काश्मिरच्या राजकारणावर असाधारण पकड असलेल्या शेखसाहेबांची प्रकृती सध्या इतकी तोळामासा आहे की, राज्यावरील त्यांची हुकमत नाममात्र असून सारा कारभार नोकरशाही सांभाळत आहे. मत्रीगणांपैकी त्यांचे जामात जी. एम. शहा विशेष प्रभावी आहेत. जम्मू–काश्मिरची सूत्रे आस्ते आस्ते परंतु निश्चितपणे आपल्या चिरंजिवांकडे जावीत असा शेखसाहेबांचा मनसुबा आहे. याबाबतचा निश्चित निर्णय घेतल्यानंतर शेखसाहेबांनी या दृष्टीने झपाट्याने पावले टाकली. पक्षांतर्गत विरोध आणि आपल्या जावयाची फाजील महत्त्वाकांक्षा यांच्या विरोधात स्वत.चे सारे वजन टाकून त्यानी आपल्या चिरंजिवांना नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्षपद बहाल केले. नॅशनल कॉन्फरन्सखेरीज अन्य कोणत्याही पक्षाची काश्मिरला गरज नाही, असा सल्ला या चिरंजिवांनी पक्षाच्या व्यासपीठावरून दिला. इंदिरा काँग्रेसने आपला गाशा गुंडाळावा असेही डॉ. फारुख शेख यांनी सुचवले; परंतु त्यांचा हा सल्ला इंदिराजीना रुचला नाही. त्यानंतर इंदिराजी आणि शेख यांच्यामधील अंतर सतत वाढत गेले. राष्ट्रपतिपदासाठी निवडूक होणार हे स्पष्ट झाल्यावर नॅशनल कॉन्फरन्स विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा पाठपुरावा करील असा अनेकांचा अंदाज होता; पण या निवडणुकीपूर्वी काही दिवस स्वत: इंदिराजीनी काश्मिरचा दौरा केला. आजारी शेखसाहेबांची भेट घेतली आणि नॅशनल कॉन्फरन्सचा झैलसिंग यांना पाठिंबा मिळवण्यात यश मिळवले. प्रारंभी श्री. जी. एम. शहा यांचा झैलसिंगाना पाठिंबा देण्यास विरोध होता; परंतु स्वत: झैलसिंग यांनी आपल्या निवडणूकप्रचारदौऱ्याचे वेळी श्री. शहा यांचे मन वळवण्यात यश मिळवले. शेख अब्दुल्ला, झैलसिंग व शहा यांच्यामध्ये झालेल्या भेटीच्या वेळी याबाबतचा अखेरचा निर्णय झाला आणि नॅशनल कॉन्फरन्सने आपली सारी मते झैलसिंग यांच्या पदरात घातली.

आपल्या मुलाला मंत्रिमंडळामध्ये घेण्याची शेखसाहेबांची अतीव इच्छा आहे; परंतु त्यांच्या जावयाचा विरोध असल्याने अद्यापि ते जमू शकलेले नाही. आता या विरोधाला धूपच न घालता डॉ. फारुख शेख यांना मंत्रिमंडळामध्ये सामावून घेणे तसे काही अवघड नाही; परंतु शेखसाहेबाना ते नको आहे. नॅशनल कॉन्फरन्समध्ये वादविवाद किंवा बंडाळी न होता त्यांना आपल्या चिरंजिवांना प्रथम मंत्रिमंडळामध्ये घ्यावयाचे असून नंतर मुख्यमंत्रीपदी घ्यायचे आहे. या कामी त्यांना झाली तर इंदिराजीची मदत हवी आहे. झैलसिंग यांच्या पदरात मतांची झोळी ढिली करताना शेखसाहेबांच्या मनात हा विचार होताच. इंदिराजीबाबत त्यानी सध्या नरमाईचे धोरण स्वीकारले आहे. वादग्रस्त ठरलेल्या बिलाबाबतही त्यांनी तडजोडीची तयारी दाखवली असून केंद्र सरकारला अभिप्रेत दुरुस्त्या करून घेऊन हे विधेयक पुन्हा राज्यपालांकडे पाठवण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. शेखसाहेबांचा हा दोस्तीचा हात तसा कोरडा नाही. काश्मिरमधील सत्तातर सुलभपणे होण्यासाठी त्यांना इंदिराजीचे सहाय्य हवे आहे. आपल्या जावयाचा तिखट विरोध लक्षात घेऊन त्यानी डॉ. फारुख शेख यांना मंत्रिमंडळामध्ये घेण्याचा विचार सध्या तरी पुढे ढकलला आहे; पण आपल्या मनात काय आहे, याची जाणीव त्यांनी श्री. शहा याना दिली आहे. डॉ. फारुख आपले स्वत:चे सामर्थ्य दाखवू लागले आहेत. काश्मिरमधील आगामी निवडणुकीच्या वेळी उमेदवार निश्चित करताना मोठा पक्षातर्गत संघर्ष होण्याचा संभव आहे. पक्षाचे तिकिट देताना शेखसाहेब आणि फारुखसाहेब यांच्यावरील निष्ठा हीच मुख्य कसोटी मानली जाईल. त्या वेळी शहा कोणती भूमिका घेतात यावर शेखसाहेब अखेरचा निर्णय घेतील. शहा यानी फारुख शेख यांचे नेतृत्व मान्य करावे यासाठी सर्व प्रकारचे दडपण आणण्यात येईल. शहा जर शेखसाहेबांच्याच घरामधील नसते तर यापूर्वीच त्यांनी शहांना बाहेरची वाट दाखवली असती; पण मामला घरामधील असल्याने त्यांना डॉ. फारुख यांच्या हाती सत्ता सामोपचाराने आणि शहा यांच्या अनुमतीने जावी असे वाटते. हा वाद वाढून संघर्ष भडकतो का शहा माघार घेतात हे लवकरच स्पष्ट होईल. □

### वनस्थळी ग्रामीण विकास केंद्र आणि सर्व्हंटस् ऑफ दि पीपल सोसायटी, पुणे यांचेतर्फे ग्रामीण महिलांसाठी बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

ग्रामीण अल्पशिक्षित महिलांसाठी वरील संस्थांतर्फे हवेली तालुक्यात धायरी येथे बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण सुरू होते आहे. प्रशिक्षणानंतर या महिलांनी आपापल्या गावात परिसरातील ग्रामपंचायती किंवा समाजसेवी संस्थांच्या सहाय्यानं बालवाड्या सुरू कराव्यात असा या प्रशिक्षणाचा उद्देश आहे. यापूर्वीचा अनुभवही उत्साहवर्धक असून खंडाळा, शिरूर, हवेली, ठाणे या तालुक्यांमधून अनेक प्रशिक्षित महिला लहान गावे, वाड्या, वस्त्यामध्ये बालवाड्या चांगल्या चालवीत आहेत.

प्रशिक्षणासाठी हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेचं मार्गदर्शन आहे. धायरी येथील प्रशिक्षणासाठी हवेली तालुक्यातील महिलांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

- प्रशिक्षणाचा काल : १५ ऑगस्ट १९८२ ते १५–फेब्रु. १९८३ (एकूण सहा महिने)
- महिलांची शैक्षणिक पात्रता : किमान ९ वी उत्तीर्ण
- वयोमर्यादा : १८ ते २५ वर्षे
- फी : द. म. प्रत्येकी रु. १५.
- निवासव्यवस्था : निवास व भोजनव्यवस्थेसाठी प्रत्येकी रु. ६० एवढा खर्च द्यावा लागेल.

ज्या महिलांना आपापल्या भागातील बालशिक्षणाचं काम करावयाची हौस, इच्छा असेल त्यांनी पुढील पत्त्यावर अर्ज करावा. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑगस्ट १९८२ आहे.

पत्ता : निर्मला पुरंदरे, वनस्थळी ग्रामीण विकास केंद्र
२६ पर्वती, पुणे ४११००९.

आत्मचरित्र हे लेखकाच्या बहिर्मुख वृत्तीचे निदर्शक असते. काहीशा अंतर्मुख वृत्तीचा लेखक ज्या वेळी आत्मचरित्र लिहावयास बसतो, त्या वेळी आपल्या कौटुंबिक जीवनाचा बुरखा तो फाडू शकत नाही.
वि. स. खांडेकराच्या बाबतीत असेच झाले आहे का ?
जे खांडेकरानी टाळले ते त्याच्या मृत्यूनतर प्रकाशकानी उघडकीला आणले. खांडेकराच्या कौटुबिक जीवनाची लक्तरे वेशीवर टागली....
हा सर्वच प्रकार सामान्य वाचकाच्या दृष्टीने उद्बोधक. त्याचे हे परखड आणि दीर्घ विवेचन.

# एका पानाच्या कहाणीला १२८ पानांची पुरवणी

डॉ. भीमराव कुलकर्णी

मराठीमध्ये 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार ही स्त्रियांची खासियत आहे. पुरुषांनी आणि विशेषतः कर्तबगार पुरुषांनी त्याच्या वाटयाला जपूनच जावे. शक्यतो जाऊच नये. आपल्या कर्तबगारीचा अहंकारी भाव दुमदुमत ठेवण्याचा मोह आवरणे ही आत्मचरित्र-लेखनाची पहिली कसोटी असते. चांगल्या-चागल्यांनी याचे भान न ठेवल्यामुळे आपले हात पोळून घेतले आहेत. साहित्यिकांनी तर विशेषच. अशी बरीचशी आत्मचरित्रे वाचताना, सर्वच आत्मचरित्रे तद्दन खोटी असतात. ( All autobiographies are lies ) या बर्नार्ड शॉप्रमाणे अगदीच टोकाचे विधान करण्याची आवश्यकता नसली, तरी ही सारीच आत्मचरित्रे वाचकांच्या मनात एक असमधानाची हवा निर्माण करतात, यात कसलीच शंका नाही. केळकर, कोल्हटकर, पांगारकर. कृ. पां. कुलकर्णी, फडके, वरेरकर, अत्रे... या बाबतीत ही यादी आत्मचरित्रे लिहिण्याऱ्या सर्वच साहित्यिकांचा समावेश व्हावा इतकी वाढवायला कसलीच हरकत नाही !

वि. स. खाडेकराचे 'एका पानाची कहाणी' हे आत्मचरित्र वाचायला हाती घेतले तेव्हाही मनावर अशाच प्रकारची निराशेने ग्रासण्याची भीती होती !

कुणी काहीही म्हणो, मला तर आत्मचरित्रलेखन हे त्या व्यक्तीच्या बहिर्मुख वृत्तीचे निदर्शक वाटते. अशा व्यक्तीना 'स्व' फार प्यारा असतो आणि त्या स्वचा अहंकार जोपासण्यासाठी, आंजरण्या-गोंजारण्यासाठी आत्मचरित्रलेखन ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अत्यावश्यक बाब ठरते आणि त्यामुळे त्याचे आत्मचरित्र म्हणजे त्याच्या अंतर्मुखतेच्या अभावाचीच प्रामुख्याने लक्तरे असतात. काहीशी अंतर्मुख असणारी माणसे ज्या वेळी आत्मचरित्र लिहितात त्या वेळी आपल्या खाजगी जीवनाचे कवच उघडताना कमालीची कासावीस होतात आणि त्या पोटी स्वतःच्या तोंडावर बुरखा घेऊन आपल्या अवती-भवतीचा व्यक्तीच्या मुक्तपणे बुरखा फाडीत राहतात.

भाऊसाहेब खांडेकर त्याला अपवाद ठरतात की काय हे पाहण्याच्या कुतूहलानेच त्यांचे आत्मचरित्र हाती घेतले. त्यांनी अपवाद ठरावे अशी मनोमन इच्छा होती !

विष्णु सखाराम ऊर्फ भाऊसाहेब खाडेकर या नावाला 'साहित्यिक' म्हणून मराठीत एक फार मोठे सन्मानाचे स्थान आहे आणि त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्यांना एक अभिजात सौजन्यशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा जो साक्षात्कार होत असे, त्यामुळे तर त्यांच्याबद्दलचा जिव्हाळा सदैव मन व्यापून टाकणारा असे. आपल्या संवेदनशीलतेला आणि व्यापक सहानुभूतीला सदैव जपणारा एक व्रतस्थ लेखक अशी त्यांची जनमानसात प्रतिमा होती. त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचे हे व्यक्तिमत्त्व कसे प्रतिबिंबित होते हे पाहण्याचेच कुतूहल या ठिकाणी प्रामुख्याने होते,

त्यांच्याबद्दलच्या जाणकार वाचकांच्या किंवा रसिकांच्या या भावनेला त्यांच्या आत्मचरित्रामुळे कुठे तडा जाईल की काय, ही भीतीही ही कहाणी वाचताना पदोपदी होतीच.

खुद्द भाऊसाहेबानाही तशी भीती वाटत असावी, हे त्यांच्या प्रास्ताविक निवेदनावरून लक्षात येते. आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत भाऊंनी जी दोन पुस्तके चांगल्या रीतीने पुरी व्हावीत म्हणून ध्यास घेतला होता, त्यांपैकी 'आत्मचरित्र' हे महत्त्वाचे. १९६२ सालीच ते पुरे करण्याची त्यांची मनीषा होती. त्यानंतर तब्बल वीस वर्षांनी त्यांचे हे आत्मचरित्र अपुऱ्या स्वरूपात प्रसिद्ध होत आहे आणि तेही प्रकाशकानी जोडलेल्या ११८ पृष्ठाच्या वादग्रत आणि प्रयोजनवती पुरवणीसह !

खाडेकरांसारख्या सिद्धहस्त लेखकाला 'आत्मचरित्र' हा लेखनातला सर्वांत अवघड प्रकार वाटतो. आत्मकथेमध्ये प्रकट होणाऱ्या आपल्याबद्दलच्या जाणिवा कितपत तटस्थ असू शकतील, त्यातले जीवनदर्शन कितपत सत्य असू शकेल आणि स्वत ची पूजा बांधण्यापासून ते कितपत दूर राहू शकेल, या कल्पनेने अस्वस्थ झालेले खांडेकर या कहाणीच्या सुरुवातीलाच भेटतात. स्वत.विषयीचे संपूर्ण सत्य आपण सागू शकतो का, या प्रश्नाचे उत्तर केव्हाही 'नाही' असेच आहे; परंतु त्याचबरोबर आत्मचरित्रामध्ये येणारे दोष मात्र आपण टाळू शकत नाही, असेही नाही. खांडेकरांनी सुरुवातीला त्याचे मोठे मार्मिक विवेचन केले आहे. 'आत्म-संरक्षण हा जीवमात्राचा प्राथमिक धर्म आहे. त्या संरक्षणाची प्रेरक शक्ती अहंभाव ही आहे. त्यामुळे तत्वज्ञानाने कितीही उपदेश केला, संतानी कितीही समजा-

वून सांगितले, तरीही मनुष्याचा अहंभाव पूर्णपणे लोप पावणे जवळ-जवळ अशक्य आहे.' या भावनेची जोतीजागती ज्योत तेवत ठेवून आपल्या जीवनातील पूर्ण सत्य सांगता आले नाही, तरी मर्यादित सत्याला आपण स्पर्श करण्याचा प्रयत्न करावा आणि आपल्या आयुष्याचा आपण जो अन्वयार्थ लावला तो मोकळेपणानं समाजासमोर मांडावा, या हेतूनं आत्मचरित्रलेखनाला ते प्रवृत्त झाले आहेत. हे भान ठेवून आत्मचरित्रे नेहमीच लिहिली जातात असे नाही. खांडेकरांच्या आत्मचरित्राचा वेगळेपणा त्याच्या या साक्षेपी, प्रांजळ वृत्तीत आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या जीवनातील निखळ सत्य सांगण्याचा अट्टाहास धरला नाही, धरणे शक्यच नव्हते. त्याचबरोबर त्यांच्या वाङ्मयीन जीवनात त्यांना भेटलेल्या बऱ्यावाईट व्यक्तींचे मूल्यमापन करण्याच्या प्रयत्नही त्यांनी केला नाही. 'सर्वसामान्य भारतीय माणसांचा एक प्रतिनिधी' या भावनेने आपल्या पूर्वायुष्यातील कौटुंबिक जीवनाचा आपल्या उत्तरायुष्यातील परिपक्व भावनांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी इथे झाडा घेतला आहे. पूर्वायुष्यातला जीवनार्थ–कलह त्यांनी समरसून वर्णिला आहे आणि उत्तरायुष्यातील कौटुंबिक जीवनाच्या उंबरठ्यावर उभे राहिल्यानंतर आत डोकावून पाहण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले आहे.

असे का व्हावे, याचे नेमके उत्तर देता येणार नाही आणि ते देण्याचा प्रयत्नही कोणी करू नये. कारण ते फार गुंतागुंतीचे आहे. खांडेकरांसारख्या समर्थ लेखकानेच त्याचा वेध घेणे महत्त्वाचे होते. इतरांची कल्पनाशक्ती इथे नेहमीच दुबळी राहणार! चरित्र आणि आत्मचरित्र यांच्या सीमारेषा अशा प्रसंगी प्रकर्षाने जाणवल्याखेरीज राहत नाहीत.

जे लेखकाने बुद्धयाच टाळले आहे, ते लेखक–प्रकाशक–नात्याच्या निमित्ताने अनावृत्त करण्याचा प्रयत्न प्रकाशकांनी करावा का नाही, हाही एक विचारात घेण्यासारखा प्रश्न आहे; पण तोही विचारात घेण्यात काही अर्थ नाही. जे काही सध्या समोर आले आहे, त्याचाच साकल्याने विचार करावा एवढेच सध्या आपल्या हाती आहे!

¤

आपल्यापैकी प्रत्येकाच्या जीवनाची कहाणी मानवी जीवनाच्या ऋतुचक्रात प्रभावित झाली आहे, या कल्पनेने आपल्या या एका पानाच्या कहाणीची, शिशीर (शिशिर!) वसंत, ग्रीष्म आणि वर्षा अशी विभागणी करण्यात आली आहे, ती कितपत यथार्थ आहे असे क्षणभर वाटते तरी त्यांच्या आयुष्याचे 'शरद' आणि 'हेमंत' हे ऋतु त्यांनी वर्णिलेले नाहीत याची निश्चितच चुटपूट लागून राहते. या ऋतूंची पाने तुमच्यासमोर मांडायचीच नाहीत, असेच इथे दिसते. त्यातही या कहाणीच्या 'शिशिरा' म्हणजे दोन–अडीच पृष्ठांची खांडेकरांची आपल्या आत्मचरित्रलेखनामागची 'भूमिका' आहे. म्हणजे या कहाणीला फार तर त्रिसुपर्णच म्हणता येईल. यातला 'वसंत' म्हणजे खांडेकरांचा बाळपणीचा, मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंतचा पंधरा वर्षे वयापर्यंतचा काळ, हा १११ पृष्ठांचा आहे. पुण्यातले महाविद्यालयीन जीवन आणि कोकणात दत्तक गेल्यानंतर कंठावा लागणारा १९१४ ते १९२० पर्यंतच्या ७ वर्षांचा काळ हा १३३ पृष्ठांत वर्णिलेला असून त्याला 'ग्रीष्म' असे म्हटले आहे. १९२० पासून १९३० पर्यंतचा म्हणजे शिरोड्यास शिक्षक म्हणून त्याचा जो पुनर्जन्म झाला आणि लेखक म्हणून त्यांचे जे जीवन फुलत राहिले, त्या कालखंडास त्यांनी 'वर्षा' असे म्हटले आहे. त्यासाठी सर्वाधिक म्हणजे १७२ पृष्ठे मिळाली आहेत. ही पृष्ठविभागणी मुद्दाम नमूद करण्यामागे त्यांच्या जीवनात कोणत्या कालखंडाला अधिक महत्त्व मिळाले हे दर्शविण्याचा आहे.

सर्व आत्मचरित्र वाचून हातावेगळे केल्यानंतर आपल्या आयुष्याची त्यांनी ऋतुनिर्देशानं केलेली विभागणी कितपत सार्थ आणि समर्थनीय ठरते असा मनासमोर प्रश्न उभा राहतो. "सांगलीत माझ्या आयुष्याची पहिली सोळा वर्षे गेली. 'मनी नव्हती कशाची चिंता। आनंद अखंडित होता' असे शारदा बाळपणाविषयी म्हणते. 'माझं बाळपण' तसं निश्चित किंवा आनंदपूर्ण नव्हतं. असं असूनही सांगलीच्या ज्या स्मृती माझ्या मनात राहिल्या आहेत, त्या साऱ्या आनंददायक आहेत" असे खांडेकर सांगतात. (पृ. ९१) या भावनेतच कदाचित या कालखंडातील चित्रणाला 'वसंत' म्हटले असण्याची शक्यता आहे वडिलांचे भयंकर आजारपण, त्यापोटी आलेलं मन काचून टाकणारे दारिद्र्य आणि आईच्या आणि भावंडांच्या वृत्तीतला जिव्हाळ्याचा अभाव इत्यादी प्रकारच्या आठवणींना आयुष्याचा वसंतकाळ म्हणावे लागते, हे काही खरे नव्हे!

## अनावश्यक भाष्ये

आत्मचरित्राच्या या वसंतभागात खांडेकरांनी आपल्या बाळपणीच्या आयुष्याचे चित्र रेखाटताना वेगवेगळ्या पातळ्यांवरून असंख्य भाष्ये केली आहेत. पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या आपल्या जीवनक्रमाचे सिंहावलोकन करताना त्या त्या काळच्या आपल्या भावनांचे विश्लेषण कितपत करता येते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. खांडेकरांनी या प्रश्नाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे. 'त्या वेळी मला असे असे वाटत होते', असे पन्नास-साठ वर्षांनी सांगणे हे वस्तुतः त्या वेळी आपणाला काय वाटत होते, त्याबद्दलच्या आजच्या आपल्या भावनिक प्रतिक्रिया असतात हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे. या प्रतिक्रिया सदैव भावनिकच राहतात, त्यांना वस्तुनिष्ठ स्वरूप येऊ शकत नाही.

विसाव्या शतकातील उषःकालात एका संस्थानी वातावरणातील मध्यमवर्गीय मुलाच्या आयुष्याचे हे सुरुवातीचे चित्रण खांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीची यथार्थ कल्पना देते. अर्थातच साध्या-साध्या प्रतिक्रियांचे अलंकारिक भाषेत वेळीअवेळी वर्णन करण्याची आणि ठायी ठायी अनावश्यक भाष्ये करण्याची त्यांच्या लेखणीची खोड या आत्मचरित्र-लेखनातही दबली जात नाही. अशा स्वरूपाच्या लेखनात ती मोठ्या प्रमाणात दबली जाणे आवश्यक होते, असे मात्र सारखे वाटत राहते. फुलपाखरांना काडयाच्या पेटीत कोंबून त्यांची निर्घृण हत्या करण्याचा बाळपणीचा छंद वर्णिताना, मुलं ही देवाघरची निरागस फुलं या रूढ कल्पनेचा परिहार करण्यासाठी विनोबा, गांधी, टॉलस्टॉय अशा अनेकांना खांडेकर वेठीस धरतात! बालपणीसंबंधाची सलगपणे येणारी पाच-सहा पृष्ठे म्हणजे एक लघुनिबंध म्हणून वेगळा काढण्यास हरकत नाही, असे त्याचे स्वरूप आहे. असे अनेक लघुनिबंध या कहाणीत आढळतील. या त्यांच्या स्वभाव व लेखनशैलीमुळे त्यांच्या कहाणीचा होणारा विस्तार, तिचा ओघ खंडित करतो. कल्पनाचमत्कृतीत रमणारी खांडेकरांची लेखणी एखाददुसऱ्या

कल्पनेभोवती रुंजी घालीत राहते, त्या वेळी आपणाला आपल्या आयुष्याची 'कहाणी' सांगायची आहे, याकडे त्यांचे दुर्लक्ष होत असताना दिसते. अर्थातच आपल्या आयुष्यातील घटनांची क्रमबद्ध मांडणी असे स्वरूप या कहाणीला न राहिल्यामुळे एका परीने वाचकांना बरेही वाटते. खाडेकरासारखे संवेदनाशील मन आपल्या आयुष्यातील घटना सांगता सांगता, मनात उसळणाऱ्या भावकल्लोळांचीही नाट्यपूर्ण मांडणी ज्या पद्धतीने करीत राहते त्यामुळे वाचकांच्या जीवनविषयक समजुतीचे परिपोषण होत राहते. जे आपल्याला सतत वाटतं आणि जे आपण शब्दात पकडू शकत नाही, ते एका मोठ्या लेखकाने आपल्यासमोर भावपूर्णतेने मांडले आहे, असे वाचकांना वाटत राहते. खाडेकरांच्या लोकप्रियतेचे मर्म वाचकांच्या कल्पनेला हात घालण्याच्या त्यांच्या या लेखनशैलीत आहे. ते क्वचितच लक्षात घेतले जाते !

संस्कारक्षम वयाच्या जडणघडणीत अवतीभवतीच्या वातावरणाचा जो वाटा असतो त्याचा वेध घेण्याचा खाडेकरांचा प्रयत्न लक्षात राहण्यासारखा आहे. त्यांच्या संवेदनाशील मनाचे अनेक कोपरे या प्रयत्नातून साकार झाले आहेत. सनातनी समाजाच्या पारंपरिक कोत्या कल्पना आणि त्यामुळे मनात निर्माण झालेली सौम्य वादळे, जातिभेदाच्या तटबंदींनी होणारा मनाचा कोंडमारा, कालपर्यंत आपल्याबरोबर वावरणारा जोशी नावाचा मित्र प्लेगमध्ये वारल्यानंतर अस्वस्थ झालेलं मन आणि थोड्याच दिवसांत त्याचे झालेले विस्मरण इत्यादी प्रसंगांचे खाडेकराचे चित्रण केवळ निवेदनपर राहत नाही. खांडेकराच्या जीवनकहाणीपेक्षा त्यांच्या मनाच्या स्पंदनाचीच चित्रे त्यातून अधिकतर जाणवतात. त्यांच्या आत्मचरित्राबाबतीतच हे खरे आहे ! कॉलऱ्याच्या साथीत मेलेल्या गृहस्थाच्या बाबतीत, कऱ्हाड्यांच्या लग्नात जेवल्यामुळे तो मेला. कऱ्हाडे मंडळीत जावयाला विषप्रयोग करून मारण्याची जी रूढी आहे, त्यामुळे तो मेला, अशी समजूत रूढ होणे, पाटकर नावाच्या गौडसारस्वताच्या घरी जेवल्यामुळे मित्रांच्या कुचेष्टेचे विषय होणे, इ. घटनांच्या निवेदनातूनही अशाच प्रकारचे मनस्पंदन प्रामुख्याने जाणवते.

## आई आणि दोघे भाऊ

खांडेकरांच्या बालपणी मायेचा असा जिव्हाळा त्यांच्या वडिलांकडूनच काय तो मिळालेला दिसतो. खाडेकरांच्या आयुष्याची नऊ वर्षे चांगली सुखवस्तु म्हणावी अशा परिस्थितीत गेली. याच काळात घडलेल्या एक-दोन प्रसंगामुळे वडिलांबद्दलच्या जिव्हाळ्याच्या भावनेचा प्रादुर्भाव होऊन, अचानक दैवाचे फासे फिरल्यामुळे निर्माण झालेल्या दुर्दैवाच्या काळात याच भावबंधाने त्याना तारले. अर्धांगवायूच्या झटक्यानं निकामी होऊन वडील अंथरुणाला खिळले त्या वेळी या अल्पवयातही त्यांनी त्याची निष्ठेने सर्व प्रकारची सेवा बजावली. या बाबतीत त्याना त्याच्या भावडाची आणि आईचीही म्हणावी तशी साथ मिळाली नाही. अभ्यासाच्या आणि खेळाच्या नादात वडिलांच्या सेवेकडे आणि शुश्रुषेकडे आपले वारंवार होणारे दुर्लक्ष आठवून पश्चात्तापदग्ध झालेले आणि गहिवरलेले खाडेवर आपल्या वडिलांचे वर्णन करताना पुन:पुन्हा भावनाशील होताना दिसतात. वयाच्या नऊ वर्षांपर्यंत मिळालेल्या वडिलाच्या मायेमुळे, त्या बालवयात प्रौढ होऊन वडिलांची शुश्रूषा करण्याचे त्यांच्यात आलेले बळ पाहण्या सारखे आहे. भावंडांनी आणि आईने त्याला जशी साथ द्यायला हवी तशी न दिल्याने हळवे झालेले बालमन आपल्या कुटुंबियांबद्दलचा सारा जिव्हाळा हरवून बसल्याने व्यथित झालेले दिसते. त्यामुळे त्याच्या चित्रणामध्ये कमालीचा थंडपणा आढळतो. आईच्या स्वभावाचा लहानपणी आपणास फार राग येई, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. आपल्या आईची संवेदनक्षमता सर्वसाधारण स्त्रीहूनही कमी होती व ते शल्य आपणास कसे टोचत असे, हे खाडेकर सांगतात. मुलांना धीर द्यायचा, सांभाळायचे, त्यांच्यासाठी खस्ता खायच्या हे सारे सोडून ती आपले भाचे भडकमकर यांच्याकडे शेवटपर्यंत राहिली. तिला मुला–नातवंडांचा लळा लागला नाही, हे सांगताना ओघाने खांडेकरांनी तिच्या मृत्यूपर्यंतचे (१९४८) सलग चित्र रेखाटले आहे. या निवेदनातून खाडेकरांनी आपल्या आईबद्दलचे जवळजवळ संपूर्ण सत्य, ते कटु असतानाही, स्पष्टपणे सांगितले आहे. तशाच स्पष्टपणे आपल्या दोन्ही भावांबद्दल सांगितले आहे. धाकटा नाटककंपनीत गेला आणि अकाली वारला. मोठ्याने वडील आजारी असतानाच अभ्यासाच्या नावाखाली वडिलांना भेटणेही सोडले. कुटुंबाबद्दलच्या उत्कट भावनेच्या अभावाने, राजकारणात गती असूनही, कुटुंबाबद्दल उदासीन होत जाऊन तो कुटुंबाला भारभूत बनला. चार वर्षांच्या दीर्घ आजारानंतर झालेल्या वडिलांच्या निधनानंतर म्हणूनच आपण पूर्णपणे निराधार झालो असे उत्कटतेने वाटणे साहजिक आहे. या दुर्धर काळात ज्या व्यक्तीकडे पाहिल्यानंतर जीवनाला श्रद्धेची किनार लाभू शकेल अशी डॉ. देव यांच्यासारखी व्यक्ती त्यांना जवळून पाहावयाला मिळाली. स्वत:चं जीवन सुखी नसताना जगाला सुखी करण्यासाठी धडपडणाऱ्या डॉक्टरांचे व्यक्तिचित्र भाऊसाहेबांनी कमालीच्या भक्तिभावनेने साकारलेले आहे.

## दत्तक वडील

खांडेकराचे मूळ नाव गणेश आत्माराम खाडेकर, त्याचे विष्णु सखाराम खाडेकर कसे झाले याची चित्तरकथा 'ग्रीष्म' या प्रकरणात सांगितलेली आहे. १९१३ मध्ये मॅट्रिकच्या परीक्षेत आठवा नंबर आल्यानं मामांच्या मदतीच्या आश्वासनावर खाडेकर पुण्यास येऊन फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकू लागले. या काळात सुप्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरी याच्याशी आलेला त्यांचा संबंध ही त्यांच्या जीवनातील एक अत्यंत भाग्याची घटना. आयुष्याच्या या ग्रीष्मर्तूत गडकऱ्यांचा सहवास हा त्यांना सहारा वाळवंटातील पाण्याच्या झऱ्याप्रमाणे वाटणे साहजिक आहे. महाविद्यालयाच्या पहिल्या दोन वर्षांच्या काळात, आर्थिक ओढाताणीने गांजलेल्या त्यांच्या मनाने चुलत्यांना दत्तक जाण्याच्या कल्पनेला मान्यता देऊन आर्थिक दैन्यातून बाहेर पडण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. भाऊंचे दत्तक वडील सखारामपंत हे चुलत चुलते. कोकणात सावंतवाडीजवळच्या नानेली गावात बऱ्यापैकी जमीन-जुमला आणि सावकारी असलेल्या या गृहस्थांनी, त्यांच्या सांगली येथील बंधूच्या निधनानंतर त्यांच्या मुलाने मदतीसाठी पत्र लिहून याचना केली, तेव्हा, 'सापांच्या पिलांना मी कशाला पोसू ? असे उद्गार काढलेले होते ! याच सखारामपंतांना म्हातारपणी निपुत्रिकतेमुळे या सापाच्या पिल्लांपैकी एकाला दत्तक

घ्यावे लागले ! नियतीच्या अतर्क्य लीलेची ही सारीच चित्तरकथा अतिशय विलक्षण आहे. सखारामबापूंना एकंदर चौदा मुले झाली. त्यांतील एक विधवा मुलगी सोडून दुसर कुणीही हयात नव्हतं. तेरा मुलगे मृत्यूमुखी पडल्यानं ज्यास साप मानला, त्या भावाच्या मुलाला दत्तक घेण्याचा दुर्धर प्रसंगच मुळात विलक्षण. आत्यंतिक संशय आणि नाइलाजाने स्वीकारलेले भावाच्या मुलाचे पितृत्व यामुळे या दत्तक वडिलानी केलेला भावनिक छळ खांडेकरानी फार चांगल्या रीतीने वर्णिला आहे. मागच्या प्रकरणात आपल्या आईचे वर्णन त्यांनी जितक्या सहजतेने केले होते तितक्याच सहजतेने खांडेकरानी हे व्यक्तिचित्र परिणामकारकतेने साकार केले आहे. अशा विलक्षण माणूसघाण्या व्यक्तीच्या पदरी पडल्याने खांडेकरांच्या उमेदीच्या काळातील भावनांचे कोळसे झाले. तशाही परिस्थितीत पुण्यास येऊन शिक्षण चालू ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. वडिलांच्या विकृत मनोवृत्तीचा त्यांच्या मनावर झालेला आघात इतका खोलवर पोचला होता की, परिणामी दोन्ही वेळेला परीक्षेत त्यांना अपयश आले. बेवारशी कुत्र्याचं स्वातंत्र्य घेऊन शिकण्याच्या प्रयत्नातील विकलता वाचकांच्या मनापर्यंत या प्रकरणात खांडेकरानी भिडविली आहे. —मनोविकृतीचे एक भेदक चित्रण या दृष्टीने खांडेकराच्या दत्तक वडिलाचे चित्र—अभ्यसनीय आहे. दत्तक घेण्यासाठी आजारपणात भावाच्या मुलाला बोलावून घेऊन, संशयापोटी त्यानी बरेच दिवस केलेली चालढकल आणि दत्तक घेतल्यानंतर या मुलाबाबतीत दाखविलेला थंडपणा हा तर भावनाशून्यतेचा एक विकृत नमुना वाटतो. दत्तक घेणे म्हणजे एका मुलाला आपल्या मिळकतीचा अर्धा वाटेकरी करणं याची जाण असल्यानं हा मुलगा दत्तक घेतल्यानंतर लगेच अर्धा वाटा मागेल, या कल्पनेच भूत मानगुटीवर बसल्यानं ते दत्तक घेण्यासाठी चालढकल करू लागले परंतु त्याच्याच दृष्टीनं दत्तक न घेऊन जमण्यासारखं नव्हतं. मृत्युसमयी पाणी द्यायला किंवा मेल्यावर श्राद्ध-पक्ष करायला मुलगा हवा, या कल्पनेच्या आहारी जाऊन ते दत्तक घ्यायला तयार झाले नव्हते. त्यांनी समती दिली होती ती निराळ्याच कारणासाठी.त्यांचं दुखणं जसंजसं वाढू लागलं, तसतसं ते बरे व्हावेत म्हणून नानाविध, प्रचलीत धार्मिक उपाय करण्यात आले....काय केलं म्हणजे त्यांना बरे वाटेल अशा अर्थाचे कौल देवांना लावण्यात आले......त्याचा आजार नैसर्गिक नसून भूत-पिशाच्चयोनीतील व्यक्ती त्यांच्या बोकांडी बसली आहे. तिनंच त्यांची तेरा मुलं गिळंकृत करून विधवा मुलीचा छळ चालविला आहे. तेव्हा या छळणाऱ्या पिशाच्याला भक्ष्य काही उरलेले नाही. त्याच्यापुढे दुसरे भक्ष्य उभे करण्यासाठी हे दत्तकाचं प्रकरण उद्भवलं ! दत्तक जाताना या गोष्टीची कल्पना नसल्याने, नंतरच्या काळात या वस्तुस्थितीची जाणीव झाल्यानंतर खांडेकर हादरून गेले नसतील तरच नवल !

## दिलासा—कौटुंबिक आणि वाङ्मयीन

अशा विलक्षण अघोरी वृत्तीच्या वडिलांच्या माडीवर दत्तक गेल्यानंतर मूळ घरचा आधार तुटलेला आणि दत्तकघरचे भयावह वातावरण यामुळे उध्वस्त मनोवस्थेने आणि कोकणातील हिवतापाच्या साथीनं आत्मविश्वास गमावून बसलेल्या खांडेकराना दत्तक विधवा बहिणीच्या रूपाने जो काही दिलासा मिळाला, त्यामुळे ते तग धरू शकले. तिनंच बाबोळीसारख्या ठिकाणी त्यांना नेऊन त्यांच्या झपाट्याने बिघडत चाललेल्या प्रकृतीला सावरण्याची किमया केली आणि काही मैलाच्या अतरावर असलेल्या शिरोड्यासारख्या ठिकाणी शाळामास्तराची नोकरी चालून आली, तेव्हा पाठच्या सख्ख्या भावडाला केली नाही, इतक्या उत्कटतेने त्याचो साथ केली. शिक्षक म्हणून व्यतीत केलेला अठरा वर्षांच्या शिरोड्याचा काळ हा त्यांच्या जीवनातला कृतार्थतेचा काळ. या काळात या दत्तक बहिणीचे-अक्काचे मिळालेले प्रेम हा त्यांच्या आयुष्यातील वडिलांच्या नंतरच्या मायेचा एकुलता एक झरा.—वडील आणि अक्का याखेरीज मायेनं गुतवू शकेल असे त्यांच्या जीवनात तिसरे कोणी आलेले दिसत नाही. हा, त्यांच्या वाङ्मयीन जीवनात असा दिलासा त्याना एका फार मोठ्या साहित्यिकाने म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी दिला. 'वर्षा' प्रकरणात दत्तक वडिलांचा नाद सोडून ध्येयवादानं एका खेड्यात खांडेकराचे जीवन सर्वार्थाने कसे फुलले याचे वर्णन आहे. ध्येयवाद, स्वार्थत्याग, वाङ्मयप्रेम आणि उज्वल प्रतिभाशालित्व यामुळे एका दूरच्या झोपलेल्या खेड्यात एक चैतन्यशील व्यक्तिमत्व कसे फुलून येते हे या आत्मचरित्रातील या प्रदीर्घ प्रकरणावरून लक्षात येते. प्रकृतीने बंड पुकारले असता या काळात खांडेकरानी केलेले लेखन हा एक चमत्कार मानावा लागेल इतके ते विपुल आणि समृद्ध आहे. बालपणी अधाशीपणान केलेलं वाचन, कविता आणि नाटकं लिहिण्याचे केलेले प्रयोग, तरुणपणी गडकऱ्यांशी आलेला संबंध, कोल्हटकरांच्या नाटकांचा घेतलेला ध्यास आणि त्यातूनच गडकऱ्यांच्या लेखनाकडे पाहण्याची प्राप्त झालेली मर्मग्राही दृष्टि, किर्लोस्कर नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी गडकऱ्यानो, 'हा कोल्हटकरांच्या गादीचा वारस आहे.' या शब्दात बालगंधर्वांना खांडेकराचा करून दिलेला परिचय आणि त्यामुळे निर्माण झालेला आत्मविश्वास आणि अशा वेळी नुकत्याच लिहून झालेल्या खांडेकराचे वाङ्मय वाचून कसोशीने मार्गदर्शन करणाऱ्या कोल्हटकराचे वर्णन वाचून आजचा लेखक अवाक् होऊन जातो. एक ज्येष्ठ लेखक एका घडणाऱ्या लेखकाला आकार देण्यासाठी काय काय करू शकतो, याचे खांडेकरानी केलेले वर्णन आजच्या जमान्यात अद्भुताच्या कोटीत गणण्यासारखे आहे.

कोकणी न येता कोकणात राहून खांडेकरानी एक शाळा घडविली आणि विद्यार्थ्यांचे अमाप प्रेम आपल्या निःस्वार्थ वृत्तोने मिळविले. डॉ. भिवा अर्जुन परब, घाबरू, दत्ताराम कामत, जयराम राय, बायो इ. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील खांडेकराचा वाटा लक्षात घेण्यासारखा आहे. कोल्हटकराचे पितृवत प्रेम, त्यांच्या सान्निध्यातील पुण्या-मुंबईच्या आठवणी, ( स्वतःच्या मुलाच्या अमरावती येथे योजिलेल्या लग्नात खांडेकराचे लग्न व्हावे अशी सूचना करण्यापर्यंत हे प्रेम निर्व्याज रूप धारण करते ). मेघश्याम शिरोडकरांनी काढलेल्या 'वैनतेया' मध्ये खांडेकरांनी केलेले नियमित लेखन, त्यांच्या लेखनकलेचा अविरत झपाटा आणि त्यामुळे मिळालेली सर्वदूर प्रसिद्धी यांच्या या वर्णनाला खांडेकरांनी 'वर्षा' हे समर्पक नाव दिले आहे.

अक्काच्या आग्रहामुळे खांडेकर वयाच्या बत्तिसाव्या वर्षी म्हणजे १९२९ ला अस्पेधाला लग्नाच्या बोहल्यावर उभे राहिले. याच लग्नात

त्यांच्या मित्रप्रेमाची (मेघश्याम शिरोडकर यांच्याबद्दलच्या) कसोटी लागली.

या विवाहाच्या चित्रणाबरोबरच खांडेकरांचे आत्मचरित्र संपुष्टात येते! १९२९ पासून १९७६ पर्यंतच्या त्यांच्या लेखक म्हणून गाजलेल्या वैभवशाली जीवनक्रमाची कहाणी त्यांच्याकडून सांगितली गेली नाही. त्या दृष्टीने ही कहाणी अपुरी आहे आणि अधुरीही आहे! अधुरी म्हणण्याचे कारण, आपल्या दत्तक वडिलांचे आणि जिला पाहिल्यावर 'आई' असे उत्स्फूर्त उद्गार बाहेर पडले त्या दत्तक आईचे पुढे काय झाले हे खांडेकरांनी काहीच सांगितले नाही. वडिलांच्या हयातीपर्यंत त्यांच्या मिळकतीतील तनसडीचीही इच्छा न धरणाऱ्या खांडेकरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या मिळकतीकडे पाठ फिरवली काय?

मग त्यांच्या प्रकाशकांना सुरुवातीच्या प्रतिकूल काळात वीस हजारांचे कर्ज देण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये कुठून आले?

या अधुऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्या प्रकाशकांनी लिहिलेल्या उत्तरार्धात मिळत नाहीत, मिळणार नाहीत; परंतु ती मिळण्यासाठी त्यांनी हा उत्तरार्ध लिहिला नाही. लेखक–प्रकाशक–संबंधाचे चित्रण करण्यासाठी हा उत्तरार्धाचा ११८ पृष्ठांचा संसार उभा करण्यात आला आहे. त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकणे अवश्य आहे. किंबहुना हा उत्तरार्धाचा भागच कित्येकांना महत्त्वाचा वाटण्याचा संभव लक्षात घेऊन त्याचे नीट विवेचन केले पाहिजे.

ते करण्यापूर्वी 'आत्मचरित्र' या दृष्टीने खांडेकरांच्या या अपुऱ्या कहाणीचे थोडक्यात मूल्यमापनही करणे अवश्य आहे.

हे आत्मचरित्र अपुरे असूनही त्यामध्ये खांडेकरांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे रंग पुरेपूर उमटले आहेत. आत्मगौरव आणि परनिंदा या आत्मचरित्रातल्या सर्वसाधारण दोषांनी ते डागळले नाही. आपल्या संघर्षमय जीवनाच्या कहाणीतील नाट्य, त्यांनी ते अधिकाधिक नाट्यपूर्ण रीतीने मांडण्याची शक्यता असताही, कमालीच्या संयमाने साकार केले आहे. नाटकीपणाकडे किंवा भडकपणाकडे त्यांनी ते झुकू दिले नाही. त्यांचे सौजन्य, त्यांची व्यापक सहानुभूती, त्यांचा जीवनविषयक उदात्त दृष्टिकोन, त्यांचा ध्येयवाद इ. महत्त्वाची वैशिष्ट्ये सौम्य रीतीने इथे प्रकटली आहेत. आपल्या जीवनातील अपयशांची यथार्थ कल्पना स्पष्टपणे देणारे एक सुजाण, सुसंस्कृत आणि स्वप्नवेडे मन इथे पदोपदी दिसून येते. खांडेकरांचे हे आत्माविष्करण कित्येकांना अत्यंत सौम्य वाटले तरी वाङ्मयीन दृष्टीने ते निराशाजनक खास नाही. मराठीतील साहित्यिकांच्या आत्मचरित्रांमध्ये ते निश्चितच वेगळे वाटावे असे आहे, चांगलेच उजवे आहे. आपल्या जीवनाच्या कहाणीला कादंबरीचे रूप देण्याच्या अलीकडील साहित्यिकाच्या प्रवृत्तीला त्यांनी कुठेच थारा दिलेला नाही.

## पुरवणी कशासाठी?

'एक लेखक–एक प्रकाशक : १९३८ ते १९७६' ही प्रकाशकांनी या अपुऱ्या आत्मचरित्राला जोडलेली ११८ पृष्ठांची पुरवणी. ती कोणी लिहिली? अर्थातच खांडेकरांचे ३८ वर्षांचे मातबर प्रकाशक रा. ज. देशमुख यांनी. ती देशमुखांनी लिहिली हे स्पष्ट असले तरी; सामान्य वाचकाला ती त्यांनी लिहिली हे चटकन उमगणार नाही. कारण पुरवणीसाठी योजिलेल्या मोठ्या अक्षरातील शीर्षकाखाली लेखक म्हणून त्यांचे नाव निर्दिष्ट केलेले नाही!

प्रकाशकांनी सुरुवातीला लिहिलेले मनोगत त्यांच्या उद्दिष्टांची कल्पना येण्याच्या दृष्टीने खूपच बोलके आहे १९३८ ते ७६ पर्यंतचा खांडेकरांच्या आयुष्याचा आपल्याला माहीत असलेला पट उलगडून दाखवावा आणि त्याचबरोबर प्रकाशक म्हणून त्यांचे–आपले संबंध कसे होते हे जगाला समजावे म्हणून आपण हा प्रपंच केला आहे हे त्यांनी सांगितले आहे. '१९३२ ते ३८ (वास्तविक तो १९२९ ते ३८ असा पाहिजे) हा कालखंड मला माहिती नाही. त्याबद्दल कोणी लिहू शकते का याची खूप धडपड केली; पण यश आले नाही.' या त्यांच्या विधानामुळे खांडेकरांचे चरित्र संपूर्णपणे साकार करावे, या प्रेरणेने ही पुरवणी साकार झाली आहे, असे वाटण्याचा संभव आहे; परंतु 'पुरवणी'चे नीट अवलोकन केले असता हा त्यांचा हेतु तसा नाही हे लक्षात येते.

'प्रकाशक म्हणून देशमुखांनी खांडेकरांना जितके एक्सप्लॉइट करता येईल तितके केले. त्यांचे पैसे दिले नाहीत. आपल्या स्वार्थासाठी त्यांच्याकडून लेखन करवून घेऊन त्यावर खूप पैसा मिळविला' इ. गैरसमजुतीचे निराकरण करण्यासाठी आणि खांडेकर हे कसे पक्के व्यवहारी लेखक होते, मनाने खंबीर कसे होते आणि त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक झीज सोसून त्यांची सेवा कोणत्या पातळीवर जाऊन आपण केली आणि त्यांचा एकही पैसा आपण कसा बुडविला नाही, हे भक्कम पुराव्याने जगासमोर मांडण्यासाठी प्रामुख्याने ही पुरवणी सिद्ध झाली आहे. खांडेकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांनी दिलेल्या मनस्तापामुळे त्यांचे अंतरंग साधार उघडे करणे हेही प्रकाशकांना अत्यावश्यक वाटले, असे दिसते. एक महान लेखक आणि कर्तबगार प्रकाशक यांच्या संबंधाची ही हकीकत अभूतपूर्व वाटावी अशीच आहे. तिच्यातून खांडेकर आणखी उजळून निघतात का, का जनमानसामध्ये असलेली त्यांची प्रतिमा कलंकित होते या प्रश्नाचे उभयपक्षी उत्तर देणे शक्य आहे. एखादा प्रकाशकही कसा जगावेगळा असू शकतो, आपल्या लेखकासाठी तो किती करू शकतो आणि एवढे केल्यानंतर आपण जे काही केले ते जगाने समजावून घ्यावे ही त्याची अंतःप्रेरणा किती जबरदस्त असू शकते, याचे प्रत्यंतर येण्यासाठी मानसशास्त्रीय दृष्टीने ही पुरवणी निःसंशय अभ्यसनीय आहे.

एक स्वत्वनिष्ठ लेखक आणि स्वत्वनिष्ठ प्रकाशक यांनी आपल्या व्यवहारातून व्यवहाराबाहेर जाण्याचा प्रयत्न केला. रक्ताच्या नातेवाइकांकडून मिळाली नाही अशी माया, असे प्रेम, असा जिव्हाळा एकमेकांबद्दल निर्माण केला आणि तरीही शेवटी या उत्कट जिव्हाळ्याची परिणती उत्कट स्नेहभावात न होता ती व्यावहारिक पातळीवर राहण्यातच झाली, ही या साऱ्या हालचालीमागची शोकांतिका अभ्यासूंना उद्बोधक वाटावी अशीच आहे.

मराठी साहित्यात 'रा. ज. देशमुख' या नावाला प्रकाशक या दृष्टीने चांगलेच महत्त्व आहे. चिकित्सक सौंदर्यदृष्टी, वाङ्मयाबद्दलची अव्वल दर्जाची जाणकारी, उत्तमोत्तम लेखकांना हेरून त्यांच्याकडून जिद्दीने आणि प्रयत्नपूर्वक उत्तम प्रकारचे साहित्य लिहवून घेण्याचा हिकमती बाणा, आपण प्रकाशित करीत असलेल्या प्रत्येक

पुस्तकावर स्वतःच्या चोखंदळपणाची छाप ठेवायची महत्त्वाकांक्षा आणि स्वतःच्या कष्टाने व्यवसायात अपूर्व यश प्राप्त करून घेऊनही, त्याला बाजारी स्वरूप येऊ न देता, स्वतःच्या हाताने सहजगत्या जरूर वाटल्यास स्वतःचा व्यवसाय उधळून देण्याइतकी इतरांना अव्यवहारी वाटावी अशी मुलखावेगळी आततायी वृत्ती, एखाद्यावर प्रेम करताना बेहोष होणारा आणि द्वेष करतानाही पराकोटीला जाणारा, अशा परस्परविरुद्ध गुणांचे रसायन असणाऱ्या रा. ज. देशमुख नावाच्या या व्यक्तीने मराठी प्रकाशनव्यवसायात एक इतिहास घडविला आहे, हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही.

परंतु मराठी साहित्यात इतिहास घडविणारा एक फार मोठा लेखक आणि तसाच एक जिद्दी, जबरदस्त प्रकाशक यात 'माणूस' म्हणून कोण मोठा, असा प्रश्न कधी कुणाला पडला नाही. ते जड झालेले पारडे लेखकाच्याच वाट्याला सदैव येत गेले. लेखक म्हणून आणि माणूस म्हणून खांडेकरांची मराठी साहित्यातील प्रतिमा सदैव सन्मानाची आणि आदरणीयच राहिली. या प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रकाशकांचा या लेखनामागचा हेतू असावा, असे वाटत नाही.

### अलौकिक सेवा

खांडेकरांच्या उत्तरायुष्यात त्यांच्या अत्यंत विकलावस्थेत देशमुख पति-पत्नींनी निरपेक्ष वृत्तीने त्यांची जी सेवा केली, ती कधीच कुणाला नाकारता येणार नाही. इसबाने सारे अंग चिघळले असताना त्याना ज्यांनी पाहिले त्यांच्या डोळ्यांपुढून ते भयावह दृश्य कधीच पुसले जाणार नाही. अशा वेळी देशमुखांनी, विशेषतः सौ. देशमुखांनी (बाईंनी), त्यांची जी सेवा केली तिला कोणत्याही प्रकारे कमी लेखणे म्हणजे माणसाच्या सद्भावनेचे मोल कमी करण्यासारखे आहे. अर्धांगवायूने वडील अंथरुणात खिळले असता लहानपणी खांडेकरांनी केलेली त्यांची सेवाशुश्रूषा काहीच नव्हे, इतक्या उत्कटतेने देशमुखांनी त्यांची सेवा केली. खांडेकरांचे मानसन्मान जपले, ते मिळविण्यासाठी प्रकाशक या नात्याने जेवढी करता येईल ती धडपड केली, खांडेकरांना पूर्ण अंधत्व आले असता, स्वतःची कामे आणि महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून बाईंनी संपूर्णपणे खांडेकरांचीच चिंता वाहिली. रात्रंदिवस त्यांची कन्येप्रमाणे साथ-सोबत केली, हे सारे विलक्षण म्हणावे अशा कोटीतले आहे यात शंका नाही !

देशमुख पतिपत्नी कसेही असले तरी त्यांनी हे जे अलौकिक दिव्य केले त्याचे महत्त्व नाकारण्याचा करंटेपणा कोणीही करू नये.

मात्र त्याचबरोबर या पुरवणीमध्ये दिसून येणारे देशमुखांचे मातीचे पायही ओळखणे अगत्याचे आहे.

खांडेकरांचे आजारपण, औषधपाणी, आदरातिथ्य यांसाठी फार मोठ्या प्रमाणात देशमुख आणि कंपनीला खर्च करावा लागला तरी खांडेकरांनी उसने दिलेल्या पैशाचे व्याज वाजवून घ्यावे आणि मानधनापोटी येणे असलेल्या रकमेवरही व्याज आकारावे, या व्यवहारातील खांडेकरांचा व्यवहारी बाणा आणि आपला त्या व्यवहारापलीकडची नाती जपण्याचा उपजत बाणा यांमधील विसंगती स्पष्ट करण्याकरता आणि खांडेकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनी रुपये-आणे-पैच्या हिशेबाने आपली किंमत करावी या कल्पनेने व्यथित झालेल्या देशमुखांनी पुराव्यासाठी सत्याविष्करण करून आपल्याबद्दलच्या गैरसमजाचे निराकरण करण्यासाठी आणि मुलांनी आपले कर्तव्य करण्यात कशा प्रकारची अक्षम्य हेळसाड केली हे जगाला सांगण्यासाठी हा सारा प्रपंच केला हे स्पष्ट दिसते. खांडेकरांनी आपणाला धाकटा भाऊ मानले, आपण त्यांचे धाकट्या भावापेक्षाही अधिक केले, खांडेकरांच्या मुलांनी त्याची जाण ठेविली नाही, ही उद्वेगाची भावना जशी त्यातून दिसते तशीच कुणा प्रकाशकाने खेळवावे इतके साधे खांडेकर कधीच नव्हते, तसे ते मोठे धोरणी, पक्के व्यवहारी आणि शेवटी जिव्हाळ्याने जोडलेल्या नात्यापेक्षा रक्ताच्या नात्याचीच कदर करणारे होते, या सत्याचा साक्षात्कार वाचकांना घडवावा हा हेतू देशमुखांनी कुठे लपविलेला नाही. त्यापोटी त्यांच्या लेखनात आलेला मतलबीपणा त्यांना कुठे टाळता आला नाही. कितीही प्रयत्न केला तरी माणूस आपणाला लपवू कसा शकत नाही हेच त्यातून प्रामुख्याने स्पष्ट होते.

आपल्या प्रकाशनव्यवसायाच्या यशस्वितेचे सारे श्रेय देशमुख आपल्याकडेच घेतात. जाणकारांच्या दृष्टीने याबाबतीत त्यांचे सुरुवातीचे भागीदार भगवंतराव देशमुख यांच्यावर अन्याय झालेला आहे हे मत दुर्लक्ष करण्यासारखे नाही. खांडेकरांनी स्वतःजवळचे वीस हजार रुपये बँकेत सुरक्षित न ठेवता एका धडपडणाऱ्या प्रकाशकाला दिले, हा त्यांचा मोठेपणा लपवून त्यांच्या व्याज घेण्याचे भांडवल देशमुख करतात हे कुणाच्याही सहजगत्या लक्षात येते. खांडेकरांच्या सांगण्यानुसारच आपण खांडेकरांना भेटावयास येणाऱ्या-जाणाऱ्यांवर बंधन घालीत होतो, त्यात आपल्या अधिकारशाहीपेक्षा खांडेकरांचीच इच्छा प्रधान होती, हे देशमुखांचे म्हणणे खरे असले तरी पूर्णतः खरे नाही. १९६५ च्या सुमारास विद्यापीठाच्या कामाकरता जाण्याचा प्रसंग आला असता मी खांडेकरांच्या कोल्हापूर येथील पूर्वीच्या जुन्या घरी सहज भेटावयास गेलो. डॉक्टरांनी त्यांच्या भेटीस मनाई केल्याची पाटी बाहेर लावली होती. सहज नमस्कार करून बाहेर पडावे म्हणून मी गेलो तर माझ्यासारख्या त्या वेळी कोणीही नसलेल्या माणसाबरोबर खांडेकरांनी अखंड सहा तास गप्पांत घालविले ! खांडेकरांना माणसांची विलक्षण ओढ होती आणि मनातून कितीही वाटले तरी खांडेकरांनी प्रकृतीला न जुमानता भेटायला येणाऱ्या माणसाची सदैव कदरच केली हे अनेक वेळा अनेकांच्या अनुभवाला आले. खांडेकर आपले ऐकणाऱ्यातले नव्हते असे वारंवार देशमुख सांगत असता, आपल्या सांगण्यामुळे खांडेकरांनी आणीबाणीत आपल्या पदव्यांचा त्याग केला नाही असे अवधानाने सत्य सांगून जातात. विकलावस्थेत इचलकरंजीच्या संमेलनाला हजर राहिलेल्या खांडेकरांनी आणीबाणीत कऱ्हाडच्या संमेलनाला हजर राहायचे नाही असे ठरविले. संमेलनाच्या दिवशी सकाळी यशवंतरावांच्या झालेल्या सहज भेटीत यशवंतरावांच्या इच्छेनुसार खांडेकरांना कऱ्हाडला आणण्याची देशमुख हमी घेतात आणि तातडीने खांडेकर पुण्याहून कऱ्हाडला जायला निघतात, यातून काय सूचित होते ? खांडेकरांच्या या निर्णयामुळे ते त्या वेळी कित्येकांच्या मनातून उतरले होते हे सांगितले पाहिजे. खांडेकरांना, इतरांनी पदव्या सोडीपर्यंत तुम्ही पदव्या टाकू नका, हे सांगून देशमुखांनी खांडेकरांना किती मोठ्या सन्मानापासून वंचित केले, या

कल्पनेने आजही आपले मन व्यथित होऊन उठते.

देशमुखांचे प्रेम जसे उत्कट आणि गुदमरविणारे असते, तसेच संबंधित व्यक्तीकडून त्यांच्या अपेक्षेला धक्का बसला तर देशमुखांमधली Sadist (परपीडक) वृत्तीही उफाळून येते. या त्यांच्या वृत्तीचा अनुभव त्यांच्या सर्वच लेखकांना आणि स्नेह्यांना आलेला आहे. त्याचे प्रत्यंतर देण्याच्या दृष्टीनेही ही पुरवणी अभ्यसनीय आहे,

## यशवंतरावांची भलावण

इचलकरंजी–साहित्य–संमेलनापासून आपण आजारी होतो असे देशमुख सांगतात. या त्यांच्या विधानामागचे गूढ त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या स्नेह्यांना नेहमीच पडले आहे. देशमुख तर इचलकरंजी–कराड येथील संमेलनांतून आणि साहित्यपरिषदेच्या कार्यात नको तितक्या उत्साहाने वावरत होते. मग हा आजार कुठला आणि कसला ? देशमुखांनी ते अधिक स्पष्ट करणे आवश्यक होते. दुर्गाबाई भागवतांनी कऱ्हाडच्या संमेलनात पहिल्याच दिवशी संध्याकाळी सर्व पायंडे मोडून, स्वागताध्यक्षांच्या अगोदर भाषण करून आणीबाणीवर कडक टीका केली हे पृ. ५२७ वरील विधान तर धादांत चुकीचे आणि गैरसमजाचे आहे. कराडच्या संमेलनाच्या कार्यक्रमाचे महामंडळाचा सेक्रेटरी या नात्याने मीच संचलन केले असल्यामुळे असे मुळीच घडले नाही, हे सांगण्यास माझ्याइतका दुसरा महत्त्वाचा साक्षीदार कोणी असू शकणार नाही. दुर्गाबाईंना दोषास्पद ठरवून यशवंतरावांची केलेली अनावश्यक भलावण, देशमुखांच्या यशवंतरावधार्जिण्या वृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे.

कोणी काही विधान केले तर त्याला फटकारून विरोधी विधानाने त्याला निरुत्तर करू पाहायचे, अशा स्वभावाच्या मंडळीत देशमुख पतिपत्नींचा समावेश खुशाल करावा. त्याचे गमतीशीर प्रत्यंतर देशमुखांच्या लेखनातूनच मिळते. बाईंनी खांडेकरांची केलेली सेवा पाहून भाऊंना भेटायला आलेले कॉन्टिनेंटलचे अनंतराव कुलकर्णी म्हणाले की, ‘शालिनीबाई, तुम्ही म्हणजे भाऊंना एक पाचवी मुलगी मिळाली !’ बाईंनी अनंतरावांना ताडदिशी सांगितले, ‘नाही हं अनंतराव, तुम्हाला माहीत आहे वडिलांची मी किती लाडकी होते ती ! मी रामभाऊंची बायको म्हणून भाऊंचे करते. ते प्रेमाने व कर्तव्यभावनेनं केलं तरी त्यामागची भूमिका रामभाऊंची बायको ही आहे, भाऊंची मुलगी ही नाही !’ (पृ. ४५०). आता ५३५ पृष्ठावरील वर्णन पाहा –

‘जिन्यावरून पडल्यानंतर आलेला भाऊंचा ताप आता थांबला होता; पण भाऊंची अवस्था लहान मुलासारखी झाली होती. सिस्टर एनिमा देऊन जात; पण कमोडवर बसविण्यापासून ते सगळे साफ करणे बाईलाच करावे लागे. ते आता लहान मुलाहून लहान मूल झाले होते. ते बाईला म्हणत, ‘सुलुताई, तुम्ही आता माझी आईच आहात.’ बाई हसून म्हणे, ‘तसे नाही भाऊ, आमच्या बाबांचे नव्हतो का आम्ही करत ?’ या उद्‌गाराने नकळतच बाईंनी मुलीचे नाते कबूल केले आहे. अनंतराव तर हेच म्हणत होते ना ?

देशमुखांनी खांडेकरांच्या मंदा आणि अविनाश या मुलांबद्दल लिहिलेले सारे संपूर्ण सत्य आहे असे मानले तरी, मानलेल्या का होईना चुलत्याची भूमिका विसरून ते वाजवीपेक्षा कठोर झाले आहेत. १९७५ साली अविनाशच्या हलगर्जीपणामुळे खांडेकर जिन्यावरून पडले. त्या वेळी त्याला ठपका देताना त्याच्याबद्दलचे १९५३ चे खांडेकरांचे पत्र उद्धृत केलेले पाहून आपले मन अस्वस्थ होते. देशमुखांनी हा मोह टाळला असता तर या पुरवणीचे मोल शतपटींनी वाढले असते; परंतु माणसाला आपला स्वभाव बदलता येत नाही. खांडेकरांनी देशमुखांच्या स्वभावाबद्दलची लिहिलेली पत्रे, खांडेकरांना देशमुख किती चांगल्या रीतीने कळले होते याची निदर्शक आहेत.


खांडेकरांबद्दलचे संपूर्ण सत्य सांगण्याच्या आविर्भावात देशमुखांनी आपल्या स्वभावाशी सुसंगत असलेल्या दुसऱ्या एका विशेषाचे नकळत का होईना; परंतु फार सुंदर प्रदर्शन केले आहे. हे प्रदर्शन अर्थातच स्वपत्नीबद्दलच्या स्वभावनेचे (मध्येच एका ठिकाणी खांडेकरांच्या पत्नीबद्दल केलेले विधान अनुचित वाटावे असेच आहे.)

सुलोचनाबाईंनी खांडेकरांची सेवा ज्या पद्धतीने केली ती पाहून खुद्द रामभाऊ देशमुखच अचंबित झालेले दिसतात. वतनदारी रक्त नसानसातून सळसळत असलेल्या देशमुखांना स्वस्त्रीचे हे दिव्य दिपवून टाकताना दिसते. सुलोचनाबाईंच्या परिणतप्रज्ञ संस्कृतीचे आणि देशमुखांच्या शिष्टमान्य अशा पारंपरिक परंतु आयुष्याची लहानपणी परवड झाल्याने अंगी भिनलेल्या रांगड्या संस्कृतीतील हे पराकोटीचे अंतर, सुज्ञ वाचकांच्या दृष्टीनं उद्‌बोधक वाटावं असेच आहे; परंतु खांडेकर-कुटुंबियांच्या निंदेच्या पार्श्वभूमीवर स्वपत्नीच्या यथार्थ गौरवाची ही गाथा काहीशी अस्वस्थ करणारी आणि देशमुखांच्या स्वभावाशी विसंगत वाटावी अशी आहे.

असे वाटावे हा देशमुखांच्या हेतूचा पूर्ण पराभव आहे.

□


तिसरी आवृत्ती
संपत आली



सांगत्ये ऐका
रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

श्यामचा संसार

कथा ४४

# श्यामची आई

फिरोझ रानडे

'राधा, खूप भूक लागली आहे बघ.जेवायला काही तरी कर बघू.' एका संध्याकाळी श्याम कचेरीतून येता येता म्हणाला. 'आत्ता करते–पाच मिनिटात!' राधा मोठ्या उत्साहाने म्हणाली व त्याच उत्साहाने स्वैपाकाला लागली. नवऱ्याला भूक लागली असली म्हणजे स्वैपाक करण्यात बायकाना एक तऱ्हेचा खास आनंद होत असतो. राधाला तसाच खास आनंद झाला होता व त्याचाच तो उत्साह होता.

श्यामने हातपाय धुऊन कपडे बदलले व स्वैपाकघरात राधा काय करते आहे बघायला जाणार तेवढ्यात दारावरची घंटी वाजली. 'आता ह्या वेळी कोण आले असेल बुवा?' असा मनाशी प्रश्न करत श्यामने दार उघडले, तर दारात त्याचा बालपणीचा मित्र गोविंदा उभा होता. आता ह्या मित्राला गोविंदा म्हटले खरे; पण हा गोविंदा ४५–४६ वर्षांच्या पूर्वी एका रेयॉनच्या फॅक्टरीत वर्क्स-मॅनेजर होता. दहा वर्षांपूर्वी तो अमेरिकेत गेला होता व आता तेथेच स्थायिक झाला होता. त्याला ३–४ वर्षांनी काही सुट्टी मिळे. तशा सुट्टीत तो हिंदुस्थानात आला होता. श्यामची आई गेल्याचे कळले म्हणून तो सवड मिळताच त्याला भेटायला आला होता.

अर्थातच गोविंदाने येता येता काही आईचा विषय काढला नाही. मुंबईला कधी आलात? मुलीचे लग्न कसे झाले? मुलाना कोणत्या शिक्षणक्रमात घातले आहे? वगैरे वगैरे. गप्पाबरोबर पेय-पान व राधाने खाण्याकरता केलेले काही किडुकमिडुक खाणे चालले होते. तसे बोलता–बोलता गोविंदा म्हणाला, 'अशी कशी रे अचानक गेली तुझी आई? जानेवारीत तर तुझ्या मुलीच्या लग्नाला आली होती ना? कधी गेली?'

'झाले की आता सात-आठ महिने! श्याम असे म्हणून गेला न एकदम त्याचे त्यालाच कसनुसे झाले. जसं एखादा सिनेमा कधी बघितलात वा तुमची बदली होऊन किती दिवस झाले असे विचारल्यावर माणूस जसा ४–५ महिने वा ७–८ महिने झाले असे सहजगत्या म्हणतो तसे आपण आईच्या बाबत कसे म्हणून गेलो? सिनेमा वा बदली होण्याइतकी नेहमीची गोष्ट आहे आई जाणे म्हणजे?

आता तो गोविंदाशी बोलत होता, त्याच्या बरोबर खात–पीत होता खरा; पण एखादा माणूस शरीराने जसा एखाद्या ठिकाणी असतो, पण मनाने नसतो असे म्हणतात, तशी त्याची स्थिती झाली. तो दिवस वा ती काळरात्र आपण आयुष्यात कधी विसरणार नाही असे समजलो होतो. त्या दिवसानंतरचे आयुष्य आता पूर्वीसारखे काही केल्या रहाणार नाही. काचेचे एखादे भांडे जसे फुटावे व परत जोड दिला तरी त्याला पूर्वीचे रूप येत नाही वा त्याचा पूर्वीसारखा उपयोग होत नाही, तसे आपले आयुष्य होणार असे आपण समजून चाललो होतो व आता सहजगत्या म्हणतो आहोत, की सात–आठ महिने झाले की आईला जाऊन!

त्या संध्याकाळी श्याम व राधा कोणा Film Soisety च्या चित्रपटाला जाणार होते; पण वेळेवर जावे की जाऊ नये असा वाद निघाला व शेवटी जाऊ नये असे ठरले व एका दृष्टीने झाले ते बरेच झाले असे म्हणावयाची वेळ आली. रात्री जेवणे वगैरे झाली होती. ९॥ च्या सुमारास नाशिकहून भाऊचा फोन आला की, आईला बरे नाही आहे व तिला इस्पितळात दाखल केले आहे. तेव्हा मुंबईच्या बहिणीना घेऊन ताबडतोब निघावे. भाऊच्या आवाजावरून तसं काही गंभीर आहे असे वाटले नव्हते. आईला पूर्वी दोन हार्ट–अॅटॅक येऊन गेले होते पण एकंदर तिची प्रकृती उत्तम नाही, तरी बरी होती.

श्यामच्या तीन बहिणी मुंबईला होत्या. एक भायखळ्याला, एक अंधेरीला व एक ठाण्याला. सुदैवाने अंधेरीच्या व भायखळ्याच्या बहिणीकडे टेलिफोन होते. त्यामुळे त्यांच्याशी बोलून काय करावयाचे ते ठरवता येत होते. भाऊच्या बोलण्यावरून फार गंभीर आजार असावा असे वाटले नव्हते व आता अशा अडाणी वेळी तिच्या घरी ठाण्याला कोणाला पाठवणे शक्यही नव्हते. तेव्हा तिला दुसऱ्या दिवशी कचेरीत जाऊन मुलांपैकी कोणी तरी सांगावे असे ठरले.

नाशिकला जाणाऱ्या सर्व मेलगाड्यांची वेळ निघून गेली होती. आता फक्त १२॥ची पॅसेंजर होती; पण ती पोचणार होती सकाळी ६॥ वाजता. दुसरा मार्ग म्हणजे मुंबई-नाशिक टॅक्सीने जावयाचे हा; पण आता दिवसा-ढवळ्या गाड्यांतून चोऱ्या होताहेत – जिवाची शाश्वती राहिली नाही. अशा वेळी दोन बहिणीना घेऊन टॅक्सीने जावे की नाही असा सगळ्यापुढे प्रश्न पडला. प्रवासात काही वेडे–वाकडे झाले तर? शेवटी काय वाटेल ते होवो नाशिकला ताबडतोब पोहोचणे आवश्यक आहे असे सर्वांस वाटले व टॅक्सीने जावयाचे ठरले. आता टॅक्सीने जातो आहोत म्हणजे ठाण्यावरून जाणार तर ठाण्याच्या बहिणीला पण घ्यावे असे ठरले.

दादरच्या टॅक्सी–स्टॅंडवर दोघे मेव्हणे व दोघी बहिणी जमल्या. ज्या टॅक्सीचा नंबर होता त्या सरदारजीने मध्ये ठाण्याला जावयाचे साफ नाकारले. तो म्हणाला, 'लोक दहा मिनिटात निघू वगैरे म्हणतात; पण तास तास घेतात.' त्याचे म्हणणे बरोबर होते; पण त्यामुळे श्यामचा प्रश्न जास्तच बिकट झाला.

मग श्याम टॅक्सीच्या कचेरीत गेला. महाराष्ट्राबाहेर फार वर्ष राहिला असल्यामुळे त्याला हिंदीत बोलण्याची फार सवय झाली होती. तेथे जाऊन तो बाहेर उभ्या असलेल्या एका माणसाला हिंदीमध्ये आई आजारी आहे वगैरे सांगू लागला. तो माणूस श्यामच्या बोलण्याकडे लक्ष देण्याऐवजी श्यामकडेच निरखून पाहू लागला व श्यामला एकदम म्हणाला, "तू श्याम ना?" ह्या प्रश्नाने श्याम चकित झाला. तो गाडीवान श्यामच्या शाळेतच होता म्हणे. गाडीवान

माहितीचा निघाल्यामुळे श्यामच्या मनातली चिंता जरा कमी झाली व तो म्हणाला, 'गड्या, आता आपण इतक्या वर्षांनी भेटतो आहोत व आता तुला परिस्थिती काय आहे माहीत आहे तर ताबडतोब गाडी काढ कसा!' व खरंच त्याने ताबडतोब गाडी काढली.

रस्त्यात त्यांनी ठाण्याचे बहिणीला घेतले त्या वेळी रात्रीचे ११॥ वाजले होते. श्यामला व अंधेरीच्या बहिणीला अशा आडनाडी वेळेला पाहून त्याची बहीण भांबावून गेली. श्यामची लहान बहीण असली तरी ती आता ४५–४७ वर्षांची होती. दोन नातवंडांची आजी होती. बहुतेक फार काही गंभीर नसावे असा श्यामने तिला दिलासा दिला व आता टेलिफोन आला आहेच तर जाऊन यावे वगैरे म्हणाला.

साधारण २।–२॥ च्या सुमारास गाडी कसाऱ्याच्या घाटात आली व सगळयांच्या हृदयात चर्र झाले. वनात मोठा वणवा पेटला होता! बहिणी आता फक्त रडावयाच्याच बाकी राहिल्या होत्या. डोंगराच्या या टोकापासून तो त्या टोकापर्यंत हा लालबुंद आगीचा डोंब पसरला होता. सगळ्या बाजूंनी आगीचे लोट येत होते. त्यातून टॅक्सी काढता येईल की नाही असा संशय निर्माण झाला. सुदैवाने गाडी निघाली व ४॥ च्या सुमारास नाशिकला ते सगळे पोहोचले.

भाऊने इस्पितळाचे नाव सांगितले होते. ते गावाबाहेर घरापासून १–१॥ मैलाच्या अंतरावर होते. टॅक्सी सरळ तेथेच न्यावयास सांगितली. टॅक्सी तेथे पोहोचताच बहिणी इस्पितळाच्या फाटकातून आत गेल्या व श्याम टॅक्सीवाल्याचे पैसे देऊ लागला; पण तो गाडीवान फार अनुभवी दिसला. तो म्हणाला, "तू प्रथम इस्पितळात जाऊन चौकशी कर आईची प्रकृती कशी आहे ते. मग पैसे दे! पैसे काय कोठे पळून जाताहेत का?"

तोपर्यंत इस्पितळाच्या इमारतीचा दरवाजा उघडला होता. रात्रपाळीच्या दोन परिचारिका श्याम व त्याच्या बहिणीना पहाताच त्यांना काय सांगावे ह्या दृष्टीने एकमेकांकडे पाहू लागल्या. "त्यांना घरी नेले ... एक दोन तासांपूर्वी", त्यातली एक चाचरत म्हणाली. "पण प्रकृती कशी आहे त्यांची?" अंधेरीच्या बहिणीने जवळजवळ ओरडून विचारले. "तशी बरी नाही!" असे म्हणत त्या आतल्या खोलीत निघून गेल्या!

प्रकृती बरी नाही तरी पण घरी नेले आहे म्हणताच त्या भावा-बहिणीच्या डोक्यात लख्ख प्रकाश वा गडद अंधार पडला; पण अजुनी आशा होती. टेलिफोन रात्री ९॥ ला आला होता. आता सकाळचे ५–५॥ वाजत आले होते. म्हणजे जवळजवळ ७–८ तास होत आले होते. काय सांगावे डॉक्टरांच्या औषधाने ती बरी झालीही असेल. कदाचित् हार्ट-अॅटॅक सौम्य असेल. तेव्हा डॉक्टरांनी घरी घेऊन जा म्हणून सांगितले असेल. वेडी आशा! आशा ह्याचा अर्थच वेडी आशा! मग परत तिला वेडी आशा कशाला म्हणावयाचे?

ती सर्वजण बाहेर उभ्या असलेल्या गाडीत जाऊन बसली. आता त्या गाडीवानाच्या दूरदृष्टीचे कौतुक वाटले, नाही तर सकाळी ५–५॥ वाजता त्या तिघी जणी तश्या मानसिक स्थितीत कश्या घरापर्यंत गेल्या असत्या? परत टॅक्सी वा रिक्षा मिळायला वेळ लागला असता व घरी पोहोचायला उशीर लागला असता. खरं म्हणजे आता उशीरा पोहोचले असते काय व लवकर पोहोचले असते काय, त्याने काय फरक पडणार होता? पण मनात एक पक्के होते की घरी लवकर पोहोचले पाहिजे.

जिना चढून सगळे वर गेले. दार उघडेच होते. जाणारी आई दाराने निघून गेली होती व आता आम्हा मुलाना आत येण्याकरता दार उघडे ठेवले होते. भाऊ, वहिनी त्यांची मुले उभीच होती. आईचा निष्प्राण देह बाहेरच्या खोलीत खाली चांगल्या सतरंजीवर ठेवला होता. नेहमी प्रेत घोंगडीवर वगैरे ठेवतात; पण आईने त्यांना पूर्वी ज्या-ज्या वेळी मरणाचा विषय निघाला त्या त्या वेळी अगदी बजावून सांगितले होते की, तिला काही झाले तरी घोंगडीवर ठेवायचे नाही म्हणून. जणू काही ती तिची शेवटली इच्छा होती म्हणानात. भाऊने त्याप्रमाणे केले होते. बहिणी आईच्या कलेवरावर पडून धाय मोकलून रडत होत्या, भेकत होत्या. श्याम मात्र आपला मुखस्तंभासारखा उभा होता – आईच्या चेहऱ्याकडे पहात!

"भाऊ, केव्हा गेली रे आई?"

"साधारण २।–२॥ च्या सुमाराला" भाऊ म्हणाला. आईच्या मृत्यूच्या वेळी तोच जवळ होता. त्याने एकट्याने ते सारे सहन केले होते. २।–२॥ वाजता म्हणजे टॅक्सी कसाऱ्याच्या घाटात आली त्याच वेळी! श्यामच्या मनात आले.

मग भाऊने संध्याकाळच्या सुमारास आईला कसे अस्वस्थ वाटायला लागले व ती स्वत:च भाऊच्या मोठ्या मुलीबरोबर डॉक्टरकडे गेली, डॉक्टरांनी कसे इस्पितळात दाखल व्हा म्हणून सांगितले व तसे सांगताच आईचा कसा धीर सुटला, इस्पितळात गेल्यावर १०॥–११ च्या सुमारास आईला बरे वाटू लागले, म्हणून मग त्याने इराण्याकडे चहा वगैरे कसा घेतला; पण मग लघवी वगैरे होईना त्यामुळे हृदयावर दाब वाढू लागला व २। च्या सुमारास कसा जोराचा झटका आला व 'भाऊ, आम्ही जातो आता' असे म्हणून आईने कसा प्राण सोडला ते सगळे सांगितले.

कोणाची आठवण नाही, कोणाची चौकशी नाही. श्यामचा मोठा मुलगा हा आईचा पहिला नातू – म्हणजे मुलाचा मुलगा ह्या अर्थी–त्याच्यावर आजीचा फार जीव होता; पण त्याचे नाव नाही...आठवण नाही?'... इतर नातवंडांबाबत वा पतवंडांबद्दल काही नाही? भाऊचे नाव तरी का? तर तो समोर होता म्हणून? इतका माणूस मरणाचे वेळी परका होऊन जातो? मुंबईहून चार दिवस राहून जाताना आई हजार गोष्टी सांगावयाची – मुलांना जवळ घ्यावयाची. श्यामने काही केलेले आवडले नसले तर त्याला तसे सांगावयाची, रागवायची व आता? जग कायमचे सोडताना काही काही बोलली नाही? बोलण्याची इच्छा नव्हती की बोलण्याचे त्राण नव्हते? कसे कळावे? कोण सांगेल तिच्या मनात काय होते ते? ह्या प्रश्नाने त्याला भडभडून आले. तो आईच्या पायांशी जाऊन बसला व एवढा मोठा ५०–५५ वर्षांचा माणूस लहान मुलासारखा ओक्साबोक्सी रडू लागला. 'का बोलली नाही आई जाते वेळी?' हाच मनात प्रश्न!

श्यामचे वडील श्याम १०–१२ वर्षांचा असताना गेले होते. त्यानंतर त्या कर्तृत्ववान बाईने मुलांचे शिक्षण केले होते. मुलींची लग्ने केली होती ... ह्यात तिला नातेवाइकाची मदत झाली होती; पण ती मदतच.

मुलांचे स्थिर-स्थावर झाल्यावर तिने समाजकारणात भाग घ्यावयास सुरुवात केली. दारुबंदी–कुटुंबनियोजन–स्त्री-मुक्ती चळवळ ह्यात तिने पुढाकार घेतला. शेकडो बायकांना मदत केली–सरकार-दरबारी त्यांची अडलेली कामे करून दिली.

शेजार–पाजारच्या व गावातल्या लोकाना जशी–जशी बातमी कळली तसे तसे लोक येऊ लागले व आपल्या आपल्या परीने भाऊचे व श्यामचे सांत्वन करू लागले. आई गेल्यावर रात्री ३॥–४ च्या सुमारास भाऊने परत मुंबईला व पुण्याला टेलिफोन केला होता. राधा व मेव्हणे निघाले होते व पुण्याची बहीण पण निघाली होती. त्याच्याकरता थाबणे आवश्यक होते. श्याम व बहिणी आईच्या प्रेतावर बसून आईच्या चेहऱ्याकडे बघत होते. काहीही आजारपण न होता आईचा मृत्यू झाला असल्याकारणाने आईचा चेहरा बिलकुल काळवंडला नव्हता. बघता–बघता एकदम आईचा हात हालला. श्यामने अगदी किंकाळी फोडत म्हटले, 'अरे, आता हात हलला आईचा! बघा कोणी तरी नाडी पहा, कदाचित जीव असेल अजुनी!' पण कसला जीव न् कसले काय? असे भास नेहमी होतात म्हणे!

दोन–अडीचच्या सुमाराला सर्व मंडळी निघाली. ज्या रस्त्याने श्याम विद्यार्थी असताना शेकडो वेळा गेला होता त्या रस्त्याने श्याम आता आईला खांदा देत चालला होता. रस्ता नेहमीप्रमाणे गजबजलेला होता. दुकानातले व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होते. मोटारी होत्या, स्कुटर्स होते, सायकली होत्या. शेकडयाने माणसे जात–येत होती. एखादा कोणी तरी सहज कोणाचे प्रेत चालले आहे म्हणून पहात असे. बस! मृत्यूचा परिणाम इतका अगण्य असतो?

संध्याकाळी ४॥–५ च्या सुमाराला मंडळी परतली. शेजाऱ्यांनी केलेला चहा घ्याली. आईच्या आठवणी काढत लोक येत होते. बायका डोळ्यांना पदर लावत होत्या. कोणी म्हणाले, 'अहो, परवा पाहिली आम्ही आईला.' कोणी म्हणाले 'गेल्या मंगळवारी ह्याच वेळी आम्ही महिला मंडळाच्या बैठकीला भेटलो होतो.' सगळयांच्या सांगण्याचा मथितार्थ एवढाच होता की, आईचा मृत्यू अनपेक्षित होता व त्यामुळे दुःखाला जास्त गडदपणा आला होता.

आठच्या सुमारास कोणी मित्र सांगत आला की, मुंबई टी. व्ही. वर मराठी बातम्यात आईच्या मृत्यूची बातमी सांगितली होती म्हणून. त्या दु खातही श्यामला व त्या सर्व मंडळींना हायसे वाटले. बातमी देण्याइतके कर्तृत्व होतेच आईचे! अमक्यातमक्याची बायको गेली वा आई गेली अशी बातमी नव्हती. स्वतः कमावलेली!

दिवस काय जावयाचे रहातात? तेराव्याचे सगळे सोपस्कार करून श्याम मुबईला परतला. ते १५ दिवस आगगाडी बोगद्यातून जाताना कसे वाटते, तसे गेले. बाहेरचे जग नेहमी चालते तसे चाललेले असते. आपण बोगद्यात असतो त्यामुळे आपले नेहमीचे व्यवहार चालू असले तरी त्यात काही तरी उणे वाटते. आता गाडी बोगद्यातून बाहेर आली होती

'निघतो रे आता आपण सगळे पोरके!'

गोविंदाची आई नव्हती. १० वर्षांपूर्वी कॅन्सरने हालहाल होऊन बिचारी गेली होती! श्यामच्या खांद्यावर हात ठेवत गोविंदा म्हणाला. श्याम त्याला दारापर्यंत पोहोचवायला गेला. तो दार बन्द करून परत येतो तो राधा म्हणाली, 'अहो, भूक लागली म्हणत होतात ना! सगळं तयार आहे. जेवून घ्या पाहू!' श्यामच्या मनात गेल्या १५–२० मिनिटात काय वादळ येऊन गेले होते ह्याची तिला काय कल्पना?

'नको ग राधा, आता अगदी जेवावेसे वाटत नाही आहे बघ!' त्याचा आवाज व चेहरा बघून राधा काय समजायचे ते समजली व त्याच्या जवळ येत म्हणाली, 'आई गेली म्हणजे आभाळ फाटले म्हणतात ते खरेच आहे; पण आता मुलांकडे पाहून...'

'ते सगळे खरे आहे ग! बाकीचे जीवन नेहमीसारखे चालू आहेच की...पण आता ह्या वेळी मात्र जेवावेसे वाटत नाही आहे बघ.'

☐


( अर्धविराम )

---


तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला!....
स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी
'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध
झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात
प्रकाशित झाली.

सबला
माधव शिरवळकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य रुपये बारा



# शरद जोशींबरोबर ...पंजाबात

**किसान युनियनला अभिप्रेत असलेल्या लढ्यात धर्म, जात वगैरेंचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. शेतकरी हीच एक जात किंवा धर्म आहे. भारतीयत्व विसरले जाईल अशा कोठल्याही जाणिवेला किसान युनियनमध्ये थारा नाही.**

**लेखक : अरविंद वामन कुलकर्णी**

**लेखांक : पाचवा**

फिरोजपूरच्या रस्त्यावर खाटकरकलान (किंवा खटकरकलाँ) येथे तासभर थांबायचे ठरले. तिथल्या दोन कार्यकर्त्यांचा तसा आग्रह होता नि ते त्यासाठी आमच्या बसमध्ये सोबतही आले होते. हे गाव चार-एक हजार वस्तीचे आहे. शहीद भगतसिंगाचे गाव म्हणून या गावाला मोठा मान आहे. ते समजल्यावर आम्ही नुसता रुकारच दिला नाही तर हा बेत ठरविल्याबद्दल संबंधितांचे मनापासून आभारही मानले. या ठिकाणी माझ्या लक्षात एक गोष्ट आली की, जोशींच्या ठिकाणीही क्रांतिकारकांच्या बाबतीत फार मोठे आकर्षण वास करते आहे.

हमरस्त्याच्या शेजारीच हात उंचावलेला भगतसिंगाचा एक भव्य पुतळा आहे. त्याच्यासमोरच्या टुमदार अशा एकमजली इमारतीच्या प्रशस्त हॉलमध्ये चांगल्यापैकी वस्तुसंग्रहालय आहे. त्यात भगतसिंगाचे लहानपणापासूनचे फोटो लावलेले होते. सुखदेव, राजगुरू, बटुकेश्वर दत्त यांच्याबरोबरच भगवतीचरण व्होरा, उधमसिंग, असफउद्दौला, चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिसमिल इ. अनेक क्रांतिकारकांच्या तसबिरी व्यवस्थित लावलेल्या होत्या. भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती असेंब्लीत बाँब फेकल्यावर पाठविल्या गेलेल्या सरकारी तारांचे व रिपोर्टचे तर्जुमे लावलेले होते. 'सरफरोसी की तमन्ना आज हमारे दिलमें है । देख लेंगे जोर कितना बाहु ए कातिलमें है ।।' या रामप्रसादजींच्या तेजःपुंज ओळी दुरूनही वाचता येतील असा एक फलकही लावलेला होता. गदरपार्टीचे एक महान कार्यकर्ते, भगतसिंगाचे चुलते आणि देशभक्तीचे पाप हातून घडल्यामुळे दीर्घकाल परागंदा व्हावे लागलेले सरदार अजितसिंग यांचे फोटो तर तिथे होतेच; पण त्यांच्या अनेक वस्तूही तिथे होत्या. अलाहाबादच्या बागेत पोलिसी गोळीबाराची शिकार झालेल्या चंद्रशेखर आझादच्या छिन्नभिन्न कलेवराचा फोटो मनाला चटका लावणारा होता. तशाच तिथे ठेवलेल्या भगतसिंगाच्या काही वस्तूही. मन विषण्ण करील असाच हा अनुभव होता; पण जोशींची चिकित्सकता इथेही शाबूत होती. भगतसिंगाच्या रक्ताने माखलेले काही दगडगोटे व ते ज्यात गुंडाळून भगतच्या बहिणीने आणले तो वृत्तपत्राचा कागद तिथे ठेवला आहे. त्यावर रक्ताचे डाग दिसतातही. जोशींचा प्रश्न असा –'फाशी दिलेल्या भगतसिंगाचे रक्त असे दगडगोट्यांवर ओघळले तरी कसे?'

दोन दिवसांपूर्वीच मनसा येथे सकाळी चहा घेता घेता मला जोशी सहज म्हणाले होते, 'प्रत्येक माणूस कुणा ना कुणाचा तरी डॉन क्विक्झोट असतो हे तुम्हाला मान्य आहे काय?' मी म्हटले की, मला हा प्रश्नच समजलेला नाही. त्यावर त्यांनी असे स्पष्टीकरण केले की, वाढत्या वयात प्रत्येकजण कुणा ना कुणाला नजरेसमोर ठेवून जगत-वाढत असतो; पण ते जगणे-वाढणे क्विक्झोटी वळणाच्या स्वरूपाचेच होत असते. त्यांनी स्वतःबद्दल सांगितले की, ते पौगंडावस्थेत शरदश्चंद्र चटर्जींच्या डॉ. सव्यसाची या व्यक्तिरेखेने फार भारावले होते. त्याचा ते क्विक्झोटच बनले होते. ते मला एकदम खाटकरकलानच्या या वस्तुसंग्रहालयात शिरल्यावर आठवून गेले. तिथे बाघा जतीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बंगालच्या सुप्रसिद्ध क्रांतिकारक जतींद्रनाथांचा एक भव्य फोटो टांगला होता. त्याच्यासमोर उभे राहून मी जोशींना हाक घातली आणि सांगितले की, तुमचा डॉ. सव्यसाची शरश्चंद्रांनी ज्याच्यावरून बेतला असे सांगतात तो हा बाघा जतीन. बाघ म्हणजे वाघ. या माणसाने गुप्त मंडळींचे जाळे विणून इंग्रजांना

सळो की पळो करून सोडले होते. त्यानंतर जोशी बराच वेळ एकटक तो फोटो न्याहाळीत उभे होते !

अजमेरसिंगांनी या गावाबद्दलचा एक अलीकडचा किस्सा सागितला. १९७४ साली इथे इंदिरा गांधीच्या सन्मानार्थ काँग्रेसने एक भला मोठा मेळावा घ्यायचे ठरविले होते. तेव्हा त्याच वेळी किसान युनियनने जवळच आपला एक मेळावा घ्यायचे ठरविले. परवानगीही मिळविली; पण पुढे कॉंग्रेसश्रेष्ठींच्या असे ध्यानी आले की, किसानांच्या मेळाव्यापुढे आपली जयेबंदी अगदीच निष्प्रभ ठरणार. त्याचा इंदिराजीवरही प्रतिकूल परिणाम होणार. इकडे किसाननेत्यांनी जय्यत तयारी करून असे ठरविले होते की, ऐनवेळी कॉंग्रेसच्या मेळाव्याला हजारो ट्रॅक्टर्सचा गराडा द्यायचा नि सर्वांनाच घेराव घालायचा. ही गोष्ट सहजपणे घडू शकली असती; पण ऐनवेळी किसानांच्या मेळाव्यावर बंदीहुकूम बजावला गेला. हजारो पोलिसाची कुमक आणली गेली. संतापलेल्या एका किसाननेत्याने सरळसरळ डी. एस. पी. च्या श्रीमुखात ठेवून दिली. तो माणूस भला होता. म्हणाला, 'तुमच्या या करणीबद्दल मी तुम्हाला दोष देत नाही. चूक आमची आहे; पण मी तरी काय करू ? मला ही अप्रिय गोष्ट करणे भाग आहे. कृपा करून तुम्ही शांततेने घ्या. आम्हाला अडचणीत आणू नका !'

पुन्हा लुधियानावरूनच आम्ही फिरोजपूरला रात्री साडेनवाला पोहोचलो. तिथे आमची सोय पंचायत समितीच्या गेस्टहाउसमध्ये केली होती. किसान युनियनच्या लोकांनी भांडूनच ही जागा मिळविली होती. कारण साऱ्या खोल्या वातानुकूलित असल्यामुळे तिथे नेहमी बडचा नोकरदाराचा मुक्काम असायचा. दोन दिवसांसाठीही ती मंडळी खोल्या द्यायला तयार नव्हती; पण तिथल्या कार्यकर्त्यांनी आरडाओरड करून चार खोल्या मिळवल्याच. एका खोलीत मी आणि जोशी राहिलो. खोली अगदी अद्ययावत होती. दहा वाजेपर्यंत भास्करराव आणि इतर आले नाहीत तेव्हा काळजीच वाटू लागली. दरम्यान तिथल्या कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्या. फिरोजपूरचा जन. सेक्रेटरी सुभेदार तरलोचनसिंग हा एक मोठा भव्य शीख होता. पाहिल्याबरोबर दरारा वाटावा असा. अतिशय कामसू असा त्याचा लौकिक. दुधाच्या आंदोलनात त्याने खेडे खेडे जागे केलेले. शिपायांचा मारही खाल्लेला. जोशींची ओळख करून दिल्यावर तो एकदम पुढे झेपावला. जोशींना छातीशी धरले आणि म्हणाला, 'जोसीजी, आपका नाम तो बहुत सुना है। आपको देखनेके लिये हमारी आखे तडप रही थी.' शीतपेयपानानंतर तासाभराने जेवायला गेलो. जोशी आले नाहीत. ते खोलीत झोपले. शाकाहार आणि मांसाहार अशा दोन्ही पद्धतीच्या भोजनाचा मोठा थाट होता. जेऊन खोलीत आलो नि पत्रे लिहायला बसलो. आजच्या आज अभयला खाटकरकलानबद्दल लिहिणे अगत्याचे होते. त्याच्या वयाचा मी असतानाच मलाही माझ्या वडिलांनी भगतसिंगादी क्रांतिकारकाच्या जीवनकार्याचा परिचय करून दिलेला होता. थोडचा वेळातच दार वाजले. पाहतो तो भास्करराव, विजय व श्रीकांत आलेले. त्यांची गाडी उशीरा आली होती. दुसऱ्या एका ठिकाणी त्याची सोय केलेली होती. तिकडे ते गेले. ते गेले आणि दुधाचे पेले घेऊन एक कार्यकर्ता आला. त्याला तसाच परत पाठविणे माझ्या जिवावर आले; पण दूध पिणे सर्वथा अशक्य होते. जोशी शांतपणे झोपले होते. मी मेजासमोर बसलो. पत्रे पुरी केली आणि कॉटवर कलंडलो. का कुणास ठाऊक त्या रात्री झोपच आली नाही. २॥–३ च्या सुमारास केव्हा तरी डोळा लागला.

## युनियन–भूमिका स्पष्ट

बुधवार दि. २ जून १९८२. फिरोजपूरला. आम्हाला उतरविले होते त्या गेस्टहाउसच्या दिवाणखान्यात सकाळी आठ वाजता वार्ताहरांशी भेट ठरविली गेली होती. जोशी ठरलेल्या वेळा कटाक्षाने पाळणाऱ्यांपैकी एक आहेत. तिथले पत्रकारही तसेच निघाले. ट्रिब्यून, पी. टी. आय., पंजाबकेसरी वगैरे पत्राचे ४–५ पत्रकार आले होते. तिथले बरेच कार्यकर्तेही हजर होते, ही पत्रकारमंडळीही चांगलीच तयारीची दिसली. हिंदी–इग्रजी अशा दोन्ही भाषांतील हा वार्तालाप तासभर रंगला. इथे नव्याने चर्चिला गेलेला प्रश्न म्हणजे हिंदूशीख यांच्यातील संबंधांविषयीचा. सध्या पंजाबात या दोन धर्मीयांमधील तेढ वाढविण्याचे प्रयत्न काही हितसंबंधियांकडून केले जात आहेत त्याबद्दल किसान युनियनची काय भूमिका असेल असे विचारले गेले असता त्याला जोशींनी स्पष्ट व समर्पक उत्तर दिले. किसान युनियनला अभिप्रेत असलेल्या आर्थिक लढयात धर्म, जात वगैरेंचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही असे त्याचे म्हणणे होते. किंबहुना शेतकरी हीच एक जात किंवा धर्म असल्यासारखा असून जातीय वा धर्मीय जाणिवा त्याच्या अपेक्षित एकसंघत्वात फूट पाडणाऱ्या आहेत, असेच जेणेकरून भारतीयत्व विसरले जाईल अशा कोणत्याही जाणिवेला किसान यूनियनमध्ये थारा नाही असे ते म्हणाले.

नऊ वाजता ही बैठक संपली. त्यानंतर न्याहारी उरकून आम्ही सर्वजण सरहद्दीकडे निघालो. फिरोजपूरहून अवघ्या पाच मैलांवर भारत–पाक सीमा व त्यावरील प्रमुख ठाणे आहे. हा सारा भाग फजिल्का इलाखा म्हणून ओळखला जात असे. गहू व कापूस याचे हे कोठार म्हणून ओळखले जाते. अलीकडे कापसाचे पीक संपुष्टात आल्यासारखे झाले आहे. सरहद्दीवर भारतीय शेतकरी शेवटपर्यंतची जमीन कसतो. पाकशेतकऱ्याने मात्र सरहद्दीनजीकची जमीन रिकामी सोडली आहे. दोन्ही बाजूंची गुरे चरता चरता इकडून तिकडे जातात. त्या निमित्ताने दोन्ही बाजूचे शेतकरी भेटत असतात. गप्पाटप्पा व शेतीविषयी विचारविनिमयही होतो. शेतीबाबतीत भारतीय शेतकरी पुष्कळच सुधारलेला आहे असे मत ऐकायला मिळाले. प्रत्येक पिकाचे एकरी उत्पादन पाकपेक्षा भारतात सरस असल्याचेही समजले.

सुभेदार तरलोचसिंगांनी मोटार–सायकलवर श्रीकातला घेतले आणि ते वाटाडे म्हणून पुढे झाले. आमची बस त्याच्यामागून धावू लागली सरहद्दीवर कडेकोट बंदोबस्त असून प्रवेशाबाबतच्या अडचणीही फार आहेत; पण आम्हाला विशेष त्राम झाला नाही. जिथे भारत व पाक यांची समोरासमोर ठाणी आहेत, तो भाग दोन्ही देशानी मोठा सुबक राखला आहे. दोन्ही देशाचे ध्वज सारख्या उंचीवर एकमेकासमोर फडकत होते. रोज सकाळी स्तंभावर ते चढविणे व सायंकाळी उतरविणे विधिपूर्वक होत असते. तो सारा विधि मोठा प्रेक्षणीय असतो वेळ सकाळी १० ची असल्यामुळे आमच्या या ग्रुपला तो अर्थातच पाहता येणे शक्य नव्हते; पण मराठी माणसात मीच एक असा होतो की, ज्याने समारंभ मागे पाहिलेला होता. तेव्हा त्या-

विषयीच्या माझ्या निवेदनावरच भिस्त ठेवून सर्वांनी 'हो हो', 'असे का' करत माना हलवल्या किंवा त्याना हलवाव्या लागल्या!

या सरहद्दीवरचे प्रमुख आकर्षण म्हणजे शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांची समाधी. या तिघांनाही नेहमीच्या प्रथेप्रमाणे सूर्योदयाच्या वेळी फाशी देणे आवश्यक होते; पण आदल्या दिवसापासून धुमसणारे लाहोर ध्यानी घेऊन ब्रिटिश शासनाने ही प्रथा मोडली आणि या तिघाना आदल्या दिवशी सायंकाळीच फाशी दिले आणि त्यांच्या शवांचे दहन रात्रीच या ठिकाणी गुपचुपपणे उरकले! तुरुंगाच्या मागच्या दारानेच त्याची शवे लाहोरहून येथे आणण्यात आली होती. ही जागा स्वतंत्र भारतातील एक तीर्थस्थान बनलेली आहे. बटुकेश्वर दत्त हे भगतसिंगांचे एक सहकारी. त्यांनी अंदमानमध्ये जन्मठेप भोगली. नशीब बलवत्तर म्हणून ते भारताचे स्वातंत्र्य पाहू शकले! १९६२ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी एकच इच्छा व्यक्त केली होती की, आपल्या कलेवराचे दहन भगतसिंगाच्या समाधीशेजारी व्हावे. त्याप्रमाणे ते करण्यात आले असून त्यांचीही इथेच समाधी आहे. त्याच्यानजीकच भगतसिंगाच्या आईचीही समाधी आहे. तिनेही आपल्या कलेवराचे दहन आपल्या लाडक्या लेकाच्या समाधीशेजारी करावे अशी इच्छा व्यक्त केली होती! गेल्या भारत-पाक संघर्षात हा भाग पाकच्या सैन्याने व्यापला होता. लढाईत धुमश्चक्रीत समाधीचा विध्वंसही झाला होता; पण परिस्थिती शांत झाल्याबरोबर पंजाबशासनाने प्रथम काही केले असेल तर ही समाधी नव्याने बांधवून घेतली. आम्ही सर्वजण शहीदाच्या समाधीसमोर जडावल्यागत उभे होते. 'दोन मिनिटे शांतता पाळा' असे सागण्याची जरुरीच नव्हती. तरलोचनसिंगानी भरपूर फुले सोबत आणली होती. जोशीनी सर्वप्रथम फुले वाहिली, नंतर आम्ही सर्वांनी. आईच्या समाधीवरही तसेच केले निघायच्या वेळी जणू काही ठरवल्याप्रमाणे समाधीच्या रोखाने सर्वांनी हात जोडले!

## फिरोजपूर–सभा जिंकली

दुपारी ठीक बारा वाजता फिरोजपूरची सभा चालू झाली. इथेही एक संगीतपार्टी आणण्यात आलेली होती. एक मध्यम उंचीचा, काळसर वर्णाचा शीखयुवक जीव तोडून गात होता. तो पंजाबी जानपदगीते आणि देशभक्तिपर गीते गात असावा. त्याच्या गाण्याचा काही वेगळाच परिणाम श्रोत्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होता. तो गात असलेल्या गाण्याबद्दल त्याला जेव्हा विचारले तेव्हा आमचा अंदाज खरा ठरला. मी त्याला म्हणालो, 'भाई, कुछ फर्माइश करूँ' तो म्हणाला, 'बहोत खुषी होगी.' मी सुचविले, रामप्रसाद बिसमिल या काकोरी कटात फाशी गेलेल्या क्रांतिकारकाचे गीत– 'सरफरोसी की तमन्ना आज हमारे दिलमें है।' त्याने नम्रतापूर्वक ते गाणे येत नसल्याचे सागितले. नतर मी त्याला सुचविले–'मेरे रगले बसती चोला.' हे शहीद भगतसिंगाचे सुप्रसिद्ध गीत. माझ्या रक्ताने ही सारी भूमी न्हाऊन जाऊ दे असा अर्थ असणारे. हे गाणे त्याला ठाऊक होते. ते मी आठवून देताच तो अस्वस्थ झाला. त्याने काही वेळ त्याच्या साथीदाराशी चर्चा केली आणि अतिशय दिलगिरीच्या सुरात तो फक्त म्हणाला, 'भाई, माफ करो.' पण त्यानंतर त्याने एक झावरया लयीत साध्या तुणतुण्याच्या साथीवर पद म्हटले ते भलतेच परिणामकारक झाले. गाणे संपल्यावर घामाघुम झालेल्या त्याने आमच्या दिशेने फक्त एकदा मान झुकविली. खरोखर, आम्ही अशा स्वरूपाच्या केलेल्या काही उद्योगामुळेच मराठी माणूस जिथे जाईल तिथे लक्षणीय ठरत असतो काय? ते काहीही असो. फिरोजपूरच्या त्या गायकाचे आणि त्यांच्या वृंदाचे शेवटपर्यंत आमच्यावर सारखे लक्ष होते हे खरे!

ही सभाही चागली झाली. या सभेचे एक वेगळेपण असे सांगता येईल की, गुरुबचनसिंग बामिया या पंजाब किसान युनियनच्या खजिनदारांनी (कोषाध्यक्ष) महाराष्ट्राच्या 'शरद जोशीं' बद्दल मोकळेपणी प्रशंसोद्‌गार काढले. किसानांच्या चळवळीला एक अतिशय चागली दिशा दाखविणारा आणि शास्त्रशुद्ध अधिष्ठान देणारा नेता म्हणून त्यांनी जोशीचा गौरव केला. जोशीच्या साधेपणाचे, अनाग्रही वृत्तीचे आणि सर्व थरांत सहजतेने मिसळणाऱ्या कृतीचे आदरपूर्वक उल्लेख केले. या सभेतही जोशी अपेक्षेनुरूप चांगले बोलले. भगतसिंगाच्या समाधीच्या भेटीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. मी सहजगत्या सांगितलेल्या भगतसिंगांच्या फाशी समयीच्या एका ऐकीव हकिकतीचा त्यानी मोठ्या चातुर्याने उपयोग केला. असे सांगतात की, सूर्यास्ताच्या वेळी फाशी दिल्या जाणाऱ्या राजगुरूने त्या तिघात अधिक उंच असलेल्या भगतसिंगाला विचारले की, 'तुला काय दिसते आहे?' त्यावर टाचा उंचावून मागे हात बांधलेल्या अवस्थेतील भगतसिंग म्हणाला होता की, 'मला ब्रिटिश साम्राज्यशाहीचा सूर्य अस्तावर जाताना दिसतो आहे!' वास्तविक ज्यावर सूर्य कधीच मावळत नाही अशी ब्रिटिश साम्राज्याची ख्याती होती जोशींनी या हकिकतीचा वापर करून 'भारता' वरील 'इंडिया' चा सूर्य अस्ताला जात असल्याचे भाकीत जाहीर करून टाकले! त्याच्या अपरिचित, अनपेक्षित पण तर्कशुद्ध व सोप्या विचाराच्या मांडणीने इथे जमलेला किसान–श्रोतृसमुदायही हेलावून गेला. आम्ही मुद्दामच व्यासपीठ सोडून श्रोतृसमुदायात जाऊन बसलो होतो. त्याशिवाय लोकांवरील नेमक्या परिणामाचा अंदाज लागणार नव्हता. इथेही आमच्या ध्यानात आले की, जोशीनी लोकांच्या मनाला हात घातला आहे आणि सर्वसामान्य किसानांच्या ठिकाणी अत्यावश्यक असलेले विचारप्रवर्तन चालू केलेले आहे. या सभेलाही दहा–बारा हजार किसान उपस्थित होते. दूध–आंदोलनात तुरुंगात जाऊन आलेल्याचा या सभेत जाहीर सत्कार करण्यात आला. हे आंदोलन २६ फेब्रुवारी १९८१ ते १९ एप्रिल १९८१ या कालावधीत झालेले होते.

ठरल्याप्रमाणे पाच वाजता फिरोजपूरचा निरोप घेतला आणि मधे दोन ठिकाणी शीतपेयांचे स्वागत स्वीकारून आम्ही ८ च्या सुमारास फत्तेआबाद या गावी जाऊन पोहोचलो. हे अमृतसर जिल्ह्यातील एक छोटेसे गाव आहे. तिथे श्री. विजयकुमार चोपडा यांच्या घरी आमची उतरायची सोय केलेली होती. आमच्यातील इतर १५-१६ जणाची गावात दुसरीकडे सोय केलेली होती. श्री चोपडा हे हिंदू असून त्याच्याशी बोलताना पंजाबमध्ये नव्याने रुजू लागलेला व फिरोजपूरच्या पत्रकारानी उपस्थित केलेला नवा ताण फार जाणवून गेला. तो म्हणजे शीख–हिंदू संघर्षाचा होय. आज पंजाबात पचावन्न टक्के शीख आणि चाळीसेक टक्के हिंदू आहेत खलिस्तान (किंवा 'देस पंजाब') आणि अकाली दलातील काही गटाचे धर्म-

मूलक राजकारण यामुळे या दोन धर्मीयांतील तेढ धुमसू लागली आहे. गेल्या महिन्यात अमृतसर हिंदू मंदिरासमोर गाय मारून टाकण्याचा प्रकार झाला तो यामुळेच होय. श्री. चोपडांच्या मते ग्रामीण भागातही ही विषवल्ली जोमाने फोफावते आहे. तिचा उद्रेक केव्हा होईल हे सांगता येत नाही; पण तो नक्की हिंसक स्वरूपाचा असेल आणि त्यामुळे बहुसंख्य हिंदूवर स्थलान्तराचीच पाळी येईल! शहरातील हिंदू आर्यसमाज व काही प्रमाणात रा. स्व. संघ यांच्याशी संबंध ठेवून आहेत. त्यांची राजकीय बांधिलकी साहजिकच भा.ज.प.शी आहे. ग्रामीण भागातील हिंदू मात्र प्रामुख्याने आर्यसमाजाशी नाते ठेवून असलेले दिसतात. त्यांच्यात भीतीचे वातावरण वाढत्या स्वरूपात आहे. चोपडांनी सांगितलेल्या आणखी एका गोष्टीचा आम्हाला अनुभव आला. ती गोष्ट म्हणजे किसान–चळवळीत जवळजवळ सारे शीख किसान आहेत. त्यांचे ठिकठिकाणचे सारे पदाधिकारीही शीखच आहेत. 'तुम्हाला कोणी हिंदू पदाधिकारी भेटला काय?' या त्यांच्या प्रश्नाला मी, विजय आणि श्रीकांतने नकारार्थीच उत्तर दिले, म्हणजे आम्हाला द्यावे लागले. ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली होती. मी काही शीख किसाननेत्यांना याबद्दल विचारले. त्यांनी अशी काही तेढ नाही असे ठासून सांगितले. हे सारे राजकारणी लोकांचे प्रताप आहेत असे त्यांचे म्हणणे होते. मग मी यासंबंधी हरयानातील प्रतिनिधींशी बोललो. ते सारे हिंदू होते. त्यांनी या प्रश्नावर चांगल्यापैकी प्रकाश टाकला.

त्यांच्यामते अकालीदलातील काही गटांचा आडमुठेपणा, त्यामुळे हिंदूंचे नेतृत्व करणाऱ्या भा. ज. प. च्या प्रतिक्रियात्मक हालचाली आणि इंदिरा काँग्रेसचा संधिसाधूपणा यामुळे अशी तेढ रुजणे असंभवनीय नाही. मुख्यमंत्री दरबारासिंग आणि केंद्रीय गृहमंत्री झ्यानी झैलसिंग यांच्यातील बेदिलीमुळे हा संधिसाधूपणा कोणतेही विकृत वळण घेऊ शकेल असा झालेला आहे; पण असे वातावरण किसान युनियनमध्ये नाही. त्यात हिंदू नाहीत किंवा नगण्य आहेत याचे कारण पंजाबात हिंदू किसान अत्यल्प आहे. जवळजवळ सारा हिंदुसमाज छोटे–मोठे व्यापारउदीम किंवा नोकरीपेशात आहे. हरयानात नेमकी याच्या उलट स्थिती आहे. तिथे किसान युनियनचे सारे पदाधिकारी हिंदू आहेत. राजकारण आले की, छोट्या गोष्टींना नेहमीच मोठे बनविले जात असते. तेव्हा आम्ही मराठी माणसानी या गोष्टीचा फार गंभीरपणे विचार करू नये. राजकारणी हरामखोराना वेसण घालण्याइतपत किसान युनियन समर्थ झाली की, असले प्रश्न निकालात निघतील आणि पंजाब–हरयानातील किसाननेत्यांचा त्या दृष्टीनेच प्रयत्न चालू आहे. शीख किसाननेत्यांच्या मनात असे काही असते तर इतक्या महत्त्वाच्या आणि भारतातील किसान चळवळीत नवे पर्व सुरू करणाऱ्या खन्ना बैठकीचे अध्यक्षपद पंजाबचे प्रधान भूपेंद्रसिंग मान यांनाच दिले गेले असते, ते हिंदू असणाऱ्या हरयानाचे प्रधान मांगीराम मलिक यांना दिले गेले नसते! हे सारे समजल्याने बरे वाटले. असे प्रश्न निर्माण झाले नसते तर चांगले झाले असते असेही वाटले; पण आपल्या साऱ्याच देशाला ग्रासून टाकणाऱ्या विकृत राजकारणावर कसल्या मात्रांची नि वळश्यांची योजना करायची?

ता. ३ ला सकाळी ६। वाजता आम्ही सर्वजण अमृतसरला गेलो. जालियनवाला–बाग, गुरुद्वार पाहिले. छातीवर किसान युनियनचे बिल्ले आणि कापडी फुले लावलेल्या आमच्या जथ्याकडे सारे लोक कुतूहलाने पाहात होते. चौकशीही करीत होते. जालियनवाला–बाग हे जाणत्याच्या अंगावर रोमाच उभे करील असे स्थळ! १३ एप्रिल १९१९ रोजी जनरल ओडवायरने नि शस्त्र नि शात जमावावर बेछूट गोळीबार करून भयानक मनुष्यसंहार केला होता. त्याचा बदला उधमसिंगाने १९४१ साली लंडनमध्ये ओडवायरचा वध करून घेतला. शहीद भगतसिंग हे इथल्या हत्याकांडाने निर्माण केलेल्या प्रतिकारक्षम असंतोषाचेच अपत्य होय. तिथे हिंडताना आम्ही सर्वचजण स्वातंत्र्यपूर्वकाळातील एका रक्तरंजित पर्वात वावरत होतो.

## आणि ही शेवटची सभा

गुरुद्वार किंवा शिखांचे मध्यवर्ती सुवर्णमंदिर ही एक सुप्रसिद्ध वास्तू. तिथे अहर्निशपणे चाललेले ग्रंथसाहिबाचे संगीतमय पठण एक वेगळेच वातावरण निर्माण करीत असते. या ग्रंथसाहेबात मराठी नामदेवाच्या अभंगांना जागा मिळालेली आहे अशी 'नामदेवकी बानी' बद्दलची माहिती मी सहजगत्या देताच एक कार्यकर्ता म्हणाला की, 'उद्या जोशीबाबतही असेच काही तरी होईल!' या गुरुद्वारातील संग्रहालय पाहण्यासारखे आहे. त्यातील तसबिरी शीखांचा कडवेपणा आणि त्यांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी दिलेली उग्र झुंज यांचे दर्शन घडविणाऱ्या होत्या. भूपेंद्रसिंग व अजमेरसिंग माहिती देत होते. जोशी एकाग्रतेने ऐकत होते. अमृतसरची ही भेट ते व्याख्यानात योजल्याशिवाय राहणार नाहीत असे वाटून गेले आणि नंतर तसे घडलेही.

दुपारी बारा वाजता आम्ही गोविंदबालसाहिबा या ठिकाणी आलो. तिथे या दौऱ्यातील शेवटची सभा होती. या ठिकाणी एक उत्तम गुरुद्वार आहे, बाराही महिने चालणारा लंगर (अन्नछत्र) आहे. भव्य तटबंदी असलेल्या विस्तीर्ण आवारात असलेल्या काही इमारतींचा समूह असे या गुरुद्वाराचे स्वरूप आहे. त्यातील मध्यवर्ती मंदिरात पाण्याचे एक कुंड आहे. त्यातील पाणी पवित्र मानले जाते. त्या कुंडापर्यंत पोहोचायला ८४ पायऱ्या आहेत. त्या उतरून पाणी प्राशन वगैरे करून पुन्हा वर येणे म्हणजे सर्व (८४) योनींतून मुक्त होणे असे समजले जाते. (म्हणजे गुरुवार दि. ३ जून १९८२ रोजी दुपारी १२॥ च्या सुमारास तीस-पस्तीस लोकांचा एक आंतरभारती गट–ज्यात महाराष्ट्राचे सर्वश्री शरद जोशी, भास्करराव बोरावके, विजय जावंधिया, श्रीकांत तराळ आणि मी होतो–'मुक्त' झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा!) कमालीची स्वच्छता हे सर्वच गुरुद्वाराचे वैशिष्ट्य आहे. शिवाय मंदिरात कुणीही 'नंगा सर' जाऊ शकत नाही. डोक्यावर हातरुमाल तरी पांघरावा लागतोच!

गोविंदबालसाहिबाच्या सभेला तुलनेने गर्दी कमी होती. दहाएक हजार माणसे असावीत. त्यात तीन-चारशे स्त्रिया होत्या हे विशेष! याही सभेला संगीताची जोड होती; पण त्याची योजना थोडी वेगळ्या पद्धतीने केली होती. ते प्रारंभी आणि शेवटी होते. म्हणजे मंगलाचरण व भरतवाक्यासारखे म्हणा ना! जोशींनी या सभेत जालियनवाला–बागेचा उल्लेख केला. शीखांचा एक कडवा गुरु गोविंदसिंग याची कबर महाराष्ट्रातील नांदेडला असल्याचाही उल्लेख

केला. या दौऱ्यातील ही शेवटचीच सभा असल्याने जोशींनी आपले विचार चाळीसेक मिनिटे खर्च करून अतिशय व्यवस्थितपणे मांडले. श्रोत्यांनी त्यांना दादही चांगली दिली. सभा संपल्यावर इथेही त्यांना काही पत्रकारांनी गाठले व शंकासमाधान करून घेतले.

सभेनंतर आम्ही सर्वजण 'लंगर'मध्ये 'प्रसाद' ग्रहण करण्यासाठी गेलो. पोळी, आमटी, भाजी, लोणचे व कांदा असा 'प्रसादा'चा 'मेनू' होता. वाढायला आलेली पोळी ओंजळीत घ्यायची अशी 'लंगर'मधील पद्धती आहे. आपली ताटवाटी आपण प्रथम घासून, धुऊन द्यायची. नंतर ती पुन्हा साफ केली जाते. लंगरमध्ये जेवायला येणाऱ्याला पहिले आठ दिवस काही विचारले जात नाही म्हणे. म्हणजे नंतरही मुफ्त जेवण दिले जाते; पण कोण–कुठला–काय करतो याबद्दलची चौकशी केली जाते, इतकेच! या लंगरमध्ये रोज दोन-तीन हजार लोक जेवतात असे कळले. अमृतसरच्या सुवर्णमंदिराच्या लंगरमध्ये तर रोजची हजेरी दहा-बारा हजार भोजनेच्छूंची असते म्हणे! लाखो रुपये खर्चून तिथे भव्य, प्रशस्त असे भोजनगृह बांधलेले आहे. स्वयंपाकगृहात तर दोन-तीनशे स्त्री-पुरुष सारखे राबत असतात.

सायंकाळी ५ च्या सुमारास आम्ही गोविंदवालसाहिबा येथील कार्यकर्त्यांचा निरोप घेतला आणि लुधियानाच्या रोखाने निघालो.

हा प्रवास म्हणजे आमच्या परतीचा प्रारंभ होता. अगदी वेगळ्या प्रदेशातील, वेगळ्या वातावरणातील कमालीचा सुखद ठरलेला काळ संपल्याची जाणीव प्रत्येकाच्याच मनावर अंमल गाजवू लागलेली असावी. खिन्न-खिन्न, उदास-उदास असे वाटू लागले होते. मी आणि विजय तीन सिटांच्या बाकड्यावर बसलो होतो. पुढच्या तशाच बाकड्यावर श्रीकांत नि जोशी बसले होते. मागच्या बाकड्यावर एकटेच भास्करराव. इतर सारी माणसेही अशीच पांगून–विखरून बसलेली. त्यातच बाहेर संध्याकाळ दाटू लागलेली. खिडकीशेजारी बसलेले जोशी नेहमीप्रमाणे कसले तरी गाणे गुणगुणत होते. आमच्यातील सर्वांत तरुण असलेल्या श्रीकांतच्या रक्ताला ही जडशील स्तब्धता सहन झाली नसावी. तो एकदम जोशींना म्हणाला, 'मोठ्याने तरी म्हणा!' मग जोशींनी पंकज मलिकचे 'चले पवनकी चाल' सुरू केले. त्यानंतर सैगल, मुकेशची गाणी झाली. रफीची झाली. मीही थोडा चाळवला गेलो. मीही त्यात तोंड घातले. मिर्झा गालिबच्या तलतने गायलेल्या 'दिले नादान'च्या काही ओळी ठोकून दिल्या. गाडीच्या आवाजाचे संरक्षक कवच असल्याने त्या मलाही गोड लागल्या. मग मी व जोशी सुचतील ती गाणी म्हणू लागलो. श्रीकांत व विजय ही जोडी झील धरू लागली. मध्यप्रदेशचा मुनीमजी, बिहारचा सुमनजी, उत्तरप्रदेशचा गांधीजी असे इतरही त्यांना साथ देऊ लागले. मैफल रंगत चालली. इतर सारे प्रतिनिधी–विशेषतः किसान युनियनचे उपाध्यक्ष मेजर त्यागी–अचंब्याने सिनेमातली गाणी म्हणणाऱ्या जोशींकडे पाहात होते! 'सारंगा तेरी यादमे' हे गाणे जोशींनी संपविल्यावर मी म्हटले, 'आता हे पुरे. थोडा तिखट जीभपालट हवा.' जोशी एकदा हसले आणि त्यांनी 'लटपट लटपट तुझं चालणं' सुरू केले. मग 'राधा सखी संवादे' झाले. सवाल-जवाब म्हटले गेले. 'काठेवाडी घोड्यावरती' झाले आणि आम्ही दोघेही 'बुगडी माझी सांडली ग' ठेका धरून म्हणू लागलो. कान असलेले सारे श्रोते गाण्यात गुरफटून गेले. लावण्यांचा बाज कानावर आदळला नि भास्कररावही तरारून उठले. श्रीकांत बसल्या जागी हिंदकळू लागला. विजयचे तोंड 'माशाल्ला', 'बहोत खूब' अशी राष्ट्रभाषी दाद सारखे देऊ लागले. त्या वातावरणातच आमची बस लुधियानामध्ये शिरली.

लुधियानाला किसान युनियनच्या ऑफिसवर गेलो. तिथे सामान उतरवून घेतले आणि बसला निरोप दिला. सर्वांनी शेवटचा एकत्र चहा घेतला. सर्वांचे गळ्यात पडून निरोप घेतले. बसस्टँडवर आम्हाला पोहोचवायला जवळजवळ सारेजण आले होते. त्या बसने पहाटे चार वाजता दिल्लीला आलो. 'नवभारत टाइम्स'चे सहसंपादक श्री. शांडिल्य यांच्या घरी गेलो. या माणसालाही किसान–चळवळीत मोठा रस होता. दिल्ली भागातील किसानांच्या कंझावला-आंदोलनात त्याने मेजर त्यागींबरोबर भागही घेतलेला होता. त्यांच्याशी खूप गप्पा केल्या. तिथेच दाढी, स्नान व न्याहारी उरकली. त्यांनी अशोक जैन या 'महाराष्ट्र टाइम्स'च्या दिल्लीच्या प्रतिनिधींना फोन केला. स्टेशनवरच बैठक ठरली. नवी दिल्ली रेल्वे रेस्टॉरंटमध्ये जैन, मुझुमदार व शास्त्री या तीन मराठी पत्रकारांबरोबर जोशींची तास–दीड तास बातचीत झाली. गाडीला गर्दी फार होती. त्यात आमची तिकिटे प्रतीक्षायादीवरच शेवटपर्यंत राहिलेली. तसेच डब्यात शिरलो. इथे विजय व श्रीकांत यांची धक्कल मदतीला आली. त्यांनी डब्याच्या कंडक्टरला चाचपून 'शरद जोशी' या 'किसाननेत्या'चा उल्लेख केला. त्या माणसाने जोशींचे नाव वृत्तपत्रात वाचले होते. त्याने आम्हाला त्या डब्यातून उतरविले नाही, दोन बर्थसुद्धा दिल्या. परतीच्या प्रवासात खूपच त्रास झाला. योग्य रिझर्वेशन्स झाल्याशिवाय जोशींनी यापुढे प्रवास करायचा नाही असा एक ठरावच आम्ही (जोशींना बाजूला ठेवून) एकमताने पास करून टाकला! रात्री एक वाजता विजय व श्रीकांत नागपूरला जाणारी गाडी घेण्यासाठी इटारसीला उतरले. आमचा निरोपही घेववेना इतके ते खिन्न झाले होते. चाळीसगावला उतरून जोशी व भास्करराव जळगाव जिल्ह्यात दोन दिवस हिंडणार होते; पण गारपीट झाल्यामुळे सभा रद्द कराव्या लागल्या आहेत असे चाळीसगावस्टेशनवर आलेल्या अनिल गोटे व त्यांच्या स्नेह्यांनी सांगितले. तेव्हा त्याच गाडीने जोशी व भास्करराव पुढे आले. ते कोपरगावला उतरले.

पुढे मी आणि जोशीच प्रवास करू लागलो. आदल्या दिवसापासून मी गेले दहा दिवस जे जे पाहिले, अनुभवले त्यावर विचार करीत होतो. पंजाब, तिथला किसान, त्याची युनियन, तिचे स्वरूप, तिने केलेली आंदोलने, घडविलेली जागृती या साऱ्याचे एक एकत्र चित्र सांधायचा माझा प्रयत्न चालू होता. आमच्या डब्यात ग्वाल्हेरहून येणारे एक कुटुंब होते. एक वृद्ध बाई, त्यांच्या दोन विवाहित मुली आणि पाच नातवंडे असा परिवार होता. भास्करराव उतरून गेल्यानंतर जोशी त्या मुलांशी खेळत होते. एका बाजूला माझ्याशी गप्पाही मारीत होते. मी आपला मनातल्या मनात ते चित्र सांधत होतो. श्रीभाऊ माजगांवकरांची सविस्तर वृत्तान्त लिहिण्याची आज्ञा चैन पडू देत नव्हती. अशातच पुणे आले! चार जूनला दुपारी ११॥ वाजता दिल्ली सोडली होती. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे 'झेलम'ने जादा वेळ घेतला होता आणि दुपारी १२॥ ऐवजी ४॥ वाजता पुणे गाठले होते!

उतरताना पुढे जोशी होते. दाराशी आल्याबरोबर ते मागे वळून मला म्हणाले, 'पहा आपल्या स्वागताला ही मंडळी आहेतच!' मी पाहिले तर कुणी ओळखीचे दिसले नाही. चारजण हसतहसत पुढे मात्र आले. मग माझ्या लक्षात आले की, ही सी. आय्. डी. ची मंडळी आहेत! आम्ही महाराष्ट्रात शिरल्यापासून, विशेषतः चाळीसगावला ठरल्याप्रमाणे न उतरता जोशी पुढे आल्यापासून फोनाफोनी बरीच झालेली असावी. त्या लोकांनीच आमच्या सामानाचा भार हलका करीत आम्हाला रिक्षास्टँडपर्यंत सोबत दिली. आम्ही रिक्षा घेतल्या आणि आपापल्या घरांकडे निघालो. मला आधी स्नान करायचे होते नि मग पंजाबचा ताळेबंद लिहायला बसायचे होते! ☐

(शेवटचा लेखांक पुढील अंकी)

# फिनिक्स निवड

## Debts of Honour

(Fourteen sketches of famous people).

By Michael Foot.

एकदा 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या रविवारच्या अंकात 'स्पीकिंग व्हॉल्युम्स'या सदरात एन. जे. नानपोरियांनी वरील पुस्तकाविषयी एक छोटासा मजकूर लिहिला होता. त्या मजकुराचा प्रत्येक शब्द मला आठवत नाही; परंतु अलीकडे ब्रिटिश कौन्सिलसुद्धा अशी पुस्तके (म्हणजे Debtes of Honour सारखी) वाचकांना उपलब्ध करून देत नाही याबद्दल तीव्र खंत या लेखात व्यक्त केली होती. श्री. नानपोरियांनी या पुस्तकाबद्दल बरीच स्तुती केली होती.

तेव्हापासून मी सदर पुस्तकाच्या शोधात होतो. कारण जे ब्रिटिश कौन्सिल देत नाही ते 'फिनिक्स'ने शक्य तो द्यावे असे मी ठरवून टाकले आहे. ब्रिटिश कौन्सिलपेक्षा आमची 'इंडियन कौन्सिल' म्हणजे 'फिनिक्स' चोखंदळ वाचकाची भूक काही प्रमाणात तरी भागवते हे आम्हाला जिद्दीने दाखवायचे होते; परंतु ह्या ब्रिटिश लेबर पार्टीच्या म्होरक्याचं हे पुस्तक काही केल्या माझ्या हाती लागेना. तीन–चार महिन्यांनंतर या फुटाचा मला विसर पडला आणि लगेच कॅंपमधील मॅनिज यांच्या दुकानात ते दिसले.

आपल्या येथील राजकारणी लोक वाचत नाहीत. अगदी थोडे अपवाद सोडून. त्यांनी जर अधिक वाचन केले तर ते अधिक चांगला कारभार चालवू शकतील. या संदर्भात श्री. पाय–(अगदी अलीकडे लिहिण्यात एक mnemonic पद्धती निघाली आहे. निमॉनिक म्हणजे स्मरणशक्तीला सहाय्य करणे. उदाहरणार्थ 'माणूस'च्या २०–४–१९८२ च्या अंकात मी ऑस्प्रे या पक्षाचे नाव अनिकस्प्रे, नेस्प्रे, अमूलस्प्रे यांच्याबरोबर वापरले होते. त्यामुळे बहुतेक ७०–८० टक्के वाचक या पक्षाचे नाव कधीच विसरणार नाहीत. शक्य तिथे मी ही निमॉनिक शैली वापरलेली आहे. ही शैली कितीसे लोक वापरतात ते मला माहीत नाही; पण अनेक 'मेमरी बुक्स'मध्ये तिचा उल्लेख आहे. तिचा एकूण वापर जरा कमीच आहे. आता श्री. फुटांना मी पाय म्हणून संबोधल्यामुळे किती वाचकांच्या या लेबर–लीडरचे नाव लक्षात राहील ते बघू!)–काय म्हणतात? तर श्री. पाय हात हालवून म्हणजे बॉडी लँग्वेज वापरून असे म्हणतात की, 'Men of power have no time to read, yet the men who do not read are unfit for power.' आता बघा मामले!

या पुस्तकात मला सर्वांत अधिक शब्दचित्र आवडले ते डॅनिअल डिफो यांचे.

उन्हाळ्याची सुट्टी लागते तेव्हा अनेक बाळगोपाळ गोष्टींच्या पुस्तकांसाठी येतात. (आमचे चिल्ड्रन्स सेक्शन म्हणजे अति दुर्लक्षित.) ते गोष्टींसाठी इतके हपापलेले असतात की, आमच्या ग्रंथालयाचे नियम काटेकोरपणे (व आनंदाने) पाळतात. पुस्तके पिशवीत ठेवून, त्या पिशवीची घडी घालून, वरती रबरबॅंड लावून, असे काही शिस्तबद्ध असतात की, मोठ्यांना लाज वाटावी! त्यांच्यासाठी ग्रंथालयच वाढवता येत नाही याची मला खंत वाटते. यातील दरवर्षी ५–१० मुलं खचित रॉबिन्सन क्रूसो मागतात. रॉबिन्सन क्रूसोच्या जनकाचे हे अगदी छोटेसे चरित्र वाचून अनेक प्रकारची नवी माहिती मिळते. डेट ऑफ ऑनर म्हणजे कायद्याने ज्याची वसुली करता येत नाही असे कर्ज. उदाहरणार्थ, जुगार किंवा बेटिंगचं कर्ज. आधी लेबर पार्टी व या पुस्तकाच्या नावावरून मला वाटले की, पुस्तक राजकीय स्वरूपाचे 'लेबर पार्टी'सारखे शुष्क असेल! परंतु क्वचितच पुस्तकाच्या बाबतीत मला असा सुखद धक्का बसला आहे. ह्या लेबर पार्टीच्या नेत्याचं इंग्रजी वाचताना आपल्याला अजिबात लेबर पडत नाही! नवीन नवीन वाक्प्रचार व भाषा अगदी खुसखुशीत आहे! परवा एकदा कुठे तरी वाचल्याचं आठवतं की, ब्रिटिश लोकांपेक्षा अमेरिकन लोक जास्त व्याकरणशुद्ध इंग्रजी लिहितात! मला मात्र ब्रिटिशांचंच इंग्रजी आवडतं. सुरुवातीला मी सर्व प्रकरणांच्या आधी डॅनियल डिफो, फेमिनिस्ट हे प्रकरण वाचून काढलं.

रॉबिन्सन क्रूसोच्या संदर्भाखेरीज डॅनियल डिफोचं नाव फार कमी लोकांना माहीत आहे. त्याने 'जर्नल ऑफ द प्लेग इयर' व 'मॉल फ्लॅंडर्स' लिहिल्याचं माहीत होतं; पण डिफोनी (Roxana) 'रोक्झाना' नावाची कादंबरी लिहिली आहे हे प्रथम मी ह्या पुस्तकातच वाचलं. रोक्झाना ही अलेक्झांडर द ग्रेटची बायको होती हे माहीत होते; परंतु मला डिफोच्या कादंबरीत व या रोक्झानात साम्य आहे की नाही ते माहीत नाही. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर तिला मुलगा झाला. कॅसेंडर नावाच्या मॅसॅडॉनिआतील राजाने त्याची गादी बळकट करण्यासाठी या दोघांची हत्या केली होती.

रॉबिन्सन क्रुसोमधील फ्रायडेचा 'प्रोटेस्टंट'पणा व जोनाथन स्विफटच्या गलिव्हरमधील त्या काळाबद्दलचा उपरोधीपणा, लहानपणी ही दोन पुस्तके वाचताना अजिबात जाणवत नाही! आणि एकदा आपण मोठे झाल्यावर सहसा ही दोन पुस्तके परत वाचत नाही. तेव्हा निदान स्विफटने तरी गलिव्हरमध्ये ह्या हेटाळणीचा 'अंडरटोन' देण्याचा भाकड खटाटोप का केला असेल?

श्री. फूट म्हणतात की, जेम्स सदरलॅंड यांचे डॅनियल डिफोचे चरित्र सर्वात चांगले आहे. मॉल फ्लॅंडर्ससारखी सटवी (आमच्या ग्रंथालयाच्या २३ वर्षांच्या काळात हे पुस्तक एक–दोनदाच वाचायला गेलं असेल!) जगात झाली नसेल! ती न्युगेट तुरुंगात जन्मली. शिदळकीतच जन्मली. शिदळकीच करायला जन्मली. दिसायला सुंदर होती. कारस्थानी होती. अति कामुक होती. पैशासाठी हपापलेली होती. तिने १२ वर्षे वेश्येचा धंदा केला. पाच वेळा लग्न केलं. त्यातील एक तर तिचा भाऊच होता. आठ वर्षं तुरुंगवास भोगला. शेवटी अति श्रीमंत झाली–ती श्रीमंत झाली ती अचानक धनलाभ मिळाल्यामुळे.

मॉल फ्लॅंडर्सच्या वर्तणुकीच्या मागे सतत एक कारण असे. ते कारण म्हणजे गरिबी! ही दैना कुणाला काय करायला लावील त्याचा नेम नाही. आयुष्यात मॉल फ्लॅंडर्स परत परत जशी मोहाला बळी पडते तसाच डॅनियल डिफोही अनेक वेळा त्याच्या आयु-

ध्यात मोहाला बळी पडला होता.

डॅनियल डिफोने आयुष्यात अनेक व्यवसाय केले. चीज विकली, तयार कपडे व कालव, कृमिशुक्ती (Oysters) विकले. पत्रकार झाला, छोटया छोटया पुस्तिका लिहिणारा झाला. एके काळी त्याने विटा विकल्या! त्यातील अनेक धंदे त्याच्या अंगाशी आले. वयाच्या तिसाव्या वर्षी त्याने नादारी पुकारली! १७,००० पौंडांची! त्या वेळेला!

पुस्तिका लिहिण्याचा धंदा तर त्याच्या इतका अंगाशी आला की त्याचे अंगच तुरुंगात गेले! Shortest way with Dissenters या त्याच्या छोटया पुस्तिकेमुळे त्याला तुरुंगात डांबले गेले.

एकदा डॅनियल डिफोने 'The Poor Man's Plea' ही पुस्तिका लिहिली होती, तर Moll Flanders हे पुस्तक म्हणजे खरोखर एक Poor Woman's Plea आहे!

डॅनियल डिफोच्या पायालाही भिंगरी होती. इंग्लंडचा कोपरा न् कोपरा त्याने पालथा घातला! तर त्याला लंडनच्या प्रत्येक गल्लीची माहिती होती. डिकन्स आणि हॉगार्थ यांनासुद्धा लंडनची माहिती आपल्या तळहाताच्या मागच्या बाजूइतकी परिचित होती!

खांदेपालट करण्यात पण डिफो पटाईत होता. हा रोग तसा जुना आहे म्हणायचं! तो व्हिग आणि टोरीजच्यामध्ये आयाराम गयाराम करीत असे. श्री. फूट असे म्हणतात की, डिफोच्याबाबतीत कर्ज आणि राजकारणाची नालस्ती याची परिणती रॉबिन्सन क्रुसो व मॉल फ्लँडर्समध्ये झाली! जगात किती तरी उत्कृष्ट कलाकृती कर्ज व तुरुंगवासामुळं झाल्या आहेत! हे इतक्या वेळा घडलेलं आहे की, आपल्यालासुद्धा कर्जबाजारी व्हावं व तुरुंगवास भोगावा असे वाटते! जोनाथन स्विफ्टच्या बाबतीतही असेच झाले. कर्ज आणि राजकारणातील खेळ यांच्यामुळंच गलीव्हर्स ट्रॅव्हल्स जन्माला आलं असं श्री. फूट यांचंच म्हणणं आहे. स्विफ्टमधला जो जहालपणा आहे तो मात्र डॅनियल डिफोच्या लिखाणात नाही.

या पुस्तकात आणखी इतकीच वाचनीय इतर तेरा व्यक्तिचित्रे आहेत. फक्त बीव्हरब्रुकचा स्केच भलताच लांब व किंचित कंटाळवाणा वाटतो. बीव्हरब्रुकचं संपूर्ण नाव विल्यम मॅक्सवेल एटकॅन पहिला बेरन. या गृहस्थाने कॅनडामध्ये प्रचंड पैसा गुतवला. कॅनडामध्ये तो व्यापारी व इंग्लडमध्ये राजकारणी व वर्तमानपत्राच्या जगात अभिमन्यू होता. पहिल्या महायुद्धात व दुसऱ्या महायुद्धातही ब्रिटिश कॅबिनेटमध्ये बसलेले दोनच सद्गृहस्थ म्हणजे चर्चिल व बीव्हरब्रुक. बीव्हरब्रुक हे भलतेच विक्षिप्त होते. हा विक्षिप्तपणा त्याना राजकारणात यशस्वी होण्याच्या आड आला. त्यांच्या वर्तमानपत्रात मुक्त व्यापाराचा नेहमी पुरस्कार असे. तसे ते ब्रिटिश कॉलनीचे पण खंदे पुरस्कर्ते होते. त्यांच्या राजारणाच्या अनुभवांविषयी त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. विनोदी लेखक एव्हलीन वॉघ (Evelyn Wough) यांनी तर बीव्हरब्रुकवर एक स्कूप नावाची कादंबरीच लिहिली होती. हे बीव्हरब्रुकचं शाब्दिक व्यंगचित्रच आहे. त्याशिवाय श्री. टॉम ड्रायबर्ग व ए. जे. पी. टेलर या दोघांनी बीव्हरब्रुकचं वेगवेगळं चरित्र लिहिलं आहे. जेव्हा बीव्हरब्रुक फूटोना स्वतःबरोबर स्पेशल ट्रेनने घेऊन जात त्या वेळी तर श्री. फूटांना अलद्दिनसारखं मॅजिक कार्पेटवर उडाल्यासारखं वाटे!

दुसरं एक अत्यंत वाचनीय व्यक्तिचित्र आहे ते थॉमस पेन याचे. थॉमस पेन हे राजकारणक्षेत्रातील सर्वात मोठे पत्रकार मानले जातात. छोटया छोटया पुस्तिका लिहिण्यात त्यांचा हात कुणीही धरू शकले नाही. 'कॉमनसेन्स' ही त्याची सर्वात नावाजलेली पुस्तिका किंवा अल्पग्रंथ (pamphlet). या पुस्तिकेत इंग्लंडने अमेरिकेत ढवळाढवळ करू नये व अमेरिकेला स्वातंत्र्य द्यावे असे त्यांनी लिहिले होते. थॉमस पेनचे ग्रह असे विचित्र होते की, ज्या तऱ्हेने त्यांची कीर्ती विश्वव्यापी झाली, परत त्यांची नालस्ती झाली व परत एकदा त्यांच्या नावाची चलती झाली, या सर्व प्रकाराला इतिहासात तोड नाही! थॉमस पेन यांच्याविषयी आणखी काही लिहिण्याऐवजी हे सारे वाचकांनी वाचलेलेच बरे.

डॅनिसल डिफो हा इंग्रजी कादंबरीचा जवळजवळ पिताच आहे. त्याच्याविषयी हा मजकूर श्री. फूट यांनी इतका सुंदर लिहिला आहे की, मनातल्या मनात मी बोलून उठलो, "I, too, owe him a debt of honour!" शिवाय एका वाचकाला या पुस्तकाच्या गुणवत्तेबद्दल सांगतले असताना तो म्हणाला, 'असं छान पुस्तक लायब्ररीत टाकल्याबद्दल We, too, should owe you a debt of honour अशी तुमची अपेक्षा असेल?'

"Why not?" मी उत्तरलो, "One good turn deserves another संस्कृतचक्रे ही काही फक्त कैवल्यधाम, लोणावळा येथूनच निघतात की काय?'

हे पुस्तक वाचून मला असे झाले, 'वा वा! तिकडचे राजकारणी असे वाचतात! असं लिहितात! आम्ही काय पापं केली आहेत की आमचे राजकरणी लोक वाचत नाहीत?'

—जे. एन्. पोंडा


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आं बे ड क र भा र त


लेखक बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

# नाही निर्मळ जीवन.... तेजाबचा पाऊस

'ये रे ये रे पावसा' करत आपण सारेचजण लहानपणी पावसात भरपूर खेळलोय. पावसात भिजावे, गारा पडल्या तर त्या खाव्यात, नाही तर किमान पावसाचे थोडे पाणी वाटीत साठवून तीर्थासारखे मचमच करीत घशाखाली उतरवावे. मला तरी लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीपेक्षा त्या सुट्टीनंतर येणारा वा त्या सुट्टीत कोसळणारा पाऊस अधिक आवडत असे. बालकवी, मर्ढेकर, पाडगावकर या प्रत्येक कवीच्या कवितेतले काही गहिरे रंग या कोसळणाऱ्या श्रावणसरींनी भरलेत. पहिला पाऊस न आवडणारा माणूस म्हणजे अगदी अरसिकांचा राजा असेल!

हे सारे खरे; पण माझी आठ वर्षांची मुलगी पावसात खेळावयास गेली की आज माझ्या काळजाचा ठोका चुकतो. विज्ञान समजणे ही अनेकदा एक भयंकर जीवघेणी गोष्ट असते. अज्ञानात तसे खूप सुख असते. कोणतीही काळजी न घेता जाळलेल्या इंधनातून आणि वापरलेल्या उपकरणातून पृथ्वीवरचे प्रदूषण वाढलेय. आपल्या भोवतालचे वातावरण आणि एकूण निसर्ग आपण येवढा बिघडवलाय की, आपण त्याची पार झोपडपट्टी करून टाकलीये! आज जगभर पडणारा पाऊस खूप दूषित बनलाय. पडणारा पाऊस हा रड णारा निसर्ग झालाय.




पी. एच्.चा सर्वसाधारण आलेख

पण पाऊस बिघडलाय म्हणजे तरी काय? तो किती बिघडलाय? त्याचे नक्की परिणाम कोणते होणार आहेत?–पाऊस बिघडलाय म्हणजे पाऊस तेजाबसारखा म्हणजे आम्लधर्मीय (acidic) बनतो आहे. आम्लता आणि क्षार हे द्रव पदार्थांचे दोन विरुद्ध बाजूचे गुणधर्म आहेत. हे गुणधर्म मोजावयाचे जे मोजमाप आहे त्याला 'पी. एच.' (Ph.) असे म्हणतात. सर्व पदार्थांचे 'पीएच' शून्य ते चौदामध्ये असतात. गाडीच्या बॅटरीमध्ये जे तेजाब असते त्याचा 'पी. एच' एक असतो. अमोनियाचा पी. एच. बारा असतो तर शुद्ध पाण्याचा पी. एच. सात असतो. शुद्ध पावसाचा 'पी. एच.' तसे पाहिले तर सात असावयास हवा; पण तो तसा कधीच नसतो. हवेत नेहमी असणारे 'कर्बद्विप्राणिल वायु' वा इतर काही वायू त्यात मिसळून तो सर्वसामान्यपणे पाच पूर्णांक सातदशांश इतका असतो. त्यात तसे काही वाईट पण नसते; पण पावसाच्या पाण्याचा 'पी. एच.' याच्या खाली जाऊ लागला की, काळजी करण्यासारखी परिस्थिती निर्माण होते. गेल्या शतकातच मॅंचेस्टर आणि लिडस यांच्या भोवताली पडणाऱ्या पावसाचा 'पी. एच.' याच्या खाली गेल्याची तशी नोंद होती; पण या विषयाचा खरा अभ्यास जगभर सुरू झाला तो गेल्या वीस वर्षांत.

पावसाचा 'पी. एच.' तसा काही नैसर्गिक कारणाने पण खाली जाऊ शकतो. ज्वालामुखी, चमकणाऱ्या विजा, सेंद्रिय पदार्थांचे निसर्गात होणारे विघटन या यातील प्रमुख गोष्टी आहेत; पण 'पी. एच.' वर होणारा या घटकांचा एकूण प्रभाव तसा मामुलीच आहे. जगभर आपण जे इंधन जाळतो त्या सर्व प्रकारच्या इंधनातून बाहेर पडणारे दूषित वायु पी. एच. वर मोठा परिणाम करतात. आपण जी कृत्रिम खते वापरतो ती पण याला हातभार लावतात. जळणाऱ्या इंधनातून आकाशात जाणारे 'नायट्रस ऑक्साइड' आणि 'सल्फर-डाय-ऑक्साइड' हे वायू पावसाच्या पाण्यावर फार मोठा परिणाम करतात.

आपल्या देशात हे वायू किती प्रमाणात आकाशात जावेत याबाबत आपण अजून पुरेसे जागरूक नाही. कायदे अजून पूर्णपणे बनलेले नाहीत. अनेक गोष्टींमुळे या तुटपुंज्या कायद्यांची अंमलबजावणी पण व्यवस्थित स्वरूपात केली जात नाही; पण अमेरिका व कॅनडा येथे जनता व सरकार जागरूक असूनही जे काही घडते आहे ते भयंकर आहे. गेल्या वर्षी अमेरिकेत अडीच कोटी टन नायट्रस ऑक्साइड हवेत फेकले गेले. त्यापैकी पन्नास टक्के वाहनांनी निर्माण केले होते. कॅनडामध्ये हा आकडा पाव कोटी टन होता आणि त्यापैकी साठ टक्के वाहनांनी निर्माण केलेले होते. त्याच वर्षी अमेरिकेत तीन कोटी टन सल्फर डायऑक्साइड हवेत टाकण्यात आले. त्यापैकी पासष्ट टक्के विद्युतकेंद्रांनी निर्माण केले होते. कॅनडात हा आकडा पंचावन्न लाख टन इतका होता आणि त्यापैकी फक्त बारा टक्के विद्युत-केंद्रांनी निर्माण केलेला होता. या अशा प्रमाणात हवेत जाणाऱ्या या वायूचा परिणाम असाच जबरदस्त असतो. फेब्रुवारी १९७९ मध्ये टोरोन्टो येथे पडलेल्या पावसाचा सरासरी 'पी. एच.' फक्त साडेतीन होता. अमेरिकेत आत्तापर्यंत पडलेल्या पावसातील सर्वांत अधिक आम्लधर्मीय पावसाचा पी. एच. फक्त दीड होता. टॉमेटोच्या रसाचा 'पी. एच.' साडेचार असतो. सफरचंदाच्या रसाचा 'पी. एच.' तीन असतो. मोटार-गाडीच्या बॅटरीमधील तेजाबचा 'पी. एच.' एक असतो. म्हणजे पाऊस आता शब्दशः तेजाबचा पाऊस बनतोय. स्कॉटलंडमध्ये पण नुकताच अडीच 'पी. एच.' असलेला पाऊस नोंदवण्यात आलाय.

हवेत जाणाऱ्या वायूचा पावसावर होणारा नक्की परिणाम शोधण्याचे संशोधन सर्वप्रथम १९५५ साली स्कॅन्डे नेव्हियन शास्त्रज्ञांनी हातात घेतले. त्यानंतर अमेरिकेत डॉ.बोरमन आणि कोगबील यांनी फार मोठी आकडेवारी गोळा करून पावसाचा 'पी. एच.' व हवेत जाणारे वायू याचे समीकरण घालून दाखवले. या विषयावर काम करणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांनी सांगितले की, 'जे वर जाते ते खाली आले पाहिजे' हा तर न्यूटनचा फार जुना सिद्धांत आहे. त्या सिद्धांतानुसार हे सारे घडणार आहे; पण त्यात आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हे वायू जास्त दाबाच्या प्रदेशातून कमी दाबाच्या प्रदेशात जाणार. म्हणजे सावली द्यावयास विषवृक्ष मात्र रुक्मिणीच्या दारी आणि त्याची फुललेली विषफळे मात्र बिचाऱ्या सत्यभामेच्या दारी अशी नाथांच्या घरची उलटी खूण! —या एका मुद्द्यावर अमेरिका आणि कॅनडा यांच्यात आज फार मोठे भांडण आहे. कॅनडामधील शास्त्रज्ञांनी 'अमेरिकेवरून येणारे दूषित वायू आणि दूषित पाऊस कॅनडाचे जीवन उध्वस्त करताहेत आणि अमेरिकन सरकारने फार कडक कायदे करून हे बंद पाडले पाहिजे

## उदंड जाहले पाणी...

यमुनेत कालिया होता. यमुना कालियाच्या विळख्यातून सुटेपर्यंत सर्वसामान्य माणसांना आणि गाईगुरांना प्यावयास वा आंघोळीस पाणी मिळत नव्हते. एका निमसरकारी अहवालाप्रमाणे भारतातील बहुतेक सर्व नद्या आज आधुनिक कालियाच्या विळख्यात आहेत. याविरुद्ध सर्वप्रथम संघटित आवाज केरळमधील अरनाकुलम आणि कोट्टायम या जिल्ह्यांतील वैकोम आणि कनायनूर या ठिकाणच्या लोकांनी उठवला आहे. तीन लाखाहून अधिक लोक आंदोलनात उतरलेत. गेल्या आठवड्यात दिल्लीत येऊन इंदिरा गांधींना त्यांनी आपले निवेदन सादर केले. गावातून वाहणारी 'मोवातुपुझा' नदी ही त्या लोकांचे जीवन आहे. नदीला बाराही महिने भरपूर, स्वच्छ, गोड पाणी असते. त्या नदीच्या काठावर वर्षाला ऐंशी हजार टन कागद बनवू शकणारा एक फार मोठा कारखाना 'हिंदुस्थान पेपर कारपोरेशन' तर्फे सध्या उभारला जातो आहे. परदेशातून आणलेला लगदा वापरून प्रायोगिक उत्पादनाला सुरुवात पण झाली आहे. त्या कारखान्यातून बाहेर पडणारे दूषित पाणी नदीत जाऊ नये ही लोकांची मागणी आहे.

प्रकल्पाचे प्रमुख डॉ. गोपालस्वामी मला म्हणाले, 'लोकांचा गैरसमज झालेला आहे. दूषित पाणी शुद्ध करून वापरावयाची सोय या कारखान्यात आहे. सर्वसामान्य कारखान्यात एक टन कागद बनवावयाचा असेल तर पावणेचार लाख लिटर पाणी खराब होते. या कारखान्यात एक टन कागदामागे फक्त अडीच लाख लिटर पाणीच दूषित होणार आहे. त्यातून हे दूषित पाणी केरळसारख्या प्रदूषण नियंत्रण विभागाने सांगितल्याप्रमाणे स्वच्छ करून नंतरच नदीत सोडण्यात येणार आहे. पाणी स्वच्छ करावयाची फार चांगली व्यवस्था कारखान्यात आहे आणि या साऱ्या व्यवस्थेसाठी कॅनडा आणि अमेरिकेत काम केलेला एक सल्लागार नेमला होता.' सरकारी क्षेत्राला विरोध असलेले लोक जाणूनबुजून या कारखान्याला विरोध करताहेत आणि ग्वालेर रेयॉन आणि पुनलार पेपर मिल यांच्यातर्फे फार दूषित पाणी सोडले गेल्याने लोकांचा गैरसमज झालेला आहे असेही अनेक लोक आग्रहाने सांगतात.

—मात्र आंदोलनात उतरलेले लोक काही एक ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यांच्या मते दररोज पाच कोटी लिटर पाणी नदीत सोडले जाणार आहे, ही सरकारी आकडेवारी आहे. पाणी जर सरकार सांगते तसे शुद्ध केलेले आहे तर पुन्हा तेच पाणी का वापरत नाही? का कागदाला जे पाणी चालत नाही ते माणसांना व गुरांना चालते? सरकारी कायद्याप्रमाणे पाणी शुद्ध केले आहे हे पण लोक ऐकावयास तयार नाहीत. लोक म्हणतात, 'कायदे बदलता येतात. कायदे बनविणारे आणि राबवणारे प्रशासक आणि शास्त्रज्ञ विकत घेता येतात'—यापुढे आंदोलन अधिक तीव्र होणार आहे. बोटीमधून जाऊन लोक कारखान्याला घेराव घालणार आहेत. लोकांची भाषा—भावना हलविणारी आहे. 'कुमारी नदीवर होणारा बलात्कार आम्ही रक्त सांडून थांबवणार आहोत' म्हणून ते सांगतात.

—आणखी काही दशकांनी, कदाचित शतकांनी, 'उदंड जाहले पाणी' म्हणून आनंदाने गाणे गात एखादे रामदास पुन्हा एकदा बाहेर पडतील. त्या वेळी मागे वळून त्यांना सर्वप्रथम या आंदोलनाला मानाचा मुजरा करावाच लागेल!

म्हणून आवाहन केले आहे.' अमेरिकन सरकारचे म्हणणे एवढेच आहे की, फार घाई करू नका. आजचे ऊर्जासंकट, अमेरिका, कॅनडाची एकूण औद्योगिक प्रगती याच्या सदर्भात या प्रश्नाचा जरा शांतपणे विचार करा.

पण या तेजाबच्या पावसाचा व त्याने होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणारे जगभरचे शास्त्रज्ञ हे ऐकावयास तयार नाहीत. या पावसाचे होणारे परिणाम आपण अस्वस्थ व्हावे असे आहेत. या पावसानेसारे काही होते. हा पाऊस जमिनीवर पडला की, जमिनीत खनिजाच्या स्वरूपात असलेले अॅल्युमिनियम त्यात विरघळून पाण्याबरोबर नदीत वा तळ्यात जाते. तेजाबबरोबर आलेले हे अॅल्युमिनियम माशांना फार हानिकारक असते. या अशा पाण्यामुळे कॅनडामधील १४० सरोवरात आज एकही मासा जिवंत राहिलेला नाही! हे असेच सुरू राहिले तर आणखी दहा वर्षांत आणखी अठ्ठेचाळीस हजार पाचशे तळ्यात एकही मासा उरणार नाही! आजच त्याची संख्या निम्म्यावर आलेली आहे. संक्रांत फक्त माशांच्यावरच नाही तर झाडांच्यावरही वळलेली आहे. वनराईला मॅग्नेशियम, कॅल्शियम, नायट्रोजन, पोटॅशियम ही मूलतत्त्वे हवी असतात. त्यापैकी काही तेजाबच्या पाण्यात विरघळून निघून जातात. झाडांना त्यापासून वंचित केले जाते. जमिनीचा एकसंधपणा जाऊन ती विरळ होते व झाडांची मुळे जमीन पकडून उभी राहू शकत नाहीत. झाडांना पाहिजे त्या स्वरूपात मुक्त नायट्रोजन पण मिळत नाही. कारण हा मुक्त नायट्रोजन तयार करणारे जीवाणू तेजाबच्या पाण्यात काम करू शकत नाहीत. कॅनडामध्ये वनविभागाचे काम जोरात चालते. तीन लाख लोकांना तेथे काम मिळते. वर्षाला दहा हजार कोटी रुपयांच्या वस्तूची निर्यात केली जाते. तो सारा उद्योगच काही वर्षांत डबघाईला येईल! नॉर्वेजियन शास्त्रज्ञानी केलेला अभ्यास तर याच्यापुढे गेलाय.

| शहर | पावसाचा पी. एच. |
|---|---|
| मुंबई | ५·१ |
| बंगलोर | ६·६ |
| कलकत्ता | ५·८ |
| दिल्ली | ६·२ |
| हैद्राबाद | ५·७ |
| नागपूर | ६·३ |
| पुणे | ५·८ |
| मद्रास | ५·८ |

मुंबई शहरात वेगवेगळ्या ठिकाणी पी. एच. आकडा खालीलप्रमाणे आहे.

| जागा | पावसाचा पी. एच. |
|---|---|
| कुलाबा | ६·२ |
| बांद्रा | ६·२ |
| चेंबूर | ४.८ |
| ट्रॉम्बे | ४·४ |
| घाटकोपर | ५·० |
| ठाणे | ५·२ |
| बेलापूर | ५·२ |

हे पाणी नळातून जाताना नळात थोड्या प्रमाणात असलेले तांबे या पाण्यात विरघळते व लहान मुलाच्या पोटात जाते. स्वीडनच्या किनाऱ्यावरील अनेक खेड्यातील मुलांना पोटाचे अनेक विकार या पाण्याने झालेत म्हणून त्यांनी सांगितलंय.

आपल्याकडे या विषयाचा अभ्यास नुकताच सुरू झालाय. भाभा अणुशक्तिकेंद्रातील महाराष्ट्रियन शास्त्रज्ञ डॉ. केळकर यांनी यात खूप काम केलंय; पण अनेक कारणांमुळे आपल्याकडे हा सारा विचार अजून प्राथमिक अवस्थेतच आहे. खूप काम व्हावयास हवे किंवा काहीही काम करावयाची जरुरी नाही! हातच्या कांकणाला अखेर आरसा लागत नाही. जे बदलता येत नाही ते अगतिकपणे सोसायचे असते ही तर आपली शतकाशतकांची परंपरा आहे; पण भारतात पडणाऱ्या पावसाच्या 'पी एच'ची दिली जाणारी आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

पण या वर दिलेल्या आकड्याबाबत दुमत आहे. भारतात या एकूण प्रश्नाबाबतची जागरूकता फार कमी आहे. त्यामुळे योग्य प्रकारे व नियमितपणे 'पी. एच.' मोजला जात नाही अशी एक सार्वत्रिक तक्रार आहे.

मध्यंतरी पाण्याच्या प्रदूषणाबाबत फार काम करणारा डॉ. वाईजमन दिल्लीला आला होता. या आकड्यांना ऐकून तो म्हणाला, 'याचा अर्थ भारतीय शास्त्रज्ञांना पावसाचा 'पी. एच.' कसा नोंदवतात हे नक्की माहीत नाही किंवा त्यानी ते करावे अशी त्यांची वा त्यांच्याकडून काम करवून घेणाऱ्यांची इच्छा नाही!' ठाण्याच्या खाडीत पाण्यात पारा वाढल्याने मासे मरतात वा ते मासे खाऊन माणसे आजारी पडतात, त्या ठिकाणी पावसाचा पी एच वगैरे राव, फार पुढच्या गोष्टी आहेत' डॉ वाईजमन मला हे तसे उपहासाने सांगत होता आणि तेवढ्याच अगतिकतेने मी ते ऐकत होतो तो हे मला सांगत होता त्या वेळी बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता. अगतिकपणे कोसळणाऱ्या त्या पावसाकडे मी पाहिले. विज्ञानाने माणसाला खूप सुखसोयी दिल्यात, खूप पैसा पुरवलाय. तो पैसा असहाय्यपणे कोसळणाऱ्या त्या पावसाला सांगत होता,

अरेरे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला मोठा
नी पाऊस झाला खोटा!

## यमुनेकाठी ताजमहाल...

यमुनेकाठची खेडी संघटित होऊ लागलीत. त्यांना ताजमहाल वाचवावयाचा आहे. या आंदोलनाचे पडसाद नुकतेच राज्यसभेत उठले पेट्रोलियम आणि रसायन विभागाचे मंत्री श्री. शिवशंकर यांनी सांगितले की, ताजमहालच्या भोवती फार मोठ्या प्रमाणावर वनश्री वाढवण्यात येणार आहे. येणाऱ्या दूषित वायूचे परिणाम त्यामुळे खूप कमी होतील. मथुरा व आग्रा येथील काही विभाग संरक्षित विभाग म्हणून जाहीर झाले असून तेथे छोटे-मोठे कारखाने चालविता येणार नाहीत. गेल्या वर्षात मथुरा–आग्रा पट्ट्यातील दोन औष्णिक विद्युतकेंद्रे बंद करण्यात आली आहेत. मथुरा आणि आग्रा येथील यार्डमध्ये फक्त डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांचीच आज देखभाल केली जाते. महत्त्वाचे म्हणजे मथुरा तेलशुद्धीकारखान्यातून बाहेर पडणारी हवा दूषित नसेल याची संपूर्ण काळजी घेण्यात आली आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन होते आहे का नाही हे पाहण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमलेली आहे.

पण या सर्व गोष्टी ऐकूनही अनेकांचे समाधान झालेले नाही. श्रीमती उबिबउल्ला यांनी तर गेल्या काही वर्षांत ताजमहालच्या संगमरमरचा रंग बदलू लागला आहे अशी साधार तक्रार केली. त्यांनी सांगितले, 'ज्यानी अजून ताजमहाल पाहिला नसेल त्यानी त्याला जरा लवकर भेटून यावे हे बरे!' *

# विम्बल्डन १९८२

## आठ वर्षांनंतर पुन्हा एकदा कॉनर्स !

अभय गोखले

१९८२ च्या विम्बल्डनमध्ये अमेरिकेच्या जीमी कॉनर्सने चषक जिंकून तब्बल आठ वर्षांनंतर लॉनटेनिसच्या ह्या प्रतिष्ठित टूर्नामेंटमध्ये आपला हिसका दाखवला आहे. १९७४ मध्ये तेव्हाच्या गाजलेल्या कॉनर्सने ऑस्ट्रेलियाच्या केन रोझवालचा पराभव करून प्रथम विम्बल्डन जिंकले होते. त्यानंतर १९७५ च्या विम्बल्डनमध्ये अमेरिकेच्या ऑर्थरॲशने कॉनर्सला अंतिम फेरीत हरवले होते. १९७६ मध्ये कॉनर्स मग अंतिम फेरीतही पोचू शकला नाही. १९७६ च्या विम्बल्डनमध्ये स्वीडनच्या बियॉन बोर्गने प्रथमच अंतिम फेरीत प्रवेश करून रुमानियाच्या इलिनस्तासेला नमवले होते. नंतर मग बोर्ग ह्या १९७६ ते १९८० ही पाच वर्षे सतत विम्बल्डन जिंकत गेला व बोर्गचेच सुवर्णयुग सुरू झाले. १९७४ मध्ये पुरुषांची विम्बल्डन-स्पर्धा कॉनर्स जिंकत असतानाच त्याच्या पत्नीने–ख्रिस एव्हर्ट लॉइड–हिने महिलांची एकेरी स्पर्धा जिंकली होती. नंतर कॉनर्स व लॉइड ह्यांच्यात बेबनाव होऊन कॉनर्सने ख्रिसशी घटस्फोट घेतला. आता कॉनर्सने दुसरे लग्न (बायकोचे नाव पॅट्टी) केले असून त्याना एक मुलगा आहे ख्रिस एव्हर्टने इंग्लंडच्या जॉन लॉइडशी लग्न केले. ख्रिसचा पूर्वीचा नवरा आठ वर्षांनी जिंकत असताना ख्रिस मात्र मार्टिना नवरातीलोवाकडून अंतिम फेरीत बाद झाली आहे. मात्र ह्या आठ वर्षांत ख्रिसने तीनदा विम्बल्डन जिंकले आहे.

१९७६ मध्ये विम्बल्डनमध्ये लॉनटेनिसच्या क्षितिजावर बोर्गचा उदय झाल्यावर त्याने आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना अक्षरशः नमवले. त्यात कॉनर्सचाही त्याने कचरा केला. १९७७ मध्ये अंतिम फेरीत बोर्गने कॉनर्सला ३–६, ६–२, ६–१, ५–७, ६–४ असे हरवले, ती कॉनर्सने बोर्गला दिलेली सर्वांत शेवटची कडवी झुंज. त्यानंतर बोर्गने प्रत्येक भेटीत कॉनर्सला चारी मुड्या चीत केले. १९७८ मध्ये विम्बल्डनची अंतिम फेरी ही नेहमीच्या लौकिकास धरून नव्हती. साधारणतः विम्बल्डनमध्ये अंतिम फेरीचे सामने पाच सेटपर्यंत ताणले जातात व उत्कंठापूर्ण होतात; परंतु ह्या वर्षी (१९७८) अंतिम सामन्यात बोर्गने कॉनर्सचा ६–२, ६–२, ६–३ असा फडशा पाडला. ह्याच स्पर्धेत पहिल्या फेरीत अमेरिकेच्या व्हिक्टर अमायाने बोर्गला पाच सेटस् मध्ये खेचून त्याच्या तोंडाला फेस आणला होता।

१९७९ च्या विम्बल्डनमध्ये कॉनर्स पुन्हा अंतिम फेरीत पोचू शकला नाही. ह्या वेळेस उपान्त्य फेरीतच बोर्गशी त्याचा मुकाबला झाला व बोर्गने त्याला सरळ सेटस्मध्ये पराभूत करून उपान्त्य फेरीतच गारद केले. ह्या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत भारताच्या विजय अमृतराजने पहिले दोन सेटस् जिंकून बोर्गच्या तोंडचे पाणी पळवले होते; परंतु सदैव शांतचित्त ठेवणाऱ्या बोर्गने नंतरचे तीन सेटस् जिंकून स्वतःस सावरले. अमृतराजकडे किलर इन्स्टिंकटचा अभाव असल्यानेच बोर्ग तेव्हा जिंकू शकला. ह्या १९७९ च्या विम्बल्डनमध्ये बोर्गने अंतिम फेरीत अमेरिकेच्या वेगवान सर्व्हिसवाल्या रॉस्को टॅनरचा पाच सेटस्मध्ये ६–७, ७–१, ३–६, ६–३, ६–४ असा पराभव केला. १९८० च्या विम्बल्डनमध्ये कॉनर्स टेनिसक्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या अमेरिकेच्या डावखुऱ्या जॉन मॅकॅन्रोकडून उपान्त्य फेरीतच हरला. अंतिम फेरीत बोर्गने जॉन मेकॅन्रोची कडवी झुंज पाच सेटस्मध्ये मोडून काढली. त्या वेळेस मॅकॅन्रोने जो चिवट खेळ केला त्यावरून पाच वर्षे विम्बल्डन सातत्याने जिंकणाऱ्या बोर्गला सणसणीत आव्हान उभे राहिल्याचा साक्षात्कार झाला. १९८१ मध्ये कॉनर्स ह्या ए. टी. पी. च्या काउंटिंगनुसार कुणाच्याच खिजगणतीत नव्हता. १९८१मध्ये बोर्गबरोबरच मॅकॅन्रो, चेकोस्लाव्हाकियाचा लेंडल, अर्जेंटिनाचे गुलेर्मो विलास व जोस लुइस क्लार्क व अमेरिकेचे गेरुलाइटस, टेलचर हेच गाजत होते. १९८१ च्या विम्बल्डनमध्ये कॉनर्स ह्या खरा उपान्त्य फेरीतच बाद व्हायचा; पण पुन्हा एकदा जिंकण्याची सवय असलेला कॉनर्स बचावला. ह्या स्पर्धेत भारताच्या विजय अमृतराजने पहिले दोन सेटस् जिंकून कॉनर्सची हवा तंग केली होती; पण नंतर लागोपाठ तीन सेटस् जिंकून कॉनर्सने अमृतराजचे आव्हान परतवले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याअगोदरच्या तीन लढतीत अमृतराजने दोनदा कॉनर्सला नमवले होते. अपेक्षेप्रमाणे उपान्त्य फेरीत जॉन मॅकॅन्रोने कॉनर्सला सरळ सेटस्मध्ये पराभूत केले. ह्या वर्षी (१९८१) अमेरिकेच्या मॅकॅन्रोने, पाच वेळा विम्बल्डन जिंकणाऱ्या स्विडनच्या बोर्गचा पराभव करून त्याचा नक्षा उतरवला तो पाच सेटस्मध्ये. त्याअगोदर इतर एक–दोन स्पर्धांमध्येही मॅकॅन्रोने बोर्गला नमवले होते. मात्र मॅकॅन्रोच्या एकंदर खेळावरून व त्याच्या चाळ्यावरून तो विजेतेपद पुढच्या वर्षी कायम राखेल किंवा नाही ह्याची शकाच वाटत होती.

बोर्ग पाच वर्षे विम्बल्डन जिंकत असताना त्याचा जो दबदबा होता व त्याची विजयांची जी अखंडित (यु. एस. ओपनचा अपवाद) परंपरा होती ती मॅकॅन्रोला कायम राखता आली नाही. १९८१ च्या विम्बल्डननंतर आठच दिवसांनी चेकोस्लाव्हाकियाच्या लेंडलने मॅकॅन्रोला पराभूत केले. नंतर लेंडल व मॅकॅन्रोची चार वेळा गाठ पडली व प्रत्येक वेळी लेंडलने मॅकॅन्रोला ठोकून काढले. त्यानतर अमेरिकेच्या बिल स्कॅलन, कॉनर्स व

भारताच्या विजय अमृतराजनेही मॅकॅन्रोला पराभवाचा हिसका दाखवला.

## मॅकॅन्रो विरुद्ध कॉनर्स !

१९८२ च्या विम्बल्डनला नेहमीप्रमाणे महत्त्व नव्हते. ह्याचे कारण अव्वल दर्जाचे पाच खेळाडू विम्बल्डनमध्ये भाग घेत नव्हते. विम्बल्डनच्या नियमानुसार स्वीडनचा पराभूत व निराशवृत्तीचा बोर्ग ठराविक ग्रां. प्री स्पर्धात न खेळल्याने त्याला पात्रता सामन्यात उतरावयास सांगण्यात आले. बोर्गने (विम्बल्डन पाच वेळा जिंकणाऱ्या) तो आपला अपमान समजून ह्या वर्षी विम्बल्डनच्या वाटेला न जाण्याचे ठरवले. इंग्लंड व अर्जेंटिना ह्याच्यामध्ये फॉकलंड बेटावरून युद्ध पेटल्याने अे. टी. पी. च्या काउंटिंगनुसार तिसऱ्या व चौथ्या सीडेड अर्जेंटिनाच्या गुलेर्मो विलास व जोस लुइस क्लार्क ह्यानी विम्बल्डनवर बहिष्कार घातला. मॅकॅन्रोला पाच वेळा नमवणाऱ्या चेकोस्लाव्हाकियाच्या इव्हान लेंडलला यंदा विम्बल्डन जिंकण्याची चांगली संधी होती; परंतु तो विम्बल्डनला फारशी किंमत देत नसल्याने स्पर्धेत उतरलाच नाही. त्याला म्हणे डेव्हिस चषकाची तयारी करायची होती! इव्हान लेंडल जर ह्या स्पर्धेत उतरला असता तर बहुधा कॉनर्स जिंकला नसताच; पण मॅकॅन्रो अंतिम फेरीत पोचू शकला असता की नाही ह्याबद्दल शंका आहे पहिल्या दहा सीडेड खेळाडूतील अमेरिकेचा इलियट टेल्चर ह्या फिट नसल्याने विम्बल्डनमध्ये खेळला नाही. तेव्हा लेंडल, विलास, क्लार्क, बोर्ग, टेल्चर ह्या पाच अव्वल दर्जाच्या खेळाडूंशिवाय होणारे विम्बल्डन जिंकणे कॉनर्स व मॅकॅन्रो ह्याना सोपे जाणार होते. १९७३ मध्ये युगोस्लाव्हियाच्या पिलिकला, त्याने डेव्हिस चषकस्पर्धेत आपल्या देशाकडून खेळण्यास नकार दिल्याने विम्बल्डनमध्ये प्रवेश नाकारण्यात आला तेव्हा पिलिक सभासद असलेल्या अे. टी. पी. च्या (खेळाडूंची युनियन) इतर अव्वल सभासद खेळाडूंनी निषेध म्हणून त्या वर्षीच्या विम्बल्डनवर बहिष्कार घातला व ह्या वर्षीसारखे स्पर्धेचे महत्त्वच कमी करून टाकले. १९७३ मध्ये अे. टी पी. चा आदेश धाब्यावर बसवून इंग्लंडचा टेलर व रुमानियाचा इलिनस्तासे विम्बल्डनमध्ये खेळलेच. ह्याच वर्षी स्वीडनचा बोर्ग प्रथम विम्बल्डनमध्ये उतरला; परंतु प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीतही तो पाचव्या फेरीत इग्लंडच्या टेलरकडून हरला. योगायोगाची गोष्ट म्हणजे यंदा प्रतिबोर्ग समजला जाणारा व फ्रेंच ओपनमध्ये लेंडल, गेरुलाइटस ह्यांसारख्या नामवन्ताना नमवणारा स्वीडनचा मॅटिस विलेंडर ह्या, प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीत कॉनर्स व मॅकॅन्रो ह्याना आव्हान देणार असे वाटत असताना चौथ्या फेरीत अमेरिकेच्या ब्रायन टीचरकडून पराभूत झाला.

अशा प्रकारे फारसे आव्हान नसताना अंतिम फेरीत कॉनर्स व मॅकॅन्रोच येणार याबद्दल कोणाच्याच मनात संदेह नव्हता. स्पर्धेमध्ये फारसे खळबळजनक काही घडलेच नाही. नाही म्हणायला आपल्या वेगवान सर्व्हिसकरता प्रसिद्ध असणारा रॉस्को टॅनरला भारताच्या अमृतराजने पाच सेटस्पर्यंत खेचले विलेंडर लवकर पराभूत झाला. तिसऱ्या सिडेड विरास गेललाइटसला बाराव्या सीडेड मार्क एडमंडसनने (ऑस्ट्रेलिया) उपान्त्यपूर्वफेरीत गारद केले. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे जोहान क्रीक (द. आफ्रिका) मेयर (अमेरिका) ब्रायन टीचर (अमेरिका), रॅनर, गेरुलाइटस्, विलेंडर हे पराभूत होत असताना ऑस्ट्रेलियाचा बारावा सीडेड मार्क एडमंडसन व बीन सीडे टीम मायोटो हे उपान्त्य फेरीत पोचले, मात्र ह्या दोघाचाही कॉनर्स व मॅकॅन्रोने उपान्त्य फेरीत फडशा पाडला. संपूर्ण स्पर्धेत कॉनर्स व मॅकॅन्रोला कडवी झुंज कोणीच दिली नाही.

कॉनर्स व मॅकॅन्रो लढतीत सुरुवातीला मॅकॅन्रोने कॉनर्सची दोनदा सर्व्हिस तोडून पहिला सेट इतक्या झपाट्यात घेतला की, बहुधा मॅकॅन्रो कॉनर्सचा तीन सरळ सेटस्मध्ये फडशा पाडणार असे वाटू लागले. मॅकॅन्रोच्या वैशिष्टयपूर्ण व कसदार सर्व्हिसला कॉनर्सकडे उत्तरच नव्हते. पहिल्या सेटमध्ये कॉनर्स मॅकॅन्रोपुढे फारच कमकुवत वाटत होता; परंतु दोन डावखुऱ्या खेळाडूंच्या ह्या लढतीत नंतर मॅकॅन्रोच्या नेहमीच्या चाळ्याना सुरुवात झाली. पंचांशी हुज्जत घालणे सुरू झाले व ज्या सर्व्हिसवर मॅकॅन्रोचे यश अवलंबून असते ती बिघडली व कॉनर्सने उत्तम प्लेसिंगच्या जोरावर दुसरा सेट मॅकॅन्रो इतकाच झटकन घेतला. पुन्हा तिसऱ्या सेटमध्ये मॅकॅन्रोने जोर लावला; पण त्यानंतरचे दोन सेटस् कडव्या झुंजीनंतर जिंकून तब्बल आठ वर्षांनी कॉनर्सने विम्बल्डन विजेतेपद पुन्हा मिळविले; परंतु कॉनर्सचा खेळ पहाता तो पुन्हा विम्बल्डन जिंकण्याची शक्यता कमीच वाटते. दिवा विझताना मोठा होतो त्याप्रमाणे कॉनर्स भासला. मॅकॅन्रो काय किंवा कॉनर्स काय हे बोर्गइतके सातत्य असलेले खेळाडू नाहीत. बोर्गसारखा खेळाडू एका शतकात एकदाच जन्माला येतो. मॅकॅन्रो व कॉनर्स ह्यांच्या खेळण्याच्या शैलीचे बोर्गने त्याच्या एका पुस्तकात यथार्थ वर्णन केलंय. बोर्ग मॅकॅन्रोबद्दल लिहितो की, त्याची सर्व्हिस उत्कृष्ट आहे. बोर्गच्या बॅकहॅंडला वाईड सर्व्हिस करून मॅकॅन्रो व कॉनर्स हे बोर्गला ते डावखुरे असल्याने अडचणीत आणतात. मॅकॅन्रोच्या व्हॉलीज जबरदस्त असतात आणि तो त्या दोन्ही साइडस्ना ड्रॉप करतो. बोर्ग मॅकॅन्रोचे कौतुक करताना म्हणतो की, " He is a master of unexpected ". I can never anticipate his shots. To beat him, I have to keep him pinned to the baseline by maintaining perfect length on my ground–strokes ". I don't think he has ( Mcenroe ) the confidence to rally from the baseline, if he stays back all the time, he is going to lose a lot of Points.

कॉनर्सबद्दल लिहिताना बोर्ग म्हणतो की, कॉनर्स हा जगातील सर्वात जलद हालचाल करणारा खेळाडू आहे प्रत्येक पॉइंट मिळविण्यासाठी तो इंच इंच लढत असल्याने त्याचा पराभव करणे फार कठीण असते. कॉनर्सचे फटके हे फार जोरकस असतात. I played him wrong by trying the strategy of other pros–to hit slices soft and short, to break up his rhythm. That was not my game. When I developed more confidence I felt I could hit the ball just as hard as Jimmy and yet I was steadier. I played him seven times in 1979 and did not lose once.

मॅकॅन्रोबद्दल कॉनर्स म्हणतो की, बोर्गपेक्षा मॅकॅन्रोजवळ खेळणे मी पसंत करणार नाही, जरी त्याने मला अंतिम फेरीत दोनदा हरवले असले तरी. He ( Macnroe ) serves and volleys which gives me a target. Macnroe can stay back and hit ground strokes, but they are not as penetrating. Borg is predictable.

१९८२ च्या महिलांच्या विम्बल्डनच्या अंतिम फेरीत अपेक्षेप्रमाणे मार्टिना नवरातीलोवा व ख्रीस एवर्ड लॉइड ह्यांच्यात लढत झाली. स्पर्धेत खळबळजनक घडलेली एकच घटना म्हणजे ३८ वर्षांच्या बिलिजीन किंगने तिच्यापेक्षा वयाने अर्ध्याने असलेल्या ट्रेसी ऑस्टिनचा केलेला पराभव. त्याचप्रमाणे आंद्रिया यॅगर ( अमेरिका ) व सिलव्हिया हनीका ( प. जर्मनी ) ह्या उदयोन्मुख महिलांच्या चौथ्या फेरीतच खातमा उडाला तो अनपेक्षित होता. विम्बल्डन स्पर्धा तीनदा जिंकणाऱ्या लॉईडला, मार्टिनाने ६–१, ३–६ व ६–२ असे हरवले व ही स्पर्धा १९७८–७९ च्या पाठोपाठ तिसऱ्यांदा जिंकली. वेगवान सर्व्हिस, व्हॉलीज् व पासेस ह्यांच्या जोरावर मार्टिनाने लॉइडला चकवलं. मात्र लॉइडला तिचा नेहमीचा सूर गवसला नाही हेच तिच्या पराजयाचे प्रमुख कारण होय. फ्रेंच, ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धा पाठोपाठ विम्बल्डन जिंकणाऱ्या मार्टिनाने सप्टेंबरात होणारी ( अमेरिकेत होणारी ) यु. एस्. ओपन जिंकली तर तिला ग्रँड स्लॅम करण्याची चांगली संधी प्राप्त झाली आहे. □

---

# पुणे वार्ता : बाल शिवाजी

पृष्ठ २ वरून

शॉट आहे शिवाजी सवंगड्यांची ओळख करून घेतो. येसाजीच्या हातातला विटीदांडू घेतो. दांडूवर विटी ठेवतो तर पहिल्यांदा ती घसरून खाली पडते. सगळे हसतात. शिवाजी विटी उचलून घेतो. मिष्किलपणे विचारतो, "काय ? मारू का रे गुट्टा ?" मित्र म्हणतात, "मारा की राजं !" आणि मग भिरभिरत पार कुठच्या कुठे गेलेली विटी. एव्हाना चित्रपटानं खिळवून टाकलं होतं. 'खबरदार !' आणि मारू का गुट्टा ?' विचारतानाची शिवाजीची नजर विसरत नव्हती. मित्राची ओळख करून घेताना ६।७ वर्षांचा, पुढचे २–४ दात पडलेला गणू म्हणतो, 'माझं नाव गणू, नाही – आम्ही गोदाजीराजे जगताप !" संपूर्ण चित्रपटभर शिवाजी आणि सवंगड्यांमधला अकृत्रिम जिव्हाळा, मोकळेपणा, विश्वास इतका काही सुरेख उतरला आहे ! यानंतरचा प्रसंग आहे पुण्यात सोन्याच्या फाळानं नांगर फिरवण्याचा. आमंत्रणाची दवंडी होते बनगावची मुलं गोळा होतात, राजानं आपल्याला आवातनं धाडलंय" म्हणतात गणू म्हणतो, "राजं म्हंजे तेच नव्हं, गुट्टा मारून इट्टी फिरवलेलं !" ही राजाची ओळख पक्की झालेला प्रसंग सुरेख वठला आहे 'बाल शिवाजी' घडतो तोच मुळी अशा छोट्या-छोट्या प्रसंगांतून आणि व्यक्तिरेखांतून. शिवाजी उठून दिसतो तो मावळ्यांच्या पार्श्वभूमीवर. या चौदा मावळ्यांनी संपूर्ण चित्रपटाचं सोनं केलं आहे. डोक्यावर घेरा राखलेला त्र्यंबक, सारखा पायजमा सावरणारा 'म्हमद्या', पैलवान येसाजी, बहिर्जी नाईक, दात पडलेला गोदाजीराजे जगताप आणि नावं लक्षात न राहिलेले पण डोळ्यांसमोर असलेले इतर सर्व.

नंतरचे प्रसंग आहेत सुलतानराव खोपडे आणि रांझेकर पाटील यांना समज देण्याचे. दरिद्री सर्जाक्काची जमीन बळकावू पहाणारा पाटील सर्जाक्कानं तक्रार नोदवल्यावर तिला जबरदस्तीनं पळवून नेतो. छोटा भाऊ बघत असतो, उधळलेल्या बैलगाडीच्या मागे सुसाट पळत सुटतो, 'माझ्या आक्काला नेऊ नका !' हा आवाज उधळलेल्या धुळीत विरून जातो. बनगावची मुलं शिवारात एकट्या रडत बसलेल्या छोट्यापाशी येतात. "राजं न्याय देतील." या विश्वासानं रात्री पुण्याला येतात. या वेळी पाटलांना जेरबंद करून निवाडा करण्याचा प्रसंग अंगावर काटा आणतो. मस्तवाल पाटलाच्या भूमिकेत बापूसाहेब गावड्यांनी कमाल केली आहे. 'आमचा न्याव आईसाहेबाना करू देत' म्हटल्यावर शिवाजीच्या डोळ्यात फुललेला अंगार, 'ही साक्ष आणि हा पुरावा', असं सांगतानाचा थंड निर्धार आणि 'पाटलांचे हात आणि पाय कलम करावेत' अशी शिक्षा फर्मवितानाचा कठोर दगडी चेहरा आणि 'मांसाहेब, निवाडा करताना आमचं चुकलं का ?' हे विचारतानाची व्याकूळ आर्तता – या साऱ्या प्रसगांना आनंदनं त्याच्या अभिनयानं एक वेगळंच परिमाण, सौंदर्य मिळवून दिलं आहे. चित्रपट पहाताना वाटतं आपण ऐकलेला, वाचलेला शिवाजी असाच असणार! याहून वेगळा तो असूच शकत नाही !

नंतरचा प्रसंग आहे, शिवाजी हिंदवी स्वराज्याचा पुनरुच्चार करतो त्याचा. घोडा फेकत आलेला शिवबा पाटलाच्या शेताजवळ येतो. वयाला न साजेशा समजूतदारपणानं बोट उचलून निश्चयी स्वरात म्हणतो, 'हे राज्य व्हावं ही तो श्रीची इच्छा !' आणि नंतर तसाच घोडा फेकत निघून गेलेला शिवबा. अशा एखाद्या प्रसंगासाठी कित्येक वेळी हा चित्रपट पहावासा वाटेल असे असंख्य प्रसंग संपूर्ण चित्रपटात ओळीनं हजर आहेत. एका प्रसंगापाठोपाठ दुसरा, त्यानंतर तिसरा असे किती प्रसंग सांगावेत. चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणजे या प्रसंगात एक नाजूक, घट्ट वीण आहे, ज्यातून एक सलग कथासूत्र तयार होतं.

एका १२–१३ वर्षांच्या करारी मुलानं आपल्या २०–२५ फाटक्या मावळ्यांच्या सहकार्यानं भवानीमातेसमोर हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली, स्वकीय आणि परकीय शत्रूंना अक्षरशः पाणी पाजलं हा आपला गौरवशाली इतिहास! 'बाल शिवाजी 'नं हा लखलखीत इतिहास अशा ताकदीनं उभा केला आहे की, क्षणोक्षणी डोळे पाणावतात. चित्रपटातले लक्षात राहतील असे कित्येक प्रसंग रंगवण्याचा मोह टाळायचा तर शेवटचा प्रसग आहे शिवाजीचा यशस्वी ठरलेला गनिमी कावा-तोरणा काबीज केला तो प्रसंग. वेष बदलून शिवाजीनं जागेची गुपचूप केलेली टेहळणी, रात्रीच्या अंधारात मशाली घेऊन केलेली दिशाभूल, दोरखंडावरून माकडासारखे पटापट चढलेले मावळे आणि नंतरची शेवटची लढाई. दोन हातात दोन तलवारी

घेऊन सहा फुटी किल्लेदारासमोर उभा राहिलेला छोटा शिवबा आणि मावळे ! तोरण्यावरती जिजाऊ भगवं निशाण उभारते तेव्हा टाळ्या वाजवण्यासाठी कुणाला सागावं लागलं नाही. टाळ्यांच्या उत्स्फूर्त कडकडाटात चित्रपटानं मानाचा मुजरा घेतला तेव्हा लक्षात आलं, 'बाल शिवाजी' ची निवड परभाषिक मुलामुलींच्या मनामनातून कशी झाली असेल !

चित्रपट संपला. भारलेल्या अवस्थेत थिएटर रिकामं झालं. लक्षात राहिला मंतरलेला दीड तास ! लहान मुलं, मोठी माणसं एकाच संवेदनेनं या अनुभवाला भिडली, एकरूप झाली. सध्याचे देमार, ठोकळेबाज सिनेमे बघून बधिर झालेली संवेदना 'शिवाजी' नं नाजूकपणे चेतवली.

या अवस्थेतून बाहेर आल्यावर जाणवली चित्रपटाची इतर वैशिष्ट्यं–उत्कृष्ट दिग्दर्शन, वास्तववादी तरीही उत्फुल्ल छायाचित्रण, स्वाभाविक मोकळा अभिनय, छोटे–छोटे परिणामकारक संवाद, वाहून नेणारं डावजेकरांचं संगीत आणि या सर्वांचं एकसंध नातं म्हणजे CFS ची प्रसन्न, दृष्ट लागावी अशी निर्मिती !

कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओमध्ये 'बाल शिवाजी'चं चित्रीकरण झालं. बाह्यचित्रीकरणासाठी पेंढारकरांनी पन्हाळ्याचा परिसर निवडला. बाह्यचित्रीकरणासाठी सलग चाळीस दिवस 'शिवबा-मावळे आणि कंपनी' पन्हाळ्याला मुक्काम ठोकून होती. या छोट्या छोट्या मुलांनी नतर तीन–तीन शिफ्टमध्ये काम केलं. रात्री २॥ वाजता हा बालचमू दोरखंडावरून गड चढला, पहाटे ३॥ वाजता 'उमठ्यावरती सर्जा आला, मरगळलेला मावळ उठला' म्हणत त्यांनी घोडे दौडवले. शिवाजीची भूमिका जगण्यासाठी ही मुलं भाला, बरची, दाडपट्टा, तलवार कोल्हापूरच्या यादव वस्तादांकडून शिकली. भूमिका जगणं म्हणजे काय हे या मुलांनी तंतोतंत साकार केलं. ¤

चित्रपटानंतरच्या पत्रकारपरिषदेनं मात्र अपेक्षाभंग केला. चित्रपट बघितल्यानंतर आलेलं भारावलेपण पत्रकार–परिषद सुरू होण्यापूर्वीच्या पंधरा मिनिटांत आमचे पत्रकार–मित्र विसरूनही गेले. परिषदेला दिग्दर्शक प्रभाकर पेंढारकर, आनंद स्वतः हजर होते. 'दोघांनाही चित्रपटाबद्दल खूप काही सागायचं होतं, विशेषतः आनंदला ! त्याची निवड कशी नाट्यपूर्ण झाली, शिवाजीच्या भूमिकेसाठी म्हणून पहिल्यांदा घोड्यावर बसताना कसं वाटलं, शूटिंगच्या वेळी सहा फुटी नाग (दात काढलेला) पकडताना अंगावर कसा आला आणि शेवटी रेडिओवरून पारितोषिक जाहीर होताना ऐकल्यावर कशा उड्या मारल्या! सर्वोत्कृष्ट अभिनयाचं एका भारतीय मुलाला (male actor) मिळालेलं हे पहिलं पारितोषिक, ते मिळाल्यामुळं आनंदचा न मावणारा आनंद, हुरहूर आणि शांतारामबापूकडून अॅवॉर्ड घेतानाचा उत्कट क्षण ही खरी news ! पत्रकार मात्र शांतारामबापूंकडून दैनिकाला साजेशी एखादी 'भ्रडक' बातमी मिळवण्याच्या उद्देशानं बोलत राहिले. एकालाही चित्रपटाबद्दल, दिग्दर्शना-

---

# 'डॉक्टर' आनंद

'बाल शिवाजी'साठी नेमकी आनंदचीच निवड कशी झाली, ती एक धमालच आहे. रविवार सकाळ नाट्यवाचनस्पर्धेत आनंदच्या शाळेनं रवींद्र पाटणकरांचं 'शल्य' बसवलं होतं. आनंद शिवाजी आणि संभाजी असा double role करत होता. आनंदच्या ग्रुपलाही बक्षीस मिळालं आणि त्याला वैयक्तिक पहिलं बक्षीस मिळालं होतं. निकाल जाहीर झाले त्याच दिवशी सौ. पेंढारकर शिवाजीच्या शोधात पुण्यात पोचल्या होत्या. त्यांनी प्रथम नू. म. वि.त एखादा मुलगा आहे का पाहिलं तर त्याना कोणी तरी आनंदचं नाव नाणि बक्षीस मिळाल्याचं सागितलं. सौ. पेंढारकर आनंदच्या शाळेत-विमलाबाई गरवारे शाळेत पोचल्या तर आनंद घरी मग त्या आनंदच्या घरी पोचल्या. त्याम्हणाल्या,'आम्ही आनंदला शोधतोय.' आनंद घाबरला. कारण पुढचं वाक्य, 'आम्हाला मुख्याध्यापकांनी पाठवलयं' मग शिवाजीच्या भूमिकेचं कळल्यावर भीती गेली. पहिल्यांदा त्याचे बाबा नाहीच म्हणाले. मग शांतारामबापूंनी मन वळवलं. मग 'स्क्रीन टेस्ट.' स्क्रीन टेस्टच्या वेळी रडणारा आनंद नंतर एकदा निवड झाल्यावर मात्र एकदम शूर, धीट झाला. इतका की संपूर्ण सिनेमात कुठेही 'डमी' वापरली नाही !

एकदा शिवाजी म्हणून निवड झाल्यावर सतत सहा महिने आनंदला वेगवेगळ्या प्रकारचं ट्रेनिंग दिलं. घोड्यावर बसता यावं म्हणून तो 'शिवाजी प्रिपरेटरी स्कूल'मध्ये जात होता. भाला, बरची, दांडपट्टा, तलवारीचे हात शिकण्यासाठी तो थेट कोल्हापूरच्या यादव वस्तादांकडे पोचला. शिवाजीराजे कसे बोलायचे,कसे वागायचे ते शिकण्यासाठी आनंदनं बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या घरी जाऊन व्याख्यानं ऐकली. आनंद सांगतो की 'मी इतका involve झालो होतो की, समोर कुणी मोठी माणसं आली की मुजराच केला जायचा !'

कोल्हापूरच्या समीर दैनीनं तर एकदा मजाच केली. पितळेचं एक भलं मोठं पातेलं उचलायचा शॉट होता. समीरच्या पोटात कळ आली. त्याला तडक डॉक्टरकडे नेलं. डॉक्टरांनी नाव विचारलं तर म्हणाला, 'गोदाजीराजे जगताप.' आठ वर्षांचा समीर इंजेक्शन घेऊन लगेच शूटींगला हजर ! शूटिंगच्या अशा कित्येक गमतीजमती आनंदनं सागितल्या.

शेवटी आनंदला विचारलं, 'आत्ता तू ११ वीत गेलास. समजा १२ वीत तुला परत शांतारामबापूंचं पत्र आलं आणि एखादा छान रोल असला तर करशील का ?'... आनंद म्हणतो, शक्यच नाही. मला आधी डॉक्टर व्हायचं आहे. मला सिनेमातल्या लोकांबद्दल 'क्रेझ' नाही ती काय आपल्या सारखीच माणसं असतात.

त्याच्या वयाला न साजेशा समजूतदारपणानं आनंद सागत होता.

आनंद पुढे डॉक्टर.होईलसुद्धा. मला मात्र आठवेल १३ जुलैला हात उंचावून 'बेस्ट अॅक्टरची ट्रॉफी दाखवणारा आनंद ! *

---

बद्दल, आनंदबद्दल, त्याच्या सवंगड्यांबद्दल बोलावसं वाटलं नाही. आम्ही पत्रकारांनी आनंदच्या आनंदाला थोडं गालबोटच लावलं म्हणा ना!

शांतारामबापू सांगत होते की, महोत्सवासाठी बोलावलेल्या आंतरराष्ट्रीय ज्यूरींच्या पॅनेलनं केलेली निवड आणि महोत्सवासाठी आलेल्या बालसमूहाची एकमुखी निवड पूर्णपणे भिन्न होती. ते म्हणाले, लहान मुलांना काही तरी अस्सल, जिवंत, वास्तववादी हवं आहे. (हा वास्तववाद 'new wave' चित्रपटातला नाही, असा बारीक चिमटा त्यांनी जाता जाता काढला.) शांतारामबापूंना अभिप्रेत असलेला वास्तववाद बालगोपाळांच्या निष्पाप भावविश्वापासून दूर नेणारा आहे की काय अशी शंका येते. बापू म्हणाले, 'मी CFS चा अध्यक्ष झाल्यापासून राजा-राणीच्या कथांवर बंदी घातली. राजाराणीचं glorification करणाऱ्या कथा आम्हाला नकोत.' गंमत अशी आहे की, जगातली यच्चयावत लहान मुलं एके काळी घोड्यावरून शिकार करणाऱ्या राजाची, त्याच्या आवडत्या—नावडत्या राणीची आणि जादूच्या राक्षसाच्या गोष्टीचीच मागणी करतात, त्याचं काय? शांतारामबापू जसं म्हणतात की 'Child labour' हा लहान मुलांसाठी चित्रपटाचा विषयच होऊ शकत नाही, तो मोठ्यांचा प्रश्न आहे. त्यांना काय कळणार exploitation? तसंच हे राजाराणीच्या 'glorification' चं नाही का? exploitation काय किंवा glorification काय दोन्ही मुद्दे कपाळाला आठी घालणाऱ्या मोठ्या माणसांच्या मनात. निरागस मुलांच्या हसऱ्या, चमकत्या डोळ्यांत त्याचा पत्ताही नसतो! लहान मुलांना काय हवं आहे ते मोठ्या माणसांना कळत नाही हेच खरं! नाही तर 'बाल शिवाजी'च्या पत्रकारपरिषदेला एवढ्या उत्साहानं बसलेल्या आनंदला असं गप्प बसायला लागलं असतं का?

# बातम्या अशाही

## □ अशीही एक मत्स्यकन्या!

शेरतळ्यापासून बावीस किलोमीटर अंतरावर असलेल्या थैकाड गावाचा तो तरुण कोळी अगदी जिद्दीलाच पेटला होता. मित्राशी लावलेली ताडीच्या बाटलीची पैज त्याच्या नजरेसमोर होती.

दररोज समुद्रावर जाळी फेकायचाच त्याचा उद्योग. त्या दिवशी मात्र त्या जाळ्याचा उपयोग मासे नाही तर चक्क एक मत्स्यकन्या पकडण्यासाठी त्याने केला.

पंधरा वर्षांची ती कन्यका त्याने कालव्यात नहाताना पाहिली आणि त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. बरोबरच्या मित्राला हे सांगताच मित्राने चक्क त्याची टिंगलच केली. 'आहे हिंमत तिला जाळ्यात पकडायची? मासे काय रोजच पकडतो. आज हिला पकडशील? अख्खी ताडीची बाटली देईन तुला!'

मित्राच्या या डिवचण्यामुळे तो तरुण ताबडतोब कामालाच लागला. बरोबरचं जाळं त्यानं पाण्यात फेकलं आणि त्या बिचाऱ्या डुंबणाऱ्या मुलीला तशीच नहाताना जाळ्यात अडकवली. जाळं वर ओढल्यावर मात्र अत्यंत सभ्य माणसाप्रमाणे त्याने त्या मुलीला सोडून दिलं.

त्याच्या सभ्यपणाची फारशी कदर त्या मुलीने केली नाही. ती सरळ पोलीसठाण्यावर गेली आणि तक्रार नोंदवली.

त्या तरुण मुलाला याची खबर लागली असावी. कारण सध्या पोलीस त्याचा तपास करताहेत आणि तो अजूनही बेपत्ता किंवा कदाचित ताडीच्या नशेत आणि मत्स्यकन्या पकडल्याच्या आनंदात बेहोष होऊन कुठे तरी गुप्त झाला असण्याचीही शक्यता आहे.

## □ बायकोवरून भांडण?

मे—जून हा लग्नाचाच मोसम. कुठल्याही मंगल कार्यालयावरून जा, सनईचे सूर ऐकू येणारच. हैद्राबादेतही परिस्थिती वेगळी नसते.

अशाच एका हॉलमध्ये वाजंत्री वाजत होती. लग्नमंडप माणसांनी भरून गेला होता. नवरामुलगा नवरीला मंगळसूत्र घालत होता. इतक्यात एक पंचवीस वर्षांचा तरुण तिथे आला आणि त्याने नवऱ्याच्या हातचं मंगळसूत्र हिसकावून घेतलं. 'ती माझी बायको आहे. तुला तिच्याशी लग्न करता येणार नाही!' असंही त्याने नवऱ्यामुलाला सांगितलं.

हॉलमध्ये गोंधळ माजला. नवरा आणि त्याचे वडील रागाने नुसते लाल लाल झाले. बिच्चारा वधूचा बाप. त्यांची समजूत घालायचा अयशस्वी प्रयत्न करता करता त्याच्या नाकी नऊ आले. शेवटी वरपक्षाकडची सगळी मंडळी हॉल सोडून निघून गेली.

पोलिसांनी तावडतोब त्या मुलाला अटक केली. आपल्याशी त्या मुलीचं लग्न ठरलं आहे असंच त्यानं पोलिसांना सांगितलं. सुरुचिता रेड्डी त्याचं नाव. सध्या पोलीस मुलीच्या आई-वडिलांची समजूत घालताहेत. सुरुचिताशी तिचं लग्न लावून द्यावं हे पटवायचा प्रयत्न करताहेत.

## □ सापांचा मित्र!

विषारी सर्पांबरोबर काही तास राहण्याचा विक्रम हल्ली खूप जणांनी केलाय. यात साहस निश्चितच आहे; पण केरळमध्ये राहणारा एक माणूस यातलं धाडस कबूलच करायला तयार नाहीये.

रेहमानला सगळे ओळखतात 'सापांचा मित्र' म्हणूनच. कुठलाही साप, मग तो कितीही विषारी असो आपणहून कधीही दंश करत नाही असं रेहमानचं म्हणणं. अनेक विषारी सापांना माणसाळवण्याचं काम रेहमाननं केलंय. प्रेमानं तो अशा सापांची चुंबनही घेतो. मित्र झालेल्या सापाचा फणा आपल्या तोंडात ठेवून लोकांना दाखवतो. इतकं करूनही साप त्याला काहीच करत नाहीत, अगदी कोब्रासुद्धा!

असले प्रकार रेहमान का करतो? शेतात साप असल्यामुळे ते उंदरांना, इतर कीटकांना खाऊन रोपांचं रक्षण करतात. म्हणजे एका परीने माणसांना मदतच करतात. हे सरपट.

णारे प्राणी अगदी सरळ असतात. उगीचच त्यांना घाबरण्याचं काहीही कारण नाही. आपल्याला जे वाटतंय ते इतरांना पटवून देण्यासाठी रेहमान असली साहसं करत फिरतो. एखादा विक्रम केल्याचं समाधान त्याला मिळत नसलं तरी स्वतःचं म्हणणं पटवून द्यायचं आणि चार टक्के लोकांना जरी ते पटलं तरी वाटणारा आनंद त्याला जास्त मोलाचा वाटतो.

## □ चीनचे र. धों. कर्वे

प्रोफेसर मा यिनचू यांना चीनचे र. धों. कर्वेच म्हणावं लागेल. नुकतंच त्यांचं वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झालं. व्यवसायानं अर्थशास्त्रज्ञ असणाऱ्या या प्राध्यापकसाहेबांनी १९४५ च्या सुमारास चीनमधे कुटुंबनियोजनाचा आग्रह धरला. लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनं उशीरा लग्न करण्याचा सल्लाही ते देत.

यापायी त्या काळात चीनचा सर्वेसर्वा असलेल्या माओशीही त्यांना शत्रुत्व पत्करावं लागलं. माओचा कुटुंबनियोजनाला सक्त विरोध होता. 'अधिकाधिक प्रजा हे चीनच्या सुबत्तेचं लक्षण आहे' असं माओ म्हणायचा. सहाजिकच प्राध्यापक चिनचूंना खूप हाल सहन करावे लागले. जवळजवळ वीस वर्षं ते अज्ञातवासात होते.

माओच्या या अव्यवहारी आणि विज्ञानविरोधी धोरणाचे परिणाम चीनला साठ ते सत्तर या दशकात भोगावे लागले. अवास्तव वाढलेल्या लोकसंख्येमुळे अनेक प्रश्नांनी अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्यावर १९७९ साली चीनच्या नव्या राजवटीला प्रा. चिनचू यांची नव्याने आठवण झाली. त्यांना सन्मानाने पाचारण करण्यात आलं. त्यांच्या सल्ल्यानुसार कुटुंबनियोजनाचं नवं धोरण सरकारनं आखलं.

आज, त्यानंतर तीन वर्षांनी मृत्यूच्या आधीन होताना प्रोफेसरांनी निश्चितच समाधानाने डोळे मिटले असतील. उशीरा का होईना आपली तपश्चर्या फळाला आली याचं समाधान निश्चितच त्यांच्या चेहऱ्यावर असेल.

## □ मृतामधून जीवन !

मेलेल्या आईच्या पोटातून जिवंत मूल बाहेर काढण्याची किमया नेपाळ इथल्या डॉक्टरांनी यशस्वीरीत्या केली आहे.

श्रीमती चिॲशिओ यांना नऊ महिने पूर्ण झाले होते. आपल्या पोटात दुखू लागल्याचं त्यांनी आपल्या नवऱ्याला सांगितलं आणि त्याने घाईघाईतच गाडी काढली. बायकोला व्यवस्थित हॉस्पिटलमध्ये न्यावं यापेक्षा लवकरात लवकर न्यावं असा विचार बहुधा त्याने केला असावा.

अत्यंत वेगात चाललेली ती गाडी पाहून रस्त्यावरच्या काही माणसांचे डोळे पांढरे झाले; पण श्री. चिॲशिओंना कसलीच पर्वा नव्हती.

याच वेगात गाडी चालवत असताना एक वळण आलं आणि त्यांचं समोर लक्ष गेलं. रस्ता–दुरुस्तीचं काम त्या ठिकाणी चालू होतं आणि म्हणून रस्ता अडवायला रस्ताभर लाकडांचे ओंडके पसरून ठेवलेले होते.

चिॲशिओने गाडी दुसऱ्या बाजूला वळवायचा प्रयत्न केला; पण प्रचंड वेगात असलेली ती गाडी या अचानक झालेल्या बदलामुळे सरळ उलटी झाली. दोघंही नवरा–बायको बाहेर फेकली गेली. नवरा जागच्या जागी ठार झाला ! श्रीमती चिॲशिओंना हॉस्पिटलमध्ये नेलं; पण वाटेतच त्यांचे प्राण गेले.

नेपाळच्या हॉस्पिटलमधले डॉक्टर तरीही नुसते गप्प बसले नाहीत. चिॲशिओबाईंचे दिवस पूर्ण भरलेले होते. ताबडतोब त्यांच्या शवावर शस्त्रक्रिया करून त्यांनी एका छोट्याशा मुलीला बाहेर काढलं.

सध्या ही बेबी हॉस्पिटलमध्ये अगदी नॉर्मल आहे. अजूनही आई–वडील वगैरे गोष्टी कळत नसल्यामुळे मजेत आहे.

—मीना कर्णिक



# स्मिता पाटील भलताच 'उंबरठा' ओलांडत आहे का ?

विशेष लेख

**माणूस**

पुढील अंकी

# तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास

'माणूस' साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी रुपये पन्नास आहे. या वर्गणीत दिवाळी अंक वर्गणीदारांना दिला जातो. शिवाय वर्षातून निघणारा एकाद-दुसरा विशेषांकही.

पोस्टाचे दर भरमसाठ वाढले आहेत.

वार्षिक वर्गणीदारांप्रित्यर्थ होणारा टपाल व इतर कार्यालयीन खर्च वाचविण्यासाठी तीन वर्षांची वर्गणी एकदम पाठवून सगळ्याचाच त्रास थोडा कमी करणे शक्य आहे.

# सप्रेम भेट

आपण आपली वर्गणी संपेपर्यंत वाट न पाहता ३ वर्षांची वर्गणी ३१ जुलै पूर्वी पाठवणार असाल तर एक नवी कोरी करकरीत पुस्तकभेट आपल्याला आम्ही देऊ शकू.

# पटक आणि पटकार

**लेखक : संदीप पाटील । रवी शास्त्री**

**आदित्य प्रकाशन, मुंबई**

**किंमत : तीस रुपये**

**सवलतीची किंमत : पंचवीस रुपये**

ही पुस्तकभेट पाठविण्याचा खर्च मात्र आम्ही करू शकणार नाही !

३ वर्षांची १५० रुपये वर्गणी भरणाऱ्यांनी वरील पुस्तक माणूस कार्यालयातून घेऊन जावे किंवा फक्त टपाल-पाठवणी खर्चाची व्ही. पी. केली जाईल, ती सोडवून घ्यावी.

**आपणास ही पुस्तकभेट नको असल्यास**

**आपण सरळ एकशे पंचवीस रुपये पाठवा.**

तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास ही पंचवीस रुपयांची सूट आहे. ही सूट-सवलतही फक्त ३१ जुलैपर्यंत !

**साप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३०.**